
# पुन्हा एकदा कविता



म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २०७२

संपादक
ना. धों. महानोर
चंद्रकांत पाटील

REFBK-0023442

# पुन्हा एकदा कविता

संपादक

ना. धों. महानोर : चंद्रकान्त पाटील

REFBK-0023442

नीलकंठ प्रकाशन

किंमत
तीस रुपये

प्रकाशक
प्रकाश रानडे
नीलकंठ प्रकाशन
१६४३, सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०.

मुखपृष्ठ
जयंत जोशी

मुद्रक
यशवन्त जोशी
आनंद मुद्रणालय
१५२३, सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०.

पहिली आवृत्ती
जानेवारी १९८२

©
ना. धों. महानोर
चंद्रकान्त पाटील

२०७१२
२३७७२
काव्य २०१२५८

# प्रस्तावना

१

मराठी कवितेत एकोणीसशे साठच्या आसपास महत्त्वाचं स्थित्यंतर घडून येत होतं. काही समविचारांचे लोक पहिल्यांदाच त्या काळी प्रचलित आणि प्रतिष्ठित झालेल्या एकसूरी, एकायामी कवितेपेक्षा वेगळ्या स्वरूपाची कविता लिहू लागलेले होते. या कवींच्या कविता एकमेकांच्या कवितेपासून वेगळ्या होत्या, कवितेसंबंधीच्या धारणा वेगळ्या होत्या, अनुभवपद्धतीतही भिन्नता होती, रचनेतही भिन्नता होती, पण त्या सर्वांचा त्या काळी स्थितिशील झालेल्या कवितेपेक्षा वेगळी आणि नवी कविता लिहिण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न होता. केशवसुत आणि बा. सी. मर्ढेकरांनी मराठी कवितेला दिलेली वेगळी वळणं नष्टप्राय झालेली होती, परिमाणं झिजून गेलेली होती आणि मराठी कविता एका विचित्र भोवऱ्यात अडकलेली होती. कवितेचं आशयद्रव्य, अनुभूती, संरचना, लयी, शब्दसंघटन इत्यादी सर्वच अंगांनी स्थिर झालेल्या या कवितेपेक्षा नवी, समर्थ आणि समकालीनतेचे भान असलेली कविता लिहिण्याचा प्रभावी प्रयत्न १९६० च्या आसपास काही कवी एकाच वेळी करीत होते. ही महत्त्वाची गोष्ट होती; म्हणूनच १९६० नंतरच्या या कवितेचे स्वरूप वाचकांसमोर ठेवण्यासाठी हे संपादन करण्यात आलेलं आहे.

२

केशवसुतांच्या कवितेला मराठी कवितेच्या इतिहासात एक नवे युग सुरू करण्याचे श्रेय आहेच. आपल्या परंपरेतले सर्जनाचे आध्यात्मिक–गूढवादी सूत्र पुनरुज्जीवित करण्याचा केशवसुतांचा प्रयत्न काही वाचकांना महत्त्वाचा वाटत असला तरी केशवसुतांची एकंदर कविता तिच्यातील क्षीण सामाजिक जाणिवेसकट लक्षात घेतल्यास एकोणिसाव्या शतकातल्या अव्वल आणि विशेषतः दुय्यम दर्जाच्या इंग्रजी 'रोमँटिसिझम्'च्या प्रभावातूनच निर्माण झालेली होती हे सहजच दिसून येण्यासारखे आहे. या 'रोमँटिसिझम्'ची पाळंमुळं मराठी कवितेत रुजवण्याची आणि आपल्या वाङ्मयीन संस्कृतीत त्यांना एक जागा निश्चित करून देण्याची केशवसुतांची कामगिरी टीकाकारांना प्रत्यक्ष–अप्रत्यक्षपणे विलोभनीय वाटलेली होती. बालकवी आणि 'बी' कवींच्या 'चाफा'सारखा एखादा अपवाद वगळता केशवसुतांनंतरच्या काळात या 'रोमँटिसिझम्'चं अधिकाधिक अधःपतनच मराठी कवितेत वाढत गेलं. नंतरच्या कवींनी कवितेसोबतच आधुनिकतेच्या नावाखाली परकीय सौंदर्यकल्पनांची उधार-उसनवारी करून आपल्या कवितांना तात्त्विक अधिष्ठान मिळवून देण्याचा प्रयत्न केला. मग तात्त्विक अधिष्ठानाचंच

वर्चस्व वाढत गेलं आणि त्यावरहुकूम कविता लिहिली जाऊ लागली. अशा तऱ्हेनं या सर्वंध कवितेला स्थिरता आली, तिच्यातील गतिशीलता नष्ट झाली आणि ती घातचक्रात गरगरत राहिली, अधिकाधिक गढूळ होत गेली.

३

कवितेच्या सौष्ठवाच्या आणि त्या अनुषंगाने येणाऱ्या सौंदर्याच्या कल्पना अधिकांशी इंग्रजी वाङ्मयावरून घेतलेल्या होत्या, आणि त्याचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे इंग्रजी वसाहतवादाशी संबंध होता, ही गोष्ट १९६० च्या आसपास वेगळ्या पद्धतीची कविता लिहिणाऱ्या काही लोकांना निश्चितच जाणवली होती. वसाहतींवर वर्चस्व कायम टिकविण्यासाठी वसाहतीतील लोकांना साहित्यादी सर्वच कलांमधील अतिरिक्त सौंदर्यकल्पनांमधे गुंतवून ठेवणे, रूपवादाचे श्रेष्ठत्व पटवून तशा पद्धतीच्या कलाकृतींना अत्युच्च प्रतिष्ठा मिळवून देणे, देशी कलांना गौणत्व देणे आणि देशीयतेच्या जाणिवेपासून कलेला आणि समीक्षेला सतत दूर ठेवणे हा जगभरच्या वसाहतवाद्यांचा पवित्रा भारतातही इंग्रजांनी रूढ केल्यामुळे अव्वल इंग्रजी अमदानीत आणि नंतरही १९६० पर्यंत मराठी कविता आपल्या देशी परंपरेपासून जवळ जवळ तुटलेलीच होती. आपले दुर्दैव असे की तुकाराम हा मराठी कवितेतला सर्वोत्कृष्ट कवी आहे ही गोष्ट एकोणिसाव्या शतकात इंग्रजांनीच मराठी वाचकांना सांगितली; आणि तरीही इंग्रजांचा अनुनय करणाऱ्या उच्चवर्गीय समीक्षक-आलोचकांनी त्याकडे हेतुपुरस्सर दुर्लक्ष केले. संस्कृत वाङ्मयातील ऱ्हासोन्मुख अभिजातता आणि एकोणिसाव्या शतकातील दुय्यम दर्जाचा इंग्रजी 'रोमँटिसिझम' हेच '६० पूर्वीच्या मराठी कवितेचे आदर्श म्हणून गौरविले गेले. कविता हा भावनानिष्ठ वाङ्मयप्रकार आहे याबद्दल दुमत असण्याचं कारण नाही. शिवाय ती व्यक्तिगत अभिव्यक्ती असते हेही खरेच आहे. पण १९६० पूर्वीच्या पिढीने ही गोष्ट अशा काही आत्यन्तिक टोकापर्यंत आणि विचित्र पद्धतीने ताणली की भावनिक स्थितीतून ती भावनाविवशतेकडे आणि क्षुद्र नाटकीकरणाकडेच झुकू लागली. व्यक्तिगत अभिव्यक्ती ही काही ठराविक, चाकोरीबद्ध, खाजगी व सीमित अनुभवांनाच अधोरेखित करू लागली. साहित्यातील अनुभवांपेक्षा शैलीचेच आधिक्य वाढत चालले. अनुभवांच्या उसनवारीबरोबरच शैलीचीही उसनवारी वाढली आणि पुढेपुढे शैलीपेक्षाही 'शैलीकरण' सर्वाधिक महत्त्वाचे बनले. शैलीकरणाने मराठी कवितेत बंदिस्त सांकेतिकता आणली. सच्च्या अनुभवांपेक्षा साहित्यिक संकेत महत्त्वाचे ठरविले गेल्यामुळे अशी खुजी, वाङ्मयजीवी, उपरी परम्परा मराठीत फोफावली. गोविन्दाग्रजांपासून तर तिची फारच जोमाने वाढ झाली. नंतरच्या रविकिरण मंडळींनी खोट्या निसर्गकविता लिहून आणि किशोरावस्थेतील रोमँटिसिझम्‌मधे तिला बुडवून ही परंपरा कायम ठेवली. हीच परंपरा पुढे विंदा करंदीकरांच्या 'ऱ्हेटरिक्स'मधे, मंगेश पाडगावकरांच्या यौवनसुलभ निसर्गकवितांत आणि

वसंत बापटांच्या समग्र कवितेत प्रकर्षाने जाणवते. शिवाय तिला जिवंत ठेवण्याचं कार्य ग्रेस, सुरेश भट, वसंत सावंत, सुरेश मथुरे, चंद्रकांत प्रभाकर देशपांडे इत्यादी बरेच समकालीन कवी पण करीत आहेतच. यातील मथुरे-देशपांडेसारखे कवी कवितेचा भावनिक गाभा उद्ध्वस्त करून, परा-बौद्धिक बोजडपणाचा डोलारा उभा करून मराठी कवितांचीच कोंडी करीत आहेत आणि अतिशय वाईट ऱ्हेटरिक्स प्रस्थापित करण्याचा दुबळा प्रयत्न करीत आहेत. या सर्व कवितेमागे रसिकांचा अनुनय करणारं रंजनाचं एक सूत्रही आहेच. ही रसिकरंजनी कविता वर्तमानपत्रांतून मासिकापुस्तकात घुसली आणि हळूच व्यासपीठावरही चढली. इंग्रजी अमदानीच्या प्रभावामुळे निर्माण झालेली ही कविता सौंदर्यवाद-रूपवादाच्या संकेतांवर आधारित असली तरीही तिचं मराठी कवितेतल्या एका क्षीण परंपरेशी नातं होतंच. म्हणूनच तिला मराठी जमिनीत आपली मुळं सापडली नसली तरीही पारंब्या रोवणं शक्य झालं. ही क्षीण परंपरा म्हणजे इंग्रजपूर्व काळातील पंडित कवींचीच परंपरा होती.

४

पंडित कवींची सर्व कविता बव्हंशी संस्कृत महाकाव्यांवर आधारित होती. म्हणजे तिचे परावलंबित्व आशयवस्तूपासूनच सुरू होते. महाकाव्यातून अभिव्यक्त होणाऱ्या एका विशाल समूहमानसाच्या पुनःसर्जनाचे कठिणतम कार्य पंडित कवींच्या आवाक्याबाहेरचे असल्यामुळे त्यांनी महाकाव्यातून आलेल्या पुराणकथांचा मराठीतून परिचय करून देण्याचे सीमित कार्यच आपले काव्यक्षेत्र म्हणून निश्चित केले. एकदा आशयवस्तूच्या मर्यादा स्वीकारल्या की मग ठराविक आशयाला अधिकाधिक रंजक करण्याकडेच त्यांचा कल असणे अपरिहार्य आहे. शिवाय या रंजकतेला रसिकसापेक्षताही आपोआपच येत गेली. यातूनच त्यांचे सौंदर्यशास्त्रही आकारत गेले. पंडिती कवितेतील संस्कृतोद्भव शब्दांचे आधिक्य, आत्यंतिक अलंकरणशीलता, चमत्कृती आणि विविध काव्यगत क्लृप्त्यांवर आधारित शैलीविशेष हे आशयानुसारीच होते. कारण आशयद्रव्यही रंजकतेसाठीच निवडलेले असल्यामुळे त्यात सर्वसामान्यांना सहजपणे मोहित करणाऱ्या आणि वास्तवापासून दूर असलेल्या स्वप्नसदृश शृंगारकथांचाच भरणा अधिक होता. अशा पद्धतीने संस्कृत महाकाव्यातील शाश्वत नैतिक मूल्यांकडे डोळेझाक करीत, समूहमानसाची अभिव्यक्ती उणी करून, पुराणकथांना कुठलीही नवी दृष्टी न लावता, त्यांचे त्या-त्या काळाशी संबद्ध भाष्य न करता पंडिती कविता ही पंडित कवींचे आत्मभान पूर्णपणे नष्ट करून निर्माण होत गेली. साहजिकच ती सर्जनाऐवजी यांत्रिक रचनेच्याच आहारी गेली. **काय** सांगावयाचे आहे याऐवजी **कसे** सांगावयाचे आहे यावरच अधिक भर दिला गेला, आणि यामुळेच तिचे सौंदर्यलोलुप रूपवादी स्वरूप महत्त्वाचे ठरले.

५

पंडित कवींची कविता अशा पद्धतीने मराठी साहित्याच्या इतिहासात स्थिर झाली आणि नंतरच्या काळातही ती या–ना–त्या रूपाने विविध प्रकारे मराठीत रूढ होत गेली. रविकिरण मंडळाची कविता हा तिचाच विसाव्या शतकातला अवस्थांतरित भाग होता. पंडित कवितेतील सर्व दोष वेगवेगळे मुखवटे घेऊन तिच्यातही समाविष्ट झालेलेच होते. बा. सी. मर्ढेकरांनी तिला जबरदस्त हादरा देऊन सर्व पातळ्यांवर मूलभूत क्रांती करण्याचा प्रयत्न केला. मर्ढेकरांची 'शिशिरागम' या पहिल्याच संग्रहात अतिशय वेगळ्या स्वरूपाची 'लिरिकल' कविता आहे, पण नंतरच्या 'काही कविता' आणि 'आणखी काही कविता'मध्ये संपूर्ण आधुनिक वळण आहे. मर्ढेकरांची ही आधुनिकता त्या काळी युरोपभर निर्माण झालेल्या एका विचित्र पोकळीचाच आविष्कार होता. एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी–शेवटी फ्राइड्, मार्क्स आणि डार्विनने आणलेल्या महान सिद्धान्तांमुळे मानवाचे व्यक्ती म्हणून असलेले महत्त्व एकदमच गौणतर झालेले होते. मानवाच्या विश्वाशी, परमेश्वराशी, निसर्गाशी आणि मानवाशी असलेल्या नात्यांविषयीच्या पारंपरिक कल्पनांना प्रचंड धक्के बसलेले होते आणि यंत्रयुगीन सभ्यतेच्या वरवंट्याखाली मानवी मूल्यांचेच अवमूल्यन सुरू झालेले होते. शिवाय दोन्ही महायुद्धांनी संपूर्ण मानवजातीवरच विलक्षण अवकळा आणलेली होती. या निराश, परात्म, त्रिशंकू मानवी अवस्थेचं भयावह रूप ज्या एलियट्–ऑडेन युगानं ब्रिटिश साहित्यात आणून सोडलं त्याच्याच उपछायेखाली नव्या मूल्यभानासह आणि कालभानासह मर्ढेकरांची आधुनिकता साकारत गेली. या एकदम नव्या, अपरिचित आशयद्रव्यामुळे, विशिष्ट भावस्थितीमुळे मर्ढेकरांच्या कवितेतील भाषा एकदम नवी, जिवन्त, टवटवीत झाली, आणि मराठी कवितेचा आवाकाच वाढला. कवितेतील या महान कार्याबरोबरच त्यांनी नव्यानेच सौंदर्यशास्त्रीय लेखनही केलं आणि त्याच्या अनुषंगानेच काही मराठी कवितांचं विश्लेषणही केलं. त्यांच्या या सौंदर्यशास्त्रीय लेखनामुळे अर्थातच नंतरच्या काव्यनिर्मितीवर काहीही परिणाम झाला नाही. मात्र अप्रत्यक्षपणे नंतरच्या कवींनी कलेच्या स्वायत्ततेच्या नावाखाली रूपवादी संकेतांवर आधारितच कविता लिहून त्यांना 'प्रयोगक्षमते'चे लेबल चिकटवले आणि कवितेला जगण्याच्या प्रक्रियेपासून कापून अधांतरी लोंबकळत ठेवले.

६

मर्ढेकरांच्याच आसपास लिहिणाऱ्या महत्त्वाच्या कवींमध्ये मनमोहन, पु. शि. रेगे, शरच्चंद्र मुक्तिबोध, ना. घ. देशपांडे, इंदिरा संत इत्यादी कवींचाही उल्लेख आवश्यकच आहे. पैकी पु. शि. रेगे हे मर्ढेकरांपेक्षा एकदम भिन्न वाटेने जात मराठी कवितेला अभिजात वाङ्मयाकडे नेण्याचा प्रयत्न करीत होते. शब्दशक्तीचा अत्यंत समर्थ उपयोग

रेग्यांच्या ' गंधरेखा 'त दिसून येतो. कवितेच्या प्रत्येक घटकाबद्दल त्यांनी दाखवलेली सजगता मराठीच्या संदर्भात अत्यंत मोलाची गोष्ट होती. शरच्चंद्र मुक्तिबोधांनी सुरुवातीच्या भावनिक गाभ्याला नाकारून कवितेला धोकादायक बौद्धिकतेच्या जवळपास आणून ठेवले असले तरी त्यांच्या विज्ञाननिष्ठ विचारधारेच्या बांधिलकीमुळे मराठी कवितेत एक नवा प्रवाह निर्माण झाला. त्यांनी मार्क्सवादी सौंदर्यशास्त्राच्या संकल्पनाचाही मराठी वाचकांना परिचय करून दिला. ' नवी मळवाट 'च्या दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना त्यांची सूक्ष्म काव्यविषयक जाण व्यक्त करणारा महत्त्वाचा दस्तऐवज आहे. ना. घ. देशपांडे हा शहरी वस्तीपासून दूर असलेला त्या काळातील महत्त्वाचा कवी. ' शीळ ' या पहिल्याच संग्रहातली त्यांची कविता ही 'लिरिकल' कवितेच्या शुद्ध व अस्सल स्वरूपाची उपलब्धी आहे. ना. घ. देशपांडे शब्दकळेच्या वेगळेपणानं आणि लोकगीतांच्या संपन्न भांडारातून आणलेल्या एकदम नव्या व अपरिचित लयींनी मराठी कविता संपन्न करीत होते. त्यांनी मराठी भाषेवरील इंग्रजी व संस्कृत प्रभावापासून मुक्त असे खास देशी वळण रूढ करण्याचा प्रयत्न केला. अशा प्रकारचा आणखी एक प्रयत्न माळव्यातील लोकगीतांतून सामर्थ्य घेऊन कविता लिहिणाऱ्या भा. रा. लोवलेकरांनीही केला होता. समकालीन कवितेत ह्याच दिशेनं जाऊन सीमा विस्तारित करण्याचं कार्य काही कवींनी केलेलं आहे. अस्सल लोकगीतांचा गाभा असणाऱ्या लयी आणि पारंपरिक पंडिती स्वरूपाच्या लयींचा तौलनिक अभ्यास झाल्यास लोकगीतांच्या सामर्थ्याची सहज कल्पना येऊ शकेल. सांस्कृतिक जीवनात खोलवर रुजलेले शब्दबंध आणि अर्थक्षयानं ग्रस्त झालेले विचित्र, कृत्रिम शब्दबंध यांच्यातील फरकही अशा तुलनेनं अधिक स्पष्ट होऊ शकेल. मर्ढेकरांच्याच समकालीन असलेले मनमोहन हे एक महत्त्वाचे कवी. विलक्षण कल्पनाशक्ती व आधुनिकतेचे निश्चित कालभान व मूल्यभान असलेला हा कवी वस्तुतः १९६० नंतर उदयाला आलेल्या नव्या पिढीचं प्रमुख स्फूर्तिकेंद्र असावयास हवा होता. अनेक ब्रिटिशेतर पाश्चिमात्य कवितांतील महत्त्वाचे प्रयोग स्वतंत्रपणे यांच्याही कवितेतून आलेले होते. पण केवळ अधूनमधूनच वेगळं काही करीत राहणारा हा कवी आणि ' युगायुगांचे सहप्रवासी ' सारखी अत्यंत महत्त्वाची व एकदम समकालीन दीर्घकविता लिहिणारा सर्जनशील कलावंत थोड्याशा चांगल्या कवितेसोबत प्रचंड प्रमाणात सामान्य आणि बऱ्याचदा सामान्य स्तरापर्यंतही पोहोचू न शकणारी कविता विपुल प्रमाणात लिहून कवितेसंबंधीचं गांभीर्यच नष्ट करीत गेला व परिणामी दुर्लक्षिला गेला. मराठीतील कवयित्रींमधे फक्त इंदिरा संतांनीच लक्षणीय कविता लिहिल्या आहेत. इंदिरा संतांचा एकमात्र अपवाद वगळता १९६० अगोदर एकही महत्त्वाची कवयित्री झालेली नाही याचं कारण कदाचित आपल्या सामाजिक-सांस्कृतिक पर्यावरणातही सापडण्याची शक्यता आहे. या काही महत्त्वाच्या कवींबरोबरच रविकिरण मंडळात गरगरणाऱ्या किंवा मंडळाबाहेर राहून भावाकुळ आणि भावनोत्तेजक क्रांतिगीतं रचणाऱ्या कवींचीही वाटचाल

चालूच होती. अशा प्रकारच्या कवितेनं एकंदर मराठी कवितेच्या प्रवाहात ऐतिहासिक नोंदीत आपलं नाव समाविष्ट करण्यापलीकडे कुठलंही कार्य केलेलं नाही. रविकिरण मंडळाची कविता आणि 'अग्निसंप्रदायी' कविता ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू होत्या आणि त्यांचे पंडित परंपरेशी अप्रत्यक्षपणे नाते होतेच, हे निश्चित.

७

मर्ढेकरांच्या कवितेपेक्षाही त्यांच्या सौंदर्यशास्त्रीय लेखनाचाच अप्रत्यक्ष परिणाम मर्ढेकरोत्तर मराठी कवितेवर अधिक झाला. मर्ढेकरांमुळे पाश्चात्त्य वाङ्मयीन संकल्पनांना उधाण आले. त्यामुळे सौंदर्याचे निकष ठरवताना युरोपातल्या आणि खास करून ब्रिटन-मधल्या रूपवादी समीक्षकांचा वारंवार उल्लेख होऊ लागला, आणि मराठीतले सामान्य कवीसुद्धा अर्ध्याकच्च्या स्वरूपात समजलेल्या किंवा न समजलेल्या ; सौंदर्यशास्त्रीय संकल्पनांचा पुनरुच्चार करून त्या निकषांबरहुकूम काव्यरचना करू लागले. आय्. ए. रिचर्डस, रेने वॅलेक्, क्रोशे अशी वजनदार नावं घेऊन आणि अधूनमधून एम्सन्च्या संदिग्धतांची पेरणी करून आपल्या दुय्यम-तिय्यम दर्जाच्या प्रयोगशील म्हणवल्या जाणाऱ्या कवितांना तात्त्विक अधिष्ठान देऊ लागले. सांस्कृतिक इतिहास आणि संदर्भ दुर्लक्षून प्रतिमावाद, प्रतीकवादाची तळी उचलून धरण्याचा किंवा संज्ञाप्रवाहाला अवास्तव महत्त्व देऊन त्याचा हेतुपुरःसर वापर करून कविता लिहिण्याचा आणि अशी कविताच श्रेष्ठ म्हणवण्याचा प्रतिष्ठित धंदा १९६० पूर्वीच्या कवि–समीक्षकांनी जोरात चालवला होता आणि त्याच्या प्रभावाची एक क्षीण धार अजूनही मराठी कवितेत वाहत आहेच. या पार्श्वभूमीवर विन्दा करन्दीकर–मंगेश पाडगावकर–वसन्त बापट आणि कधी या तिरकटात तर कधी स्वतंत्रपणे सदानन्द रेगे यांची कविता चर्चिली गेली आहे. कवितेच्या भाषा, आशयद्रव्य, संरचना इत्यादी घटकांविषयी या चारही कवींत संकल्पनात्मक किंवा रचनात्मक सुसूत्रता नाही. या चारी कवींच्या आधुनिकतेच्या संकल्पना सारख्या नाहीत की त्यांच्या कवितांतून त्या समान्तर पद्धतीने जाणवतही नाहीत. करन्दीकर आणि सदानन्द रेगे हे आत्यंतिक प्रयोगवादी कवी आहेत तर करन्दीकर आणि बापट ह्यांच्या 'ये गंगा ये', 'केवळ माझा सह्यकडा' इत्यादी 'ऱ्हेटरिक' रचनांचे समानसूत्र आहे. बापट आणि पाडगावकर ह्यांच्या कवितांत एकाच प्रकारचा 'अडोलसंट रोमॅंटिसिझम्' भळभळून येत असतो. पण करन्दीकर–पाडगावकर–बापट या तिघांतही एक सामान्यसूत्र सापडतेच : हे तिघेही व्यासपीठावरून श्रोत्यांची मनपसंत कविता म्हणणारे व लिहिणारे कवी आहेत. म्हणजे पर्यायाने मराठी कवितेच्या इतिहासापेक्षाही मराठी अभिरुचीच्या इतिहासातच यांचे काही एक स्थान आहे. त्यांच्या रसिकसापेक्ष कवितांमधून सतत दिसून येणारी क्लृप्त्यांची चतुर योजना, धक्कादायक शेवट, विशिष्ट खटके, चाली आणि प्रतिमांची रेलचेल हेच त्यांच्या व्यासपीठीय प्रसिद्धीचे द्योतक आहेत. करन्दीकर–

सदानंद रेग्यांची आत्यंतिक प्रयोगधर्मिता आणि पाडगावकर-बापटांची यौवनसुलभ स्वच्छंदधर्मिता या सौंदर्यलोलुप रूपवादाचा गाभा असलेल्या कवितेच्याच निदर्शक आहेत; आणि त्यांचे सरळ सरळच पंडिती परंपरेशी नातं आहे. फरक एवढाच की समग्र बापट आणि बहुतांश पाडगावकर संस्कृत पंडितांशी नाते जोडतात तर करंदीकर-सदानंद रेगे ब्रिटिश परंपरेतल्या पंडितांशी जवळीक करतात. १९६० नंतरही हा प्रकार मराठीत चालू आहेच आणि त्याला आपल्या शहरी वाङ्मयीन संस्कृतीनेही मरू न देण्याचा क्षीण प्रयत्न चालवलेला आहे. याच प्रवाहात वा. रा. कान्त, आरती प्रभू, वि. ज. बोरकर, म. म. देशपांडे, आ. ना. पेडणेकर, पुरुषोत्तम पाटील, शंकर रामाणी, वसन्त सावन्त, ग्रेस, सुरेश मथुरे, श्री. वि. कुलकर्णी, शंकर वैद्य, केशव मेश्राम, वा. रा. सोनार, संजीवनी, पद्मा, पद्मा लोकूर, वृंदा लिमये, अनुराधा पोतदार, अंजली ठकार, प्रभा गणोरकर, वासंती इनामदार, कल्याणी इनामदार इत्यादी कमीअधिक महत्त्वाचे कवि-कवयित्री समाविष्ट होतात, आणि पोपट सातपुते, अनिल द्रविड, समस्त बिनीवाले, वसन्त वाहोकार, नारायण कुलकर्णी कवठेकर, हेमंत जोगळेकर, वसन्त पाटणकर इत्यादी कवि-कवयित्री म्हणजे याच प्रवाहातल्या नव्या भरतीच्या लाटा आहेत. ग्रेस हा या परम्परेतला सर्वाधिक लोकप्रिय कवी. या कवींनी काही चांगल्या रचनाही लिहिलेल्या आहेतच, पण एकंदर प्रवाहाच्या खळखळाटात त्या कुठल्या कुठे हरवून जातात. मर्ढेकरप्रणीत पाश्चात्त्य सौंदर्यवादी युगाच्या या वर्चस्वामुळे त्र्यं. वि. सरदेशमुख आणि मधुकर केचेसारखे काहीशी नवीन आणि सशक्त कविता लिहू पाहणारे कवीही फार काळ तग धरू शकले नाहीत.

८

वर उल्लेखिलेल्या प्रवाहातील कविता वस्तुतः अचेतन झाली होती ती तिच्यातील भाषिक क्षमता नष्ट झाल्यामुळेच. या बहुसंख्य कवींच्या कवितेतील भाषा विशिष्ट वर्गाच्या, समाजाच्या आणि शहरीकरणाच्या प्रक्रियेत अडकून स्वस्थ, प्रमाणित झालेली भाषा होती. या भाषेतील नव्या अनुभूतींना, नव्या जाणिवांना व्यक्त करण्याची ताकदच नष्ट झालेली होती. ही स्थिर, गतिहीन भाषा ज्या कवितेला जन्म देत होती ती कविता अनुकरणासाठी आदर्श असल्यामुळे तिच्या अनेक आवृत्त्या दरमहा प्रकाशित होत होत्या. तिचा चेहराच नष्ट झालेला होता. अशी कविता जगण्यापासून दूर असलेल्या सौंदर्य-केंद्राभोवती रुंजी घालत होती. या संदर्भातील खालील उतारा तिची प्रकृती समर्पकपणे व्यक्त करणारा आहे :

> "....तिचं समकालीनतेशी नातं तुटलेलं होतं आणि सामाजिक वास्तवाचं भान हरवून ती आत्मरंजनी अहम्‌वादाने ग्रस्त झालेली होती. अर्थ हरवून बसलेल्या शब्दांचं आधिक्य, वांझोटं शब्दसंघटन, शब्दचमत्कृती, अलंकरण-

शीलता, नव्या शब्दांची निरर्थक निर्मिती, प्रतिमांचा अतिरेक, प्रतिमांची उसनवारी, उत्कटता, क्षीण आशय, अर्थक्षयानं जर्जर संरचना, आयातित अनुभूती, केंद्रहीनता, संदर्भहीन अस्तित्ववाद, आत्यंतिक बौद्धिकीकरण, यौन–अराजक, छद्मविद्रोह, वेढंग लयी, चमकदार सुट्यासुट्या ओळी, विस्कळित रचना अशा असंख्य गोष्टींच्या प्रभावामुळे ही कविता सौंदर्यनिष्ठ रूपवादाच्या भोवऱ्यात गरगरत होती....''

आपल्या वाङ्मयीन संस्कृतीचे दुर्दैव असे की या भोवऱ्याबाहेर जो नवी, समर्थ रचना आपापल्या पद्धतीने वाढत होती ती टीकाकारांनी बहुतांशी दुर्लक्षिली. त्यामुळे खऱ्या आणि नकली कवितांमधील स्पष्ट सीमारेषा बहुसंख्य वाचकांना कळेनाशा झाल्या. यातच भर म्हणून आपल्या वर्तमानपत्री समीक्षकांनीही असंख्य नकली मुखवट्यांना दरमहा क्रांतिकारकत्व बहाल करायला सुरुवात केली. पंडिती कवितेचा हा वेष बदललेला अवतार अशा पद्धतीने समकालीन वाङ्मयात कधी प्रतिष्ठित वर्तमानपत्रांतल्या स्तंभांतून, नियतकालिकांतल्या फुटकळ समीक्षणांमधून, सरकारी-निमसरकारी पारितोषिक खैरातीतून, प्रादेशिकतेच्या, जातीयतेच्या, राजकीय विचारप्रणालींच्या, वाङ्मयीन राजकारणाच्या, गटबाजीच्या किनाऱ्याकिनाऱ्याने उघड-उघड किंवा लपून-छपून वाचकांच्या मेंदूवर सतत आदळून लोकमान्य आणि राजमान्य होत गेला.

९

१९६० च्या आसपास लिहू लागलेल्या काही कवींनी या रूढ, स्थिर, अचेतन कवितेचे सर्व बंध झुगारून मराठी कवितेत चैतन्य निर्माण केले आणि तिला आधुनिक, नवीन आणि समकालीन परिमाण दिले. समकालीन जीवनप्रवाहाच्या सर्वच अंगांना स्पर्शून जाणाऱ्या नव्या अनुभूतींचा शोध घ्यावयास सुरुवात केली. कवितेच्या संवेगात्मक गाभ्यावरील पकड जराही ढिली पडू न देता, बौद्धिक कूटकाव्यातून सौंदर्यकचरा निर्माण करणाऱ्या कवितेविरुद्ध बंड करून उठणाऱ्या आणि एकंदर मराठी कवितेचा आवाकाच वाढवणाऱ्या या कवितेने एक महत्त्वाची गोष्ट केली : तिनं आपल्या परंपरेची पाळंमुळं शोधून काढली आणि तिच्याशी आपलं नातं प्रस्थापित केलं. या कवितेला आधुनिकतेचा संदर्भ लागला तोच मुळात प्रत्यक्ष जगण्याच्या प्रभावातूनच अनुभव शोधण्याच्या, जगत **असण्याची** आणि जगत असण्याच्या प्रक्रियेची काव्यगत प्रतिष्ठापना करण्याच्या तिच्या प्रकृतीतून. तिनं पंडिती संचित नाकारलं तसे रूढ वाङ्मयीन संकेतही नाकारले. साहित्यातूनच अनुभव घेऊन त्यांना कवितेतून फुलवत बसण्याचे नाकारले आणि झिजलेल्या शब्दांतून ते व्यक्त करण्याचेही नाकारले. तिनं नव्या भाषिक कंगोऱ्यांचा शोध घेऊन भाषिक क्षमतेचा जाणीवपूर्वक विस्तार केला. सभोवारच्या परिस्थितीबाबत सजग राहून दैनंदिन जगण्याशी प्रामाणिक असण्याची **समकालीनता** आणि जगत असतानाच मूल्य-

विवेकावर निष्ठा ठेवण्याची, प्रत्यक्ष जगण्याच्या प्रवाहात असतानाच जगण्याकडे थंडपणे, अलिप्तपणे पाहून विश्लेषणात्मक पवित्रा घेण्याची **आधुनिकता** या पिढीच्या कवितेत प्रकर्षाने जाणवू लागली होती. या पद्धतीच्या कवितांमधून अनुभवांचे सरळसरळ शब्दांकन करताना किंवा ' संवेदनांचे सरळ भाषांकन करीत असतानाच ' या पिढीला आपली पाळंमुळं संतपरंपरेतल्या कवितेत आढळून आली. पंडिती परंपरेविरुद्ध बंड करणाऱ्या या पिढीला **संतपरंपरा** अधिक मोलाची वाटली आणि त्यामुळे तिनं आपलं नातं एकंदर मराठी कवितेच्या उगमकेंद्राशीच जोडलं. उदाहरणार्थ अरुण कोलटकर, नारायण सुर्वे, भालचंद्र नेमाडे, दिलीप चित्रे, मनोहर ओक, नामदेव ढसाळ, प्रकाश जाधव इत्यादींच्या कविता या एका बाजूने आधुनिक व समकालीन असतानाच संतपरंपरेत आपली पाळंमुळं शोधण्याचा प्रयत्न करताना दिसून येतात. या पिढीनं आणखीही एक गोष्ट केली : संतकवितेसोबतच मधल्या काळात दुर्लक्षिली गेलेली लोकगीतांची परंपराही तिनं पुनरुज्जीवित केली. लोकगीतांकडे वळून लोकगीतांतून सर्जनाची ऊर्जा शोधणाऱ्या साठोत्तरी कवींना नव्या जीवनसंबद्ध लयी, नवे शब्दबंध सहजपणे सापडले आणि झिजलेल्या पंडिती पाशांतून कविता मुक्त केली. अलीकडच्या काळात अरुण कोलटकर-सारखा प्रयोगक्षम कवी ' आकाशी बंगला, खालि पाय रंगला ', ' चक्की ', ' चरित्र ' सारख्या समर्थ कवितांतून ह्या लोकगीतांच्या परंपरेचंच पुनरुज्जीवन करताना दिसून येतो. शिवाय ' रानातल्या कविता ' मधूनही हेच लक्षात येतं. १९६० नंतरच्या या पिढीला अशा रीतीनं आधुनिक आणि समकालीन मूल्यभानाबरोबरच आपली पाळंमुळं संतकवितेत आणि लोकगीतात आढळून आल्यानं कवितेला सशक्त, समर्थ आणि गतिमान करता आलं.

१०

संतकवितेबाबत एक गल्लत होण्याची शक्यता आहे. अभंग हा संतांनी वापरलेला प्रकार मर्ढेकरांपासून करंदीकरांपर्यंत आणि पुढेही अनेकांनी वापरलेला आहे. पण संत-परंपरेत आपली पाळंमुळं शोधणं आणि अभंगात रचना करणं ह्या मुळातच भिन्न प्रवृत्ती आहेत. मधल्या काळात मधुकर केचे यांनी ' दिंडी गेली पुढे ' या आपल्या पहिल्याच संग्रहात ओवी–अभंगाचा उपयोग केला होता आणि क्वचित काही चांगल्या कविता लिहिल्या होत्या. पण त्यांच्या बहुसंख्य कवितांमधून ओवी–अभंगाचा ' प्रयोग ' म्हणूनच वापर झालेला होता. दैनंदिन जीवनात पूर्णपणे आणि उत्कटतेने बुडून गेल्यानंतरच्या विविध जटिल अनुभवांना व्यक्त करण्यासाठी आवश्यक अशा संवेदनशीलतेचा अभाव आणि कविता ' स्मार्ट ' करण्याचा त्यांचा सौंदर्यशास्त्रीय अट्टाहास या दोन गोष्टींमुळे त्यांना संतपरंपरेशी आपलं नातं नीटपणे जोडता येणं अशक्य होतं. म्हणजेच पर्यायाने त्यांनी अभंगाचा उपयोग निव्वळ उपकरण म्हणूनच केला. याउलट मनोहर ओक,

भालचंद्र नेमाडे, अरुण कोलटकर, नारायण सुर्वे, ‘ स्मरणपत्रा ’तले व ‘ कविता ’-नंतरचे दिलीप चित्रे, नामदेव ढसाळ, ‘ माणूस नाम का धरम ’ सारखी कविता लिहिणारे प्रकाश जाधव इत्यादी कवींनी अनुभवांचं सरळसरळ प्रक्षेपण, अनुभवांची जटिलता, आशयजन्य शैली, भाषेतला अस्सलपणा, सरळसोपेपणा, नवे शब्दबंध, आणि या सर्व गोष्टींच्या साह्याने जगत असलेल्या क्षणांचा किमान एखादा तुकडा सर्जनाच्या पातळीवर नेण्याचा केलेला प्रयत्न इत्यादीनून संतपरंपरेतील गुणविशेषांना आत्मसात करण्यासाठी चालवलेली धडपड प्रकर्षाने व्यक्त झालेली आहे, आणि संतपरंपरेशी आपलं नातं जोडण्याचा या कवींचा प्रयत्नही स्पष्ट झालेला आहे.

११

केवळ भाषा या एकाच घटकाचा विचार केला तरीही ह्या साठोत्तरी पिढीचं महत्त्व सहज लक्षात येण्यासारखं आहे. कुठल्याही कालखंडातील मराठी कवितेचा इतिहास पाहिला तरीही आजच्याइतकी विलक्षण भाषिक विविधता आणि संपन्नता त्या काळी सापडणं जवळजवळ अशक्यच आहे. दिलीप चित्रे यांनी ज्या अनुभवविश्वाच्या गाभ्याला स्पर्श केला ते विश्वच मराठीला अपरिचित असल्याने चित्रे यांना कवितेची नवी भाषाच निर्माण करणं अपरिहार्य होतं. भाषेविषयी विलक्षण जागरूक असलेल्या अरुण कोल्हटकरांनी दर कवितेगणिक नवी समर्थ भाषा वापरून ग्रांथिक आणि बोलभाषेतलं अंतर नष्ट करण्याचा प्रयत्न केला. नारायण सुर्वेंनीही महानगरीय जगातल्या कामगारवर्गाची आणि सामान्यांची भाषा सर्जनाच्या पातळीवर नेली. एका बाजूने संतकवितेतला लडिवाळपणा, उत्कटता आणि अपार मानवी करुणा आणि दुसऱ्या बाजूने जगता-जगता स्पर्शून जाणाऱ्या गूढ अनुभूती, एका बाजूने अधोविश्वातली भयावह गुन्हेगारी, अमानवीकरण आणि दुसऱ्या बाजूने जगणं सर्वोच्च समजून जगण्यावर विलक्षण श्रद्धा ठेवणारी माणसं–अशा द्वैताभोवती रुंजी घालणाऱ्या मनोहर ओकची भाषा, इंग्रजी वळणापासून मुक्त साधीसोपी सरळ चिंतनगर्भ अशी खास ‘ देशी ’ सामर्थ्य असलेली भालचंद्र नेमाडेंची भाषा, समग्र सामाजिक-राजकीय पर्यावरणात गुदमरवून टाकणाऱ्या अनुभवांनाच चिंतनाच्या पातळीवर नेणारी तुलसी परबची भाषा; दलित विश्वातली, दलित उपसंस्कृतीच्या तळागाळातून उमलून वर येणारी नामदेव ढसाळची आणि प्रकाश जाधवची भाषा, ध्वनि-इत्यादी घटकांना अंगभूत मानून कवितेला विविध परिमाणं देणारी र. कृ. जोशींची भाषा, आणि सातशे-साडेसातशे वर्षांच्या मराठी कवितेच्या भाषेला संपूर्ण छेद देऊन गद्यसदृश, विकारविरहित, केवळ महानगरीय संस्कृतीतच जन्म घेऊ शकणारी वसंत दत्तात्रय गुर्जर यांची भाषा, लोकगीतांतल्या जिवंत, प्रवाही लयी तोलून धरणारी आणि खेड्यातील संस्कृतीचं प्राणतत्त्व असलेली संपूर्ण एतद्देशीय अशी ना. धों. महानोरांची

भाषा–अशा कितीतरी विभिन्न भाषिक आविष्कारांनी १९६० नंतरची मराठी कविता संपन्न झालेली आहे. भाषिक विविधता ही अपरिहार्यपणे विभिन्न अनुभूतींची, आशयद्रव्याची परिणती असल्यामुळे ही कविता आधीच्या कवितेपासून आणि नंतरही जगण्याचा क्षीण प्रयत्न करणाऱ्या पंडितमार्गी कवितेपासून कितीतरी वेगळी आणि अस्सल होतीच, आणि मराठी कवितेला वैश्विक पातळीच्या समांतर नेण्याची क्षमताही तिच्यात निर्माण झालेली होती.

## १२

आधुनिकतेच्या निकषांवर पूर्णपणे उतरणारी १९६० नंतरच्या पिढीची ही कविता आजची कविता आहे. आजच्या जीवनाशी, जगण्याच्या प्रक्रियेशी प्रामाणिक असलेली, जगण्याला सर्वोच्च मानून जगणं किंवा जगण्याच्या प्रक्रियेतला किमान एखादा क्षण सर्जनात रूपांतरित करू इच्छिणारी, कुठल्याही प्रतिमा–प्रतीकांशिवाय, अलंकरणाशिवाय अनुभवांचे सरळसरळ प्रक्षेपण करणारी, अनुभवांची जटिलता पकडू पाहणारी आणि ती सम्प्रेषित करू इच्छिणारी, मर्ढेकरांनंतरच्या सौंदर्यवादी–रूपवादी समीक्षेनं कळत नकळत रूढ केलेलं विचारकविता आणि भावकविता असं वर्गीकरण नष्ट करणारी, आत्यंतिक बौद्धिकतेच्या फसवेगिरीत न अडकणारी, संवेगात्मक गाभा कायम ठेवणारी ही कविता आजची कविता आहे. या आजच्या कवितेचा सर्वसामान्य वाचकांना परिचय करून देण्यासाठीच हे संकलन संपादित करण्यात आलं आहे. कारण या संकलनातील बहुसंख्य कवी हे आपापल्या परीनं, गाजावाजा न करता, व्यासपीठावर उभं राहून कवितेच्या नावाखाली मनोरंजन न करता, गर्दीपासून दूर अव्याहत आणि निष्ठेनं कविता लिहीत राहणारे कवी आहेत. म्हणूनच कवितेच्या बहुसंख्य रसिक–वाचकांना त्या सर्वांचा एकत्रपणे परिचय असणं कठीण आहे. या संकलनातील कविता आजच्या कवितेचं, समकालीन आणि आधुनिक कवितेचं, नव्या कवितेचं प्रतिनिधित्व करते अशी आमची धारणा आहे. अर्थात या संकलनातील कवींबाबत, आणि कवींच्या विशिष्ट कवितांबाबत दुमत असणं शक्य आहे. आपल्या वर्तमानपत्री वाङ्मयीन संस्कृतीनं रूढ केलेल्या काही संकेतांनुसार अशा संकलनांबाबत ‘अमुक कवी ह्यात कशाला’, ‘अमुक कवी ह्यात कसा काय नाही’ किंवा ‘अमुक कवीची अमुक अमुक कविता पाहिजे होती किंवा नको होती’-सारखी विधानं कायम प्रसृत होत असतात याची आम्हाला जाणीव आहेच. सबंध मराठी कवितेचा प्रवाह लक्षात घेता आम्हाला ह्या संकलनातील कवी महत्त्वाचे वाटतात, कारण ह्या कवींना स्वतःचं अस्तित्व आहे, स्वतःचा चेहरा आहे आणि मराठी कवितेला त्यांनी नवी परिमाणं देण्याचा प्रयत्न केलेला आहे, मराठी कवितेचा आवाकाच वाढवण्याचा प्रयत्न केलेला आहे.

१३

जगण्याची प्रक्रियाच खरं तर सदासर्वकाळ कठीण, खडतर अशी प्रक्रिया आहे. ज्ञानदेव–नामदेव–तुकारामापासून नामदेव ढसाळ–प्रकाश जाधवपर्यंतच्या सर्वच काळात जगणं आव्हान झालेलं असताना, जगणं दिवसेंदिवस अधिकाधिक कठीण होत असताना, जगणं अर्थपूर्ण करण्याचा प्रयत्न करणारे, विशिष्ट मूल्यविवेक बाळगणारे आणि मूल्यांचं जतन करताना सर्व यातनांना निर्भयपणे सामोरं जाणारे हे कवी आणखी एका महत्त्वाच्या मुद्द्यावर एका संकलनात समाविष्ट केले जाऊ शकतात : जगण्याला सर्वस्वी प्रतिकूल आणि म्हणूनच जगण्याच्या प्रक्रियेतच अनुभवांचं केंद्र शोधणाऱ्या सर्जनालाही प्रतिकूल अशा आजच्या काळात सर्जन जगवण्याची मूलभूत समस्या या सर्वांनाच एका समान पातळीवर आणून ठेवणारी गोष्ट आहे. कदाचित असंही असेल की भयावह संत्रस्त अशा, कायम गुदमरून टाकणाऱ्या बाहेरच्या, आजूबाजूच्या पर्यावरणात हरवलेला जगण्याचा अवकाश हे साठनंतरचे कवी आपल्या सर्जनातून, कवितेतून शोधत असावेत. त्यांच्या कवितेचं हे प्रातिनिधिक स्वरूप समोर ठेवताना आम्हाला या कामी ज्यांचं सहकार्य झालं त्या कवींचे, त्यांच्या कवितेचे हक्क ज्यांच्या–ज्यांच्याकडे आहेत त्या सर्वांचेच मनःपूर्वक आभार मानतो. आणि शेवटी हा ‘ अव्यापारेषु व्यापार ’ करणाऱ्या प्रकाश रानडेंचेही आभार !

**--ना. धों. महानोर / चंद्रकान्त पाटील**

# अनुक्रम


## १. अरुण कोलटकर

बेहद्द नाममात्र घोडा २
इराणी ३
ग्लुकोज / सलाइन ५०० सी सी ४
मुंबईनं भिकेस लावलं ६
चरित्र ९

## २. दिलीप पुरुषोत्तम चित्रे

जुलाय : १९५६ १३
चंद्र आणि खेचर १६
सिंफनी तिसरी १७
पिसाटीचा बुरूज २२
स्मरणपत्र : पहिले तुकडे २५

## ३. नारायण सुर्वे

माझी आई २९
सत्य ३०
पोष्टर ३१
संवाद ३३
जाहीरनामा ३४

## ४. भालचंद्र नेमाडे

पिंगट रानाला राघू सोडून चालले ४०
कशा रांगोळ्या काढता तुम्ही, घरंदाज व्यथांनो ! ४१
पाठीशी भिन्त तुझ्या ४२
सहजासहजी अंगावरचे डाग मनावर टिपून घेतले ४३
हे लांब लांब रस्ते कधी जुने होत नाहीत की बदलत नाहीत ४४

५. मनोहर ओक

जे दिलं जातं ते घे-घेता आलं तर. मागू नको ५२
माझी स्वप्नं चौकात पडलेली सांडपाण्याबरोबर पाहून वाहून ५२
हे सगळ्याहून प्रियतम माझे अंधार ५४
झाड हे झाड नसतं ५५
थंड निळाओस एकान्त ५७

६. ना. धों. महानोर

रातझडीचा पाउस ५९
पक्ष्यांचे लक्ष थवे ५९
घन ओथंबुन येती ६०
पाण्यात पारा ६१
गोऱ्या देहावरती ६१

७. गुरुनाथ धुरी

घुबडतोंडं मरण आलंय सजून राजवस्त्रांत ६४
आज कित्येक कल्पांनंतर उघडतंय भूपृष्ठ ६४
घंटानाद ६७
दान ६७
समुद्र ६८

८. वसंत दत्तात्रेय गुर्जर

रिकामा रंगमंच ७२
लायनी जन्माचे भोग ७३
ही एक गोष्ट लाटांची ७४
समुद्राला आंदण हे शहर ७५
आम्ही माणूस म्हणून जन्माला आलो ७६

## ९. सतीश काळसेकर

महाबलीपुरम्  ८१
ईश्वरासाठी शोकगीत  ८१
संभोगाच्या रात्री  ८४
तसं तिच्या घराच्या माथ्यावर  ८६
त्या जाहीर शिरकाणानंतर  ८७

## १०. तुलसी परब

कमळांचा सव्वीस अर्थ सांगणारे कुडबुडे  ९०
ते । तू । आपण । सर्व  ९०
पडत धडपडत हेकेखोर वेड्यासारखा  ९२
ही अखंड उलाढाल. ही सामुद्रधुनीच्या  ९३
मेलेल्या बाईची छाती, पोट आणि मांड्या  ९४

## ११. वसंत आबाजी डहाके

फ्रान्झ काफ्का, डिसेंबर १९६७  ९७
कीटक  ९८
उत्तरार्ध : विसाव्या शतकाचा, माझा  ९९
खिडकी  ९९
नाटक  १००

## १२. चंद्रकान्त पाटील

सहासष्ट अखेरच्या मुंबैवर पहिली कविता  १०३
आयसोलेशन वार्डातून  १०३
जगण्यातल्या असंख्य पातळ्यांमधली एक पातळी  १०५
दैनंदिनीच्या सूक्ष्मदर्शक भिंगातून आरपार बघताना  १०७
मी सजवला माझा महाप्राण  १०८

## १३. नामदेव ढसाळ

लाही दारिद्र्याचं स्वतंत्र शेत आहे  ११०
पाणी  ११०
एक हंगामी कविता  ११४
कुत्रा आणि प्रजासत्ताकाचे गाणे  ११५
'प्रियदर्शिनी'तला उतारा  ११७

## १४. प्रकाश जाधव

कवी  १२२
आणि आता दोन मुलं झाल्यावर  १२२
कविता : सफेद दाढीतल्या लेंडूरसाठी  १२६
काल  १२७
साकी  १२७

## १५. र. कृ. जोशी

हस्ताक्षरकविता : दोघे एकटे एकटे  १३१
मुद्राक्षरकत्रिता : तुझं माझं काही नाही  १३३
मुद्राक्षरकविता : व्यवहार  १३५
दृश्यकविता : "  " + '  '  १३६
ध्वनिकविता : क्क आणि ⌒  १३७

# पुन्हा एकदा कविता

# अरुण कोलटकर

जन्म : १९३२, कोल्हापुरात. शिक्षण तिथंच. मॅट्रिक काठावर पास. नंतर राहायला मुम्बईतच बहुतेक. चित्रकला वगैरे. उपजीविकेचं साधन जाहिरातबाजी. १९५५ पासनं कविता इकडं तिकडं मासिकातनं वगैरे प्रकाशित होतायत. नेमानं अशा कधीच नाहीत. मराठीत आणि इंग्रजीत. ' अरुण कोलटकरच्या कविता ' हा आत्तापर्यंतच्या बहुतेक सगळ्या मराठी कवितांचा संग्रह अशोक शहाण्यानं प्रास प्रकाशनतर्फे प्रसिद्ध केलाय्. इंग्रजी कवितांचं एक पुस्तक क्लिअरिंग हाउसतर्फे बाहेर पडलं, ' जेजुरी '. शिवाय इंग्रजी व मराठीत अनुवाद.

' जेजुरी 'ला राष्ट्रकुलातील उत्कृष्ट संग्रहासाठी ठेवलेले पारितोषिक. शिवाय अनेकदा कमर्शियल आर्टिस्ट गिल्डची अखिल भारतीय पातळीवरची बक्षिसंही जाहिरातींसाठी मिळालेली आहेत. ' ऋचा ' या मराठी अनियतकालिकाने आणि ' आवेग ' या हिंदी लघुपत्रिकेने डिसेम्बर १९७७ व जानेवारी १९७९ मधे ' अरुण कोलटकर विशेषांक ' प्रकाशित केलेले आहेत.

कवितेसंबंधीची त्यांची मतं ' ऋचा 'मधील त्यांच्या मुलाखतीत आलेली आहेत. खालील काही ओळी त्यातूनच घेतलेल्या आहेत :

" ....एका बैठकीत मी कविता पुरी केली असं क्वचितच.
आणि एकदा लिहिलेल्या ओळीत दहादहादा बदल केल्याशिवाय मला
चैनच पडत नाही म्हटलं तरी चालेल.... मी ज्या ज्या कविता वाचल्यात त्या
सगळ्यांचीच माझा काव्यविषयक दृष्टिकोण जो काही असेल तो घडवायला कमीअधिक
प्रमाणात मदत झाली असणार हे उघड आहे. पण एका कवीचा संस्कार माझ्या
कवितेवर झाला असं मला जाणवत तरी नाही.... सध्या माझी कविता चाललेली आहे
ती वाट सर्वसामान्य वाचकाच्या घरावरूनच जाते. पण ती तिथं थांबणार नाही. पुढं
जाणाराय्– कविताबिविता वाचायच्या भानगडीत सहसा न पडणाऱ्या रसिकाच्या
शोधात.... कवितेच्या कोणत्याही व्याख्येत बदलबिदल करण्याच्या फंदात मी पडत
नाही. प्रत्येक कविता लिहिताना एक नवी व्याख्या करण्याचा प्रयत्न असतो.... "

## १. बेहद्द नाममात्र घोडा

बेहद्द नाममात्र घोडा.
त्याचा उगम आणि विकास गूढ.
कॅन्सरसारखा. त्याच्या
हाडामासाने मातीशी द्रोह पत्करलेला.
त्याच्या खोडदौडीच्या वळणदार वणव्याला
वेग एखाद्या हल्ल्याच्या अफवेचा.
त्याच्या ओवीबद्ध टापांचे
खणखणीत बोल
भाकरतुकड्याइतके ढळढळीत.

पण विलीन पाषाणयुगांचे जख्खड राजेरजवाडे
(त्यांच्या म्यानातच अमरत्व गंजलेले)
नकली नाण्यांच्या दहशतवादी सुळसुळाटाने
डोंगर हादरले अर्थव्यवस्थेसारखे
पाहून त्याच्या यमक्या टापांचे कथनकौशल्य
परंपरागत निद्रेतून उठले
सिंहासन सोडून परागंदा झाले.
स्फोटक सिगारेटप्रमाणे निरागस दिसणारी
नाणी मात्र तशीच पडून राहिली
घोड्याच्या टापांनी वाटेवर उधळलेली.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
23882

## २. इराणी

इराणचा चकणा शहा पाहतो तडकलेल्या व सस्मित
काचेआड केकला चढणारी क्रमिक बुरशी.
क्वचित विचलित करते त्याचे लक्ष सुशिक्षित
बेकाराला राखी बांधताना अकृत्रिम माशी.

चित्रातील वनराजीच्या कुशाग्र निर्जीवतेस व्यग्र
करीत नाही वारा; अन् सरळ सरोवराचे विपर्यास
वाकडा हंस. सुईसारखा सीधा मार्ग
अग्रावर तोलतो राखीव बंगल्याचा रेखीव आभास.

अशा निसर्गचित्रांची होते ग्लासात अविद्राव्य तारांबळ
घोटागणिक परिच्छेद पाण्याचा लांबताना तृषार्तासमक्ष.
जिज्ञासूंचे वेधू इच्छिते चहाचे विचक्षण वर्तुळ
विचारप्रवर्तक टेबलाच्या महत्त्वाच्या भागाकडे लक्ष.

खुर्चीखालील अंधारांना निमित्त झालेले मांजर,
गतप्रभ दुश्चिन्ह, सांभाळते दुटप्पी झोपेत दोन
सापत्न स्वप्नप्रपंच. दिशांची अफरातफर
करून बिलोरी मंत्रिमंडळ पिकवते अप्रच्छन्न प्रतिबिंब

सिगारेट पेटवून बेकार ठेवतो जळणारी काडी
चहाच्या वर्तुळात जी उठून बसते विझताना जरा.
अगत्यशील जशी लाश बर्फाच्या लादीवर उघडे
समशीतोष्ण कोणी आलासे वाटताच सगा सोयरा-

## ३. ग्लुकोज / सलाइन ५०० सीसी

सिस्टर कॅरोलला सर्जन ग्रिफिथच्या मिठीत
पस्तिसाव्या पानावर सोडून
सिस्टर सेथना माझ्या उशाशी येते
आणि सिरिंजमधे औंसभर पाणी घेते

नाकातून निघालेल्या नाळेच्या कंसात
दूर खुर्चीत बसलेली आई दिसते
मांडीवर उघडा दासबोध डोळ्याला चष्मा
घशात जाणवते एक थंडगार उद्गारचिन्ह

इंट्रावीनसची पाचवी बाटली रिकामी होते
आणि सिस्टर सेथना स्टॅंडला सहावी लटकावते
ही शेवटची ‘ I love you Carol ’
‘ And I love you too ’ कॅरोल म्हणते

एक दोन तीन चार पाच : काचेच्या
बोटभर पोकळीत पुनः पुनः जमणारा
सेलाइनचा थेंब विश्वाचं केन्द्र होऊन राहिलाय
उजवा हात सबंध आखडून गेलाय

टेबलावर रामदासाला उताणा ठेवून
आई पलंगाशेजारी येऊन उभी राहते
सेलाईनचा तेरावा थेंब टचकन उमटतो
आणि तिच्या उजव्या गालावर चमकतो

पाय चेपू का ? मी म्हणतो नको
चष्म्याच्या डाव्या काचेतून तिचा डोळा दिसत नाही
फक्त – एक उघडी खिडकी आकाशाची मळभ
कदाचित पक्ष्याचा एक ठिपका तरळून जातो

हवेतल्या हवेत रामदास कागदी लाथा झाडतो
जन्म दुःखाचा अंकूर जन्म शोकाचा सागर
जन्म भयाचा डोंगर चळेनासा
आई परत जाते व रामदासाला मांडीवर घेते

इंट्राव्हीनसच्या थेंबाथेंबीत माझं मात्र घड्याळ झालंय
( कधीही न संपणारं कितीही न वाजणारं
निशिगंधाचा बूके कुणी पाठवलाय तो
सिस्टर सेथना फ्लॉवरपॉटमधे अरेंज करतेय

Do you like flowers ? मी विचारते
Not particularly मी म्हणतो
इतक्यात माझा भाऊ येतो चेहरा फुललेला
इंडियानं टेस्ट जिंकली न्यूझीलंडचा धुव्वा

लघवी होइलसं वाटतं मी सिस्टरला सांगतो
आई व भाऊ बाहेर जातात सिस्टर दार बंद करते
मुताचं भांडं घेऊन मी दहा मिनिटं पडून राहतो
होत काहीच नाही. )

## ४. मुंबईनं भिकेस लावलं

मुंबईनं भिकेस लावलं
कल्याणला गूळ खाल्ला
ज्या गावाला नाव नव्हतं
पण एक धबधबा होता
तिथं एक ब्लँकेट विकलं
अन् पोटभर पाणी प्यालो

पिंपळाची पानं चघळत
नाशकापर्यंत आलो
तिथं तुकाराम विकला
अन् वर खिमापाव खाल्ला
जेव्हा आग्रारोड सोडला
तेव्हा एक चप्पल तुटलं

ओहोळात नीट आंघोळ केली
अन् पहिलंच दार ठोठावलं
तिथं भिक्षा मागितली
अन् गावाबाहेर पडलो
झाडाखाली पोट भरलं
पण तहान भागली नाही.

एक गाडीवाला होता
त्याला नावगाव सांगीतलं
गाडीवाला म्हणाला
जळो जिणे वगैरे

सहा अरुण कोलटकर

पुढं त्याच्या मळ्यावर
थंडगार पाणी प्यालो

नंतर आलं रोटेगाव
तिथं पंचायत भरली
अन् देवळात कुत्रा मेला
रात्रभर कण्हत ओरडत
अंधारात अन् उशाशीच
ते मढं ओढून नेलं

तिथं भाकरी मिळाली
पण एक बाई मुतत होती
ती अंधारात दिसली नाही
ती म्हणाली रांडेच्या
भाड्या डोळे फुटले का
भोसडीच्यांना भाकरी

वाटेवर गुऱ्हाळ दिसलं
तिथं ऊस मागून खाल्ला
विष्णुक्रांतावर हगलो
कडुनिंबानं पुसलो
रस्त्यात विडी सापडली
ती खिशामधे ठेवली

खूप रखडंपट्टी केली
त्या वर्षी दुष्काळ होता
एक मेलेला बैल पाहिला

एक टेकडी चढून गेला
टेकडीवरच्या देवळातून
नवसाचा पैसा घेतला

कोपरगाव मोठं तिथं
स्टॅलिन मेल्याचं वाचलं
कोपरगाव मोठं तिथं
भीक मागायला शरमलो
अन् पाच दारं ठोठावली
तर अर्धी मूद मिळाली

धूळधुवट डोसकं दाढी
टाळक्यावर उन्हाचा घण
रात्र फरशीवर काढली
म्हणून खाजणारं ढुंगण
पावलात ठोकलेली यात्रा
पत्र्यासारखी तापलेली

जांघेत गोळा झालेलं
धोतर सारखं करायला
थबकलो दोन मैल स्टेशन
पुढं गाव तीन मैल मागं
तेव्हा घाम डोळ्यांत गेला
आणि एक चित्र दिसलं

रस्त्यास लागूनच कुंपण
आत सारवलेलं अंगण

एक झोपडी एक म्हातारा
दारात उभी सून की कोण
तिथं मागितलं पाणी
ते ओंजळीनं प्यालो

ओल्या कोपरानी पाह्यला
सगळाच प्रेमळ म्हातारा
शुभ्र चांगुलकी दाढी
सोपे समाधान डोळे
अर्धा अधिक कातरलेला
पुढ्यात राकेलचा डबा

न मागता मिळालेली
कांदाभाकर खाऊन उठलो
ढुंगणाखालची हॅवरसॅक
उचलून पाठीवर घेतली
मग दोन मैल विचार केला
अन् परतायचं ठरवलं.

## ५. चरित्र

नाळेला गाठ मारून सुईण म्हणाली
पेढे आणा हो पेढे आणा
कानाला सुई टोचून सोनार म्हणाला
दोन रुपये झाले दोन रुपये

दंडाला देवी टोचून नर्स म्हणाली
अजिबात दुखत नाही अजिबात

बुलीला पट्टी लावून बबन म्हणाला
तुझ्यापेक्षा माझं मोठ्ठाय तुझ्यापेक्षा माझं
पाठीवर गुद्दा मारून बबन म्हणाला
तुझ्या बापाची न् माझ्या बापाची कुस्ती लागली तर
घोट्यावर लाथ मारून बबन म्हणाला
रडुबाई कुठला रडुबाई

पावलाला पाऊल लावून बनी म्हणाली
सायकल सायकल खेळूया सायकल सायकल
पोटाला थुंकी लावून बनी म्हणाली
डॉक्टर डॉक्टर खेळूया डॉक्टर डॉक्टर
कुशीचा चिमटा घेऊन बनी म्हणाली
पांघरुणात ये पांघरुणात

डोक्याला चापट मारून एक मास्तर म्हणाला
तेतीस अडचे किती तेतीस अडचे
कानाला पिचकी मारून एक मास्तर म्हणाला
शेफील्ड गाव कुठाय मग शेफील्ड गाव
मांडीवर हात ठेवून एक मास्तर म्हणाला
आंबेवनात चल आंबेवनात

मुंडी मुरगाळत न्हावी म्हणाला
हालू नका साहेब हालू नका
छातीला टेप लावून शिंपी म्हणाला

एकतीस इंच फक्त एकतीस इंच
पाय बुटात कोंबत चांभार म्हणाला
घालून घालून सैल होईल घालून घालून

पाठीवर चढून पोरगा म्हणाला
घोडा घोडा हैक हैक घोडा घोडा
पोटावर पाय देऊन बॉस म्हणाला
इलाज नाही मिस्टर नेने इलाज नाही
लंड पकडून बायको म्हणाली
कापून टाकीन एक दिवस कापून टाकीन

गोटीवर लाइट मारून एक डॉक्टर म्हणाला
हायड्रोसिल नक्कीच हायड्रोसिल
पावलाला पिन टोचून एक डॉक्टर म्हणाला
महारोग नक्कीच महारोग
पोटावर चापटी मारून एक डॉक्टर म्हणाला
अल्सर अल्सर नक्कीच अल्सर अल्सर

पायावर पाय देऊन एकजण म्हणाला
सॉरी यार सॉरी
डोळ्यात छत्री घालून एकजण म्हणाला
माफ करना भाई माफ करना
अंगावर ट्रक घालून एकजण म्हणाला
दिखता नही मादरचोद दिखता नही

# दिलीप पुरुषोत्तम चित्रे

जन्म : १९३८; कवी, कथाकार, नव्या कवितेचे समीक्षक, अनुवादक, पत्रकार; 'शब्द' या लघुपत्रिकेचे एक संपादक; 'न्यू क्वेस्ट'चे काही काळ संपादक, सल्लागार, स्तंभलेखक वगैरे; 'कविता' ( १९६० ), 'कवितेनंतरच्या कविता' ( १९७८ ) हे कवितासंग्रह; 'ऑर्फियस' हा कथासंग्रह; 'शिबाराणीच्या शोधात' हे प्रवासवर्णन; 'Travelling in a cage' ( १९८० ) हा इंग्रजी कवितांचा संग्रह; 'An Anthology of Marathi Poetry' ह्या मराठी कवितांच्या इंग्रजी भाषांतराचं संपादन; काही वर्षं इथियोपियात नोकरी; इंटरनॅशनल रायटर्स वर्कशॉपच्या निमित्तानं काही वर्षं अमेरिकेत; तिथं तुकारामाच्या १०० अभंगांचा इंग्रजी अनुवाद; सध्या कमर्शिअल आर्टिस्ट.

आपल्या एकंदर लेखनाबाबतची सविस्तर भूमिका चित्रे यांनी 'ऑर्फियस' या कथासंग्रहाच्या शेवटी ( १९६८ ) विशद केलेली आहे. "....**वाङमया**विषयीच्या प्रचलित कल्पनांचे व संकेतांचे माझ्यावर दडपण पडत नाही. याउलट, **भाषेबद्दल** मी जास्त जागरूक असतो, कारण **भाषे**द्वारा मी स्वतःशी व इतरांशी विनिमय तर करतोयच, पण शब्द हे मला कच्च्या किंवा अत्यंत चलनी पदार्थांसारखे वाटतात.... शब्द घडविणाऱ्याने अनुभवाचे पेच शब्दाशब्दांत अत्यन्त विशिष्ट रूपात व्यक्त केलेले असतात : शब्दांची निवड, त्यांचा अनुक्रम, त्यांचे समुच्चय एकत्र प्रतिमित करण्याची रीत, त्यांचा छंद—अशा अनेक गोष्टी अनुभव विशिष्ट सूत्रात त्याने गोवलेल्या असतात. भाषेच्या व्यापक संकेतव्यवस्थेने वेढलेल्या, पण सूक्ष्मपणे या संकेतांची सद्दी डावलून स्वतःचे संकेत त्यात थाटणाऱ्या, एखाद्या बेटासारखी प्रत्येक कविता असते. कित्येकदा तर कवितेतली भाषा ही प्रचलित भाषेशी उघड द्रोह पत्करते : असा उघड द्रोह प्रचलित भाषासरणी मोडून प्रकट होतो : तर कधीकधी, अगदी साळसूद व साध्या भाषेत, आपली संकेतव्यवस्था गुप्त ठेवून, तिर्यक्‌पणे कवी प्रचलित भाषेशी द्रोह करतो....काव्य भाषेशी जो द्रोह करते तोच द्रोह प्रत्येक कविता काव्यपरंपरेशी करत असते...."

१. जुलाय् : १९५६

—१—

इथे आणि आतां—
माझ्याभोवतीं प्रलय जमतो आहे सघन अंधारात
तुझ्या सुगंधाच्या. उद्या उमलेल भविष्यासह.
पण आज तूं माझ्यांत आहेस, सहन करतांना
माझे पहिलें सौंदर्य आणि आत्मक्रौर्य.
मृत्यूहूनही निश्चित आज माझे ओठ तूं ज्यांचें चुंबन.
फुलांच्या पाकळ्या
गळून पडतांना उमगेल तुलाहि अवकाशरहस्य.
...किती किती रूपें सरकतात तुझीं डोळ्यांमधून
मावळत्या दर्पणांत, जिथें सूर्य बुडतात....
प्रत्येक तुझ्या हालचालींत ती लय आहे मृत्युमयी
आणि वहात जाणारी, झांकळल्या कुसुंबी संध्येच्या सरोवरांत

—२—

बुडून जा; बुडून जा; बुडून जा. या घनांध वेळी. आपल्या रक्तांतून
अनंगआषाढ पसरत जातांना. वेदनेला वश झालेली
तुझी आकाशव्यापी क्षुद्रता मला हवी आहे; बुडून जा
माझ्यांत हद्दपार हो! या मेघपर्णांच्या अनुपम वस्त्रांतून झुळझुळून
ज्या क्षणाला तूं कोसळशील क्षणिक मृत्यूच्या बेफाम अंधारांत
आणि तुझ्या फक्त पाकळ्याच उरतील माझ्या बाहूंमध्यें.
राख हो वितळून जा माझ्या सूर्यार्द्र रात्रींत.
फळल्या ऋतूच्या अंतिम शय्येवर. ‘ ये ’ म्हणतों आहें,
‘ फक्त एकदां आणि कायमची ’

—३—

आणि मी पाहतों आहें पशूप्रमाणें वा ईश्वराप्रमाणें
ज्याच्या डोळ्यांची सत्ता आहे इथें आणि या वेळीं :
तुझ्या डोळ्यांचे धागे अनंतांत गुंतलेले संवेदनांच्या चांदण्यांत.
माझे निर्वाण माझी शांती मीं तुला विकली एका स्मितासाठीं
क्षणाक्षणानें निरर्थक होणाऱ्या; बुडून जा. आणि तळहाताच्या
नाजूक रेषांमध्यें गुंतवून टाक तुझें माझें आयुष्य.
अतर्क्य आपल्या संबंधांवर करूं दे डोळ्यांना मोर्तब
आंधळेपणाचें. शवनिरासाच्या पहिल्या क्षणाला....

—४—

तुझ्या डोळ्यांच्या
पलिकडे काय आहे?.... लाटा? .... कीं गोठलेलें चांदणें, हिमशुभ्र
संगीत निःस्वरतेचें? मरणेंद्रियांना आवाहन करणारा क्रूर परमार्थ?
मला समजत नाहीं, मला उमगत नाहीं, मला कळणार नाहींच.
पण म्हणूनच तूं माझी आहेस, माझ्याहून, माझ्याविना.
काळाचे चित्रबंध; विचित्र-बंध, चित्र-विचित्र-बधं. कुणीं टाकले
मंतरलेले सप्तरंगी फासे पटांवर जीवन्मृत शरीरांच्या?

—५—

....हा प्रकाश पाहिला होतास? नाहीं? मग कशासाठीं
स्वतःच्या मांसाचा अंधार नैवेद्य घेऊन गेलीस? माझ्यासाठीं
रात्रीच्या पेल्यावर अजून दिवसाचा फेस आहे. जळता तडा
विझला तरीही. नेटक्या हातानें सारवून अंगण

पापाचें, अंथरला जेथें पारिजात दवाच्या डोळ्यांनीं. आपण बनलों
पृथ्वीच्या गालावर ईश्वरी चुंबन. ठिबकलें रक्त रतीच्या डोळ्यांतून

—६—

जुलायच्या डोळ्यांत उन्हें उतरतात मधून, हळूच
झांकतात डोळे पावसांत मिटलेले अबोलक्या तंद्रींत
मीं तुला विचारलें आहे. तुझा आधार बनलों आहें, कारण
तुझ्याविना मी असंबद्ध आहें अथवा सूर्यबद्ध.
....रिल्कच्या ओळी.... निश्चलतेच्या बिया....
निराकाराचा मधुर रस.... निष्फळाच्या फोडी सुबक बशींत....
पहिली न्याहारी....! पोरी! तुझा वेडेपणा माझें हृदय हादरवतो.
कानावर ठोठावतात तुझ्या हांका. माझी शांतता
आवाजाहूनही कर्कश बनते, तूंच दिली आहेस
मला मुठींतली स्वतःची माती, मूठमाती दिल्यावर
जिथें तुळशीच्या डोळस मंजिऱ्यांनीं झांकून जाईल
माझ्या आयुष्याचें वैष्णव गाणें.... चितेची राख.

—७—

जुलाय एकोणीसशें छप्पन्न! निरर्थक शब्द. कालविभ्रमाच्या
अनंत संदर्भांत
पण मला आठवेल. श्वास वाहून गेल्यावरही महापुरांत :
तूं माझा पहिला बळी होतीस, पहिला साक्षात्कार.
माझ्या ओसाडपणाचा तूंच घेतलास पहिला सुग्रास.
चिमण्या गात्रांना क्रौर्य भरविणारीं अग्निकोमल बोटें
सतत थरारतील अभौतिक गाण्यानें. जा बुडून;

जा विरघळून; माझ्यासाठीं; माझ्यांत; एवढें ऐक ना !
....इथें थांबतात शब्द; पापण्यांच्या कडाशीं, वर्षेचें काजळ घालून भारलेल्या.

—८—

अखेरच्या संध्याकाळीं ही मागणी, मावळल्या नारायणा !
आमच्या शवांना रात्रीचा आशीर्वाद दे, यानंतर.
फुलें होऊं देत प्रत्येक प्रेरणेचीं कोमेजून दिगंतर. आणि तूंही बुडून जा; पुन्हा न उगवण्यासाठीं.

## २. चंद्र आणि खेचर

चरतात एका फाळलेल्या माळावर
अंधार समजून गवत प्राणिमात्र....
रात्रीत विरघळते माझे ढेकूळ
आसमंत गढूळ करीत. पण मग स्वच्छ
होतात माझे डोळे पाहून उजळ
चंद्र आणि एक मुग्ध झालेले खेचर
स्वतःच्या सावलीवर....
पाण्यात चांदण्याने रडलेलं अक्षर
मासोळीची लाटभर ओल होऊन
पोहतंय माझ्या गळक्या ढेकळाच्या
गढूळ आसमंतात....अशी वेळ.
आणि गवत समजून स्वतःच्या सावलीचं
खेचर चांदणं चरतंय....

माझी माती बसते जाऊन रात्रीच्या तळाला
मासोळीच्या सुळकांडीची लाट पकडतो
प्रत्यक्ष अवकाशाचा गळ

चंद्र समजून मी पाहिलं
त्या मुग्ध खेचराचं चरणारं चांदणं.

## ३. सिंफनी तिसरी

मी
एक दरवाजा
अवकाशात उघडलेला
घळघळती तीव्र शेंदरी रेघ
निळ्या शान्ततेत
न वाकडी
न सरळ
न वळसा घेणारी
गच्च
मुक्त
तीव्र
जशा माझ्या फाटक्या चपला
शरीराच्या चपला काढून ठेवून
तुझ्या जननेंद्रियाच्या चितेवर
मी अग्निप्रवेश करतो
तशी एक
फक्तगच्च मुक्तबंध कल्लोळती बारीक रेघ.

दि. पु. चित्रे सतरा

एकेक शब्द
मी उतरून ठेवतो
अंगमुक्त होत
माझे बांधबंधारेसुद्धा
बेहोश होतात
रूपहीन
हा माझा शेवटचा ओघ
प्रकाशात आणि अंधारात
सतत निवळणारी
ही उद्युक्त रेघ
फक्तगच्च
फक्तगच्च
देठातून
भळभळणारी फुलं...

रिकाम्या तळहातात
सगळ्या जगाचा भार घेऊन
एवढ्या मोठ्या डोळ्यांत
गाभाऱ्यात वाढणारी
तीव्र टोकदार रेघ जपून
आता आणखी
कुठवर सदेह ?
नक्षत्रांच्या निवडुंगांखाली
आपली नागडी शरीरं
घवघवीत हिरव्या गवतात
बागडली
वर चांदण्यांच्या बाभळी होत्या
खाली दगडगोटे
एकमेकांत आपण भळभळलो

भोवताली
भस्म होतं
भस्म होतं
संवेदनांचे विक्राळ पट्टे होते
अवकाशाचे पिंजरे होते
तू मी मिळून
एकच पिपासू
बंदिस्त पशू होता
एक हास्यकल्लोळहुंदकाडरकाळी होती अन् नंतर
जगाची डहाळी
वाकली होती
आपल्या
चुंबनाच्या तळ्यावर
पण दरम्यान
एक शांत
अनारंभ आरोळी होती
मधे पूल नव्हता
फक्त जेट विमानानंतरची
धनांध शांतता होती
आणि एक अंगोपांग फैलावणारा
पखवाज होता
धमन्यांवर चढलेल्या
धमन्यांत.

एक शरीरांची संक्रांत
रक्तमय क्रांती आणि अरांजक
एक झांज
पहाट, तिन्हीसांज...

दि. पु. चित्रे एकोणिस

घण घण
घण घण घण घण
लाटांच्या घंटा टोलवतात
भरतीओहोटीचं
खोल देऊळ
उभारते आणखी कोसळते
ढासळते
फेसाळते पूजा
त्या मांसल, तट्ट त्रिकोणावर
काळं गवत थरारलंय
मधोमध लालसर जांभळे
स्फुंदणारे ओठ
एक गव्हाचा दाणा
सत्त्वगच्च ताठरलेला
मी बोटांनी; ओठांनी शोधतो
श्लीलतेचं
काळभोर परम-बोंड
जणू वादळी काळोखात
प्रत्येक पीस आगीसारखं फुलवून
एक कोंबडा फोफावतो
चंद्राच्या कोयत्याखाली
मैथुनाच्या बुंध्यावर
जन्मस्थानी
वधस्थानी
साक्षात्

स्पर्श
सुरीसारखा पहिला स्पर्श
जेव्हा जन्मजन्मांची पाती पेरली जातात

मैथुनाच्या जात्यात
कोसळतात मूठ मूठ आंधळे जोंधळे
रगडली जाते जाणीव
पिठूळ वस्त्रगाळ
एकमेक
सांडतात
भरडल्या
दगडामधून
जगभर
ऐकू येतेय् मला
एक ओवी
एक तंत्र आणि कोडं
कानांवर मुक्यानेच
रांगोळी घालणारं

अणूच्याही आडून
आरोळी आरम्भत येताना दिसते
एकच लखलखती वेदना येते
आणि जन्माचं कुंपण घालून जाते
एका रिकाम्या काळ्याभोर
सताड डांबरी रस्त्यावर
भरधाव मोकाट एक मिल्कव्हॅन
दुधाची वाढती थारोळी सांडत
निघून जाते
तुझ्या रक्ताला दूध येतंय्
माझं अंग चिंब झालंय्
चरित्र शर्टासारखं चिपकलंय् मला
अनपेक्षितपणे न्हालोय्
कुडकुडतोय्

ह्या तुझ्या अमानुष प्रेमाच्या थंडीत
गळ्यात रुळणाऱ्या नररुंडमाळेतलं एक तोंड
तुझ्या स्तनाग्राला भिडलंय्...

## ४. पिसाटीचा बुरूज

समोर सूर्यास्ताचं खिंडार
हवा दारूगोळ्यासारखी तीव्र
हे संध्याकाळचं लोखंड
हा इतिहासबाह्य साखळदंड
हे डोंगर, ह्या दऱ्या, ही पठारं, ह्या खिंडी,
हे कडे, ह्या कपारी, हा निरुपयोगी बुरूज
आणि ही ढासळून गेलेली तटबंदी,
सगळं उघडं पडलंय्
न वाली, न कैवारी कोणी
अशी एक आणीबाणी
ह्या बिनवस्तीच्या बुरुजावर
फक्त दगडी बाकावर बसलेला मी
आणि सभोवार काळेभोर वारे
पश्चिमेला पिंजारलेला विस्तव
आणि आकाशभर
भराभरा पसरणारी राख
इतिहासबाह्य बुरुजावर
माझं चरित्रबाह्य मीपण घेऊन
स्तब्ध, एकटक, दगडी समाधीत
मी : ह्या बाकावर बसलेला मुक्त कैदी.
हे पहाड, हे फत्तर, हे डोंगर, हे कातळ,

ही पठारं भरडली जातायत माझ्या जठरात
पोटात जन्मभर जे ॲसिड पोसलं
त्यात आख्खा सह्याद्री विरघळून जातोय्
माझ्या वृषणात त्रितळतील हे पर्वत
माझ्या रेताला येईल ह्या पाषाणांचा वास
माझ्या रक्तातून वाहातील हे कडे, ह्या कपारी
माझ्या मस्तकात फिरतील
हे पिसाटीच्या बुरुजावरले
काळेभोर वारे.
काळोखं बीज ताडकन् फुटून लख्ख झालेली
माध्यान्हाची पांढरीशुभ्र लाही
मी अनुभवलीय्.
मी अनुभवलीय्
वेदनेची टच्च–टपोरी कळी
अचानक फुलाचा उच्छाद मांडणारी
उघड्या पाकळ्यांनी.
मी भोगलाय्
भुईत तीव्र तसू–तसू रोवणाऱ्या मुळाचा
सक्त आवेग.
आणि आता ह्या अपंग क्षणी
सर्वचक्र थांबलं असताना
फत्तरकपारीतले खडबडीत अर्थ
शोधणारी माझी बोटं चूप
कडेलोटांकडे एकटक पाहणाऱ्या
माझ्या अविचल पापण्या चूप
विराट रात्रीच्या धबधब्यात
माझ्या ओठांवरची भाषा चूप.
पिसाटीच्या बुरुजावर
चिरेबंद दगडातून उगवलेल्या सुक्या गवतांतून
वारा जात असताना

दि. पु. चित्रे तेत्तीस

मी भोगतोय् ह्या हवेतली उग्र क्षुब्धता
वर, क्षणार्धात दिसणारी प्रकाशवर्षांची अंतरं
खाली, स्वतःच्या अस्तित्वाचा निश्चल कमंडलू
वर, नक्षत्रांची उफराटी गोपुरं
खाली, माझा स्वतःचा वाढता काळोख
समोर : सूर्य बुडाल्यानंतरचा
लालसर काळोख
मागे : माळ, टेकड्या, रान, झाडं, खाचखळगे, गवत.
पिसाटीच्या बुरुजावर
फक्त वाऱ्याची गजबज
आणि चरित्राच्या पोकळीत
दगडी बाकावर, दगडी समाधीत
मी.

पिसाटीच्या बुरुजावर
माझ्या नरड्यावर आहेत
फक्त वाऱ्याचीच काळीभोर बोटं
फक्त रात्रीचंच अचूक नख.
आता अनुभवतोय् मी
काठिण्याभोवतालची अनारंभ पोकळी
ही सार्वभौम आणि अपंग अलिप्तता
न पशूची, न परमेश्वराची
ही मर्त्यपणाची जलद् उडणारी नाडी
आणि ही काळोखाची अफाट उघाडी.
पिसाटीच्या बुरुजावर
दगडी बाकावर
माझी जिवंत पिंडी
आणि वर
प्रचंड शंखाकार गोपुरावर

दिक्कालात जडवलेली नक्षत्रं
गिरवली जाणारी, पुसली जाणारी
बिनभाषी अक्षरं.
सुन्नतेच्या देवळात
सुन्नतेचाच घंटानाद ऐकत
मी स्थिरावलोय
ह्या स्थूल अनंतकाळात
स्वतःच्याच किर्र काळजातली जिवंत धडधड ऐकत.

## ५. स्मरणपत्र : पहिले तुकडे.

“ पायातल्या पायात उपड्या झालेल्या चपलेला
माझा नमस्कार असो. ”

—१—

ही ज्ञानरंध्रात झिरपणारी रात्र
ह्या अंध आणि भोर स्पर्श
आणि ही भोळी लहर भाळावर
लिहिलेली ओसरो नशीब

होवो मोकळा पुन्हा जन्मभरचा गळा
ह्या सफाईच्या फासातून निसटो अवघड अंग
नद्यांमध्ये उतरून प्रतिबिंबं न्हालेल्या राया

उडोत राघू होऊन काळवंडणाऱ्या प्रकाशात
भाषेच्या उगाळलेल्या गंधात बुडालेली बोटं
होवोत अलग सहाणेवेगळं चंदन समजून

होवो दारांचा उघडेपणा अवकाशाला साजरा

—२—

निळाईच्या पांडुरंग अखेरपणापर्यंत
सर्वस्व विखरून माझ्या आर्तपणात
उमटो प्रदीर्घ गाभा भळभळणारं ब्रह्म मिटून
त्या स्मिताच्या त्रिलगणाऱ्या ओठांतून
माझा देठच गळो सबंध फुलापासून
हे माझ्या प्राणांच्या फोफावल्या वाऱ्यांनो
कुठे जाल आता ही शांतता व्यापून ?

—३—

रुजणाऱ्या ऋणांनी पोसतो मी
परतफेडीच्या फांद्या जातात अंगाखांद्याबाहेर
हे सहस्रावधी जन्म मी ज्या क्षणात घेतले
त्याच्या कोंदणांच्या कणसांत फुटतात तुझे दाणे
ह्या खडकाळ ढगात मी भिजलो झुंजमुंज
काळोखून सर्व आशा पाऊसलो निराश
आता फाड ही भाषा जिभेवरल्या जिभेवर
उसवून तुझा एकाग्र उत्तुंग काटा
त्रिकाळात घुसलेला तुझा अविरत डंख

नकोत नकोत आता ह्या विघ्नांच्या वर्दळी
माझ्या गर्दपणाभोवती ठेव तुझं अविचल वलय
आणि शंखचक्र देवळांची फुटोत टेंगळं
माझ्या अंगभर सांभाळत तुझं मग्न साम्राज्य

होवोत हे बाहू समजूतदार तुझ्या मिठीत
भिडो सबंध खडक शिल्पाच्या जिव्हाग्री
संपोत माझी ग्रहणं माझी अतिभ्रमणं
पूर्णपणे उजाड होवो उजेडलेलं कपाळ

नाकीकानी गोविंद तोंडीडोळी कानीकपाळी गोपाळ
मुखीं मुकेपणाचा उभा विटेवर विठ्ठल
आणि सर्वांमुखीं स्तब्धतेचा धबधबो ओघ
पूस ह्या रेघा ह्या त्रिकाळ रांगोळ्या

ही सांजसकाळ पानांनी जळणारी तुळस
माझ्या राखेत कोसळणाऱ्या मंजिऱ्यांची भाषा

# नारायण सुर्वे

जन्म : १९२६; प्रथितयश कवी. आतापर्यंत ३ कवितासंग्रह प्रकाशित : ' ऐसा गा मी ब्रह्म ' ( १९६२, १९७१ ); ' माझे विद्यापीठ ' ( १९६६, १९७०, १९७५ ); ' जाहीरनामा ' ( १९७५ ). याशिवाय मराठी कवितांचा इंग्रजी अनुवाद ' On the Pavements of Life ' १९७३ मधे प्रकाशित. मराठीव्यतिरिक्त उर्दू साहित्याचेही अध्ययन केले असून उर्दूतील ' तीन गुंड आणि सात कथा ' ( १९६६ ) आणि ' दादर पुलाकडची मुले ' ( १९७५ ) या पुस्तकांचाही अनुवाद केलेला आहे. सर्व कवितासंग्रहांना महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार. शिवाय सोवियत पुरस्कारही. ' कार्ल मार्क्स ' या कवितेचा जगातील सर्व प्रमुख भाषांमधून अनुवाद. प्रखर साम्यवादी विचारसरणीचा पुरस्कार. ' मागोवा ', ' तात्पर्य ', ' लोकवाङ्मय ' इत्यादी नियतकालिकांच्या संपादक मंडळावर. गिरणी कामगार म्हणून बरीच वर्षे काढल्यानंतर प्राथमिक शिक्षकाचा व्यवसाय.

कवितेसंबंधीची विस्तृत भूमिका ' प्रतिष्ठान ' या नियतकालिकात आणि थोडयाश्या फेरफाराने ' जाहीरनामा ' या संग्रहात प्रकाशित झालेली आहे. खालील ओळी ' जाहीरनामा 'तूनच घेतलेल्या आहेत.

" ....अगोदर भाकरीसाठी खटपट कर, नंतर वेळ फावलाच तर कविता वाच, असे आयुष्याने शिकविले आहे....म्हणून संघर्ष करीत, पाय घट्ट रोवून उभा राहा, ' भागो नहीं–बदलो ! ' असे अनुभवानेच मला शिकविले आहे....कवितेत मी माझ्याशी संवाद करतो, भांडण करतो, सांत्वन करतो, स्वतःला मोकळा. आता हे सगळे अवघड आहे. कठीण आहे. मीही कातावतो. पण खरे समाधानही मला इथेच मिळते....आपण जीवनातील रोजच्या संघर्षाकडे वळू या. तिथली प्रचंड उलाढाल पाहू या. भोगू या. अनुभव गोळा करू या. थोडेसे अंगावरचे कातडे शेकले तर हरकत नाही. हल्ली शेकवावीच लागते. नाही तर खरा स्वर बाहेर येत नाही. सापडली तर जातिवंत कलाकृती ह्याच धुमाळीत सापडेल. आपण काय ' कवी ' आहोत हाच अकारण भ्रम ठेवला तर शब्दच सापडतील; अभिजात कविता सापडणार नाही. म्हणून आपण जिवंत अनुभवाकडे वळू या; जातिवंत कवितेच्या शोधाकडे चलू या.... "

## १. माझी आई

जेव्हा तारे विझू लागत
उंच भोंगे वाजू लागत
पोंग्याच्या दिशेने वळत
रोज दिंड्या जात चालत
झपाझप उचलीत पाय
मागे वळून बघीत जाय
ममतेने जाई सांगत
नका बसू कुणाशी भांडत
वर दोन पैसे मिळत.

दसऱ्याच्या आदल्या दिनी
जाई पांचासह घेऊनी
फिरूं आम्ही आरास बघत
साऱ्या खात्यांतून हुंदडत
किती मजा म्हणून सांगू
शब्दसाठे झालेत पंगू
भिंगऱ्या पेपेटे घेऊन
फुग्यांचे पतंग झोकून
जात असू पक्षी होऊन.

एक दिवस काय झालें
तिला गाडीतून आणले
होते तिचे उघडे डोळे
तोंडातून रक्त भळभळे
जोडीवालीण तिची साळू
जवळ घेत म्हणाली बाळू

मिटमिटी पाहात होतो
माझे छत्र शोधीत होतो
आम्ही आई शोधीत होतो.

त्याच रात्री आम्ही पांचानी
एकमेकांस बिलगूनी
आईची मायाच समजून
घेतली चादर ओढून
आधीचे नव्हतेच काही
आतां आईदेखील नाही
अश्रूंना घालीत अडसर
जागत होतों रात्रभर
झालों पुरते कलंदर.

## २. सत्य

तुझे गरम ओठ : ओठांवर टेकलेस तेव्हा
तेव्हाही रात्र अशीच होती; धुमी.
पलिकडे खडखडणारे कारखाने
खोल्याखोल्यांतुन अंथरले बिछाने
मुल्लाचा अखेरचा अल्लासाठी गजर
काटे ओलांडीत चालले प्रहर
भावंडांसह कोनाडा जवळ केला आईने
धुमसत, बिछान्यासह फुटपाथ गाठली बापाने.

तुझे गरम ओठ : खडीसाखर होत गेले तेव्हा

तेव्हाही रात्र अशीच होती ओढाळ.
खपत होतो घरासाठीच ....
विसावत होतो शीण तुझ्या काठावर
तुझ्या खांद्यावर—
तटतटलीस उरींपोटीं
तनु मोहरली गोमटी
एक कौतुक धडपडत आले; घरभरले.
हादरली चाळ टाळांनी, खेळेवाल्यांनी.
चाकलीस खणानारळांनी.

तुझे गरम ओठ : अधिकच पेटत गेले तेव्हा,
तेव्हाही अशीच एक रात्र आली नकार घेऊन
पंखाखाली बसलीस चार पिले ठेवून
कोनाडा हळहळला—कळवळला.
' नारायणा '—गदगदला.
' शिंक्यावरची भाकर घे'—पुटपुटला.
'उद्यापासून तिलाही काम बघ बाबा. '
गांगरलो, भोवंडून स्थिर झालो.
तिच्या ओठांवर ओठ टेकवून
बिछान्यासह बाहेर पडलो. त्या रात्रीं,
तिचे ओठ अधिकच रसाळ वाटले. अधिकच....

## ३. पोष्टर

चार घरांतील चौघेजण आम्ही
निघतो जेव्हा....
म्हातारा काळोख खुरडत येतो तेव्हा....

'हणम्या रे ही शिडी घे,
मी खळ लावतो
डकव वाचले जाईल अशा ठिकाणीं.
शिंदेची बायको खळ चांगली करते
पण बाप खवीस.
आणि इसल्याची माँ रे !
वडी कडक बाई
नजर बचाके भागा....
कुत्तेपर पैर पडा....तो साला और बोंब !

त्या खिडकीपाशी नको रे डकवू
कायकुरे
उसकी मैना रहती है ना उधर
सबकी नजर लगेगी तो वांदा....
देख बे इसल्या !
डकवू कारे ह्या डगल्यावर
शूऽऽ....शोर मत कर
तो म्हातारा आला एकेक लावीत अक्षर
बुढा बडा खडूस है !'
च्यार घरांतील चौघेजण आम्ही परततो जेव्हा....
कुरकुर खांद्यावरची करते कावड
झाडांची पानेही करती बडबड

'इसल्यारे, कल मिटींग चलेगी उधर
मरने दो ! अपनेको साली आती है अब झोंप.
मग मर लेका ह्या शिडीवर
उचलुन तिघेही नेवू कब्रिस्तानपर'

'देखरे शिंदे उपरमें चांद का टुकडा
गालीबकी गज़ल सताती है
" वेकार जिंदगीने इसल्याको निकम्मा कर दिया
वर्ना इसल्याभी आदमी था, इश्कके काम आता "
चूंप बे इसल्या.... खाली पकपक....'

'हणम्या रे एक काम करू या.
—अपना विरोध.
वर्गणी जमवू या.
—अपना विरोध.
इसल्याची शादी बनवूया....
तो फुल सपोर्ट.
अपनेभी घर एक दुल्हन आयेगी
शहनाई बजेगी.'

'ही दुनिया किती पुढे गेली रे;
थोडीसी नाकके आगे
पीछे बुढवाकी नजर
म्हणून म्हणतो इसल्या—
बुढ्ढयासाठी चष्मा घेवू लवकर
आयडिया !'

## ४. संवाद

कबूल....
आजच्याइतके आयुष्य काल कठोर नव्हते
आजच्याइतके पालखीचे भोई काल थकलेले नव्हते

नव्हतो आजच्याइतके आपण उदास,
इतका नव्हता अविश्वास....
तेव्हाही किनाऱ्यावर खिन्नपणे हिंडणारे आपणच होतो
झळा झेलूनही झळांचा ळळा उरात वागवीत नव्हतो
तेव्हाही आयुष्याच्या उजाड माळावर वांझोटेच ढग होते
मात्र हजारात वावरल्यावर; आपलेपण आपले उरत नव्हते

कबूल....
तेव्हाही कुणालाही टाळीसाठी उगीचच टाळी देत नव्हता
खांद्यावर कोट टाकून उद्याचे बेत ठरवूनच उठत होतो
तेव्हाही आयुष्य कठोर होते; तरीही आपलाच धाक होता
दोस्तहो ! उडणाऱ्या दरेक नाडीवर आपलाच हात होता

ते आपण, उदासीनतेतही नव्हतो उदास
होते सारे...., सारे भकास....

ते उजेडाचे वारसदार, अंधारात असे कुढत नव्हते....

## ५. जाहीरनामा

आजच्या नावाने आणि
आजच्या दुःखांच्या नावाने
संथपणे प्रकाशात येत असलेला भू-भाग त्याच्या नावाने

आजच्या सृजनातील गरजेच्या

प्रतीक्षेतील प्रत्येक क्षणाच्या
औषध मागणाऱ्या व्यथांच्या
गोळी लागेल म्हणून धपापून उडणाऱ्या मनामनांतील कबुतरांच्या
    नावाने

टेकला असेल जिथे दिवस
खुले होत असतील नगरांचे बंद दरवाजे
धूत असेल पाऊस डेकसारखे एखादे शहर
घातलीही असेल एखाद्या खेड्यावर बर्फाने चादर
मेणबत्तीच्या मंद उजेडात सांगत असेल म्हातारा फादर
"तो जन्मला आणि एक तेज:पुंज तारा स्थिरावला गोळीवाड्यावर"

उत्तर ध्रुवावरून सरकणारी हिमलाट
पॅरिसचा बाजार गरम असेल
पेंग्विनच्या झुंडीकडे पाहात, काप्रीत
एखादी वक्षावर टेकलीही असेल
टेम्स धपापत उतरत असेल अटलांटिकमध्ये
हॅम्लेट बावरला असेल
हिंदुस्थानच्या दिशेने एखादा टपोर काळाभोर ढग
संथपणे सरकत असेल.

खुंटीवर स्वप्ने टांगून मान मोडून काम करणाऱ्या वास्तवाच्या
पोलाद वितळवून मनासारखा आकार देणाऱ्या झोतभट्ट्यांच्या
चहाच्या मळ्यातील पत्ती खुडून शिणलेल्या दळदार बोटांच्या
भार पेलून मोकळी होऊ पाहणाऱ्या गर्भवती कवितेच्या नावाने
    गर्भार गतीच्या नावाने.
पणतीच्या प्रकाशात आपणच आपली ज्याने कापली होती नाळ
दोस्तहो ! त्या, ह्या शतकाची आता सुरू होत आहे संध्याकाळ.

टकटक करतो आहे नवा इसवी सन दारावर
लवकरच हेही सुरू करील आपली आवराआवर
थाटील बिऱ्हाड इतिहासाच्या पुढील पानावर
हक्क सांगेल मागील कर्तृत्वावर
—— शे-सतरात, सदतीसात, सत्तेचाळीसात.
पुढच्या उरलेल्या अनेक अंकांत....
शिकवीत शिक्षक अंक मांडून फळ्यावर
फार तर; छडी टेकवून नकाशातील एखाद्या रेषेवर.

पण कुणी सांगेल काय ? ह्या शतकात चंद्र महागला होता.
कलकत्त्याच्या रस्त्यावर घोडा होऊन माझा आत्मा बग्गी ओढीत होता.
पण एवढे पुरे; आपणही आता धुरकटलेले चष्मे बदलून घ्यावेत
आपणही ह्या शतकात जन्मलो; आपलेही हिशेब चुकते करावेत.

किती वेळा आपण जमा झालोत मारवाड्याच्या पोथीत
कितीदा आयुष्य निघाले होते मोडीत
किती वेळा हाकारे गेले रान उठवीत
किती घरघरली विमाने धाक दावीत
आपण फक्त लिप्या बदलीत राहिलो
सोयीनुसार दरवाजे बदलीत राहिलो
उडालेली कौले शाकारीत राहिलो

दोस्तहो ! ह्या शतकाची संध्याकाळ सुरू होत आहे.

सहजच उपडी होईल पृथ्वीची होडी ॲटमच्या एका गोळ्यात
पापणी लवता लवता मिळून जाऊ खोल खोल तळात
हिरोशिमाला नंतर फुले तरी आली——
आपणाला....

——तर संध्याकाळ सुरू झाली आहे.
मी एक अलिखित अस्तित्व घेऊन हिंडतो आहे.
थांबतो आहे; परंपरेच्या पाट्या वाचून
इथे आपले कोणी नाही म्हणून
पुढे वळतो आहे
एक दिवा पेटवून दुसऱ्या दिव्याकडे
लपकन वळणारा हात मला दिसतो आहे
आधार तेवढाच आहे.

——संध्याकाळ सुरू होत आहे.
माझा दावा सुरू होत आहे
'ईश्वरसाक्ष' हे शब्द पेंढा भरून ठेवावे
स्वतःला स्मरून बोलत आहे.
संस्कृतीच्या दुकानातील तयार अंगरखे काढून
तुम्हाकडून न्याय हवा आहे
नागड्यानेच न्यायासनावर बसलो तर
तुम्हाला चालेल काय?
आपला म्हणाल काय?

मी पाहतो आहे
माझ्या अस्तित्वाला फुटणारे पंख
पोलादी नसानसांतून वाजताहेत शंख
मी एक सत्य. पृथ्वी एक सत्य.
सर्वांसाठी आपण हेही एक सत्य.

काठी टेकवीत येणाऱ्या मृत्यूला
लगोरी टिचवावी तशी
पोरे लावताहेत पिटाळून.

*धर्म : एक कुलंगे हिंडते गल्लीबोळातून.*
रक्त माझे; ठिबकत ठिबकत पसरते
दोन्ही ध्रुवांच्या मध्यातून

आणि दोस्तहो !
मी पाहतो आहे
एका क्षुब्ध नवागत गतीचे टोक धरून
लिहितो आहे;
हे शब्द हटवा.... हे पुतळे.... स्थितिस्थापक.
हवा आहे मनासारखा नवा जाहिरनामा म्हणून.
नवा जाहिरनामा म्हणून.

जन्म : १९३८; एम्. ए. ( भाषाशास्त्र ) व एम्. ए. (इंग्रजी साहित्य); शैलीविज्ञानात पीएच्. डी.; १९६४ पासून इंग्रजीचे अध्यापन; १९७२-७३ मध्ये लंडन विद्यापीठात इंग्रजीचे अध्यापन; कवी, कादंबरीकार व नव्या पिढीचे महत्त्वाचे समीक्षक; 'कोसला', 'बिढार', 'जरीला', 'झूल' या कादंबऱ्या; 'मेलडी' हा कवितासंग्रह; 'Tukaram' हे समीक्षात्मक पुस्तक; मराठीतील लघुपत्रिकांच्या चळवळीतील एक अग्रणी; 'वाचा' या लघुपत्रिकेचं संपादन; हल्ली मराठवाडा विद्यापीठात इंग्रजीचे प्रपाठक.

'समाज प्रबोधन पत्रिके'त प्रकाशित झालेल्या दीर्घ मुलाखतीतून खालील उतारा घेतलेला आहे.

" कविता हा सर्वोत्कृष्ट वाङ्मयप्रकार आहे असं मला लेखक या नात्यानं वाटतं. कारण या प्रकारात निर्मितिप्रक्रियेची शुद्ध कल्पना लिहिणाऱ्याला प्रतीत होते. कवितेत आशय, माध्यम आणि फॉर्म ह्यांच्यातून मार्ग काढणं एक आव्हानच असतं. कारण इथं शैली कसोटीला लागते.... मराठी कवितेला सात शतकांची अखंड परम्परा आहे. त्यामुळे इतर वाङ्मयप्रकारांपेक्षा कविता जास्त पुढारलेली आहे. त्या वेळी पु. शि. रेगे चांगल्या कविता लिहायचे म्हणून आम्ही खूष होतो. त्या आधीचे मनमोहन, मर्ढेकर आणि बालकवी हे कवी मला आवडायचे. मात्र मला तुकाराम हा सर्वांत मोठा मराठी कवी वाटतो. आजच्या कवींमध्ये मला अरुण कोलटकर, दिलीप चित्रे, ना. धों. महानोर, मनोहर ओक, सतीश काळसेकर, तुळसी परब आणि नामदेव ढसाळ एवढेच कवी आवडतात. मराठी कवितेनं फारच मोठी मजल मारली आहे. आता मराठी कवितेनं हे आवर्तन पुरं करून संपूर्णपणे बदलणं आवश्यक आहे असं वाटतं. आजच्या प्रमाण मराठीत ह्यापुढे कविता होणं कठीण आहे. ना. धों. महानोरांच्या पद्धतीने नवनवे लयप्रकार आणि मराठी बोलीच्या लकबी कवितेत आल्याशिवाय हा रस्ता मोकळा होणार नाही... "

## १. पिंगट रानाला राघू सोडून चालले

पिंगट रानाला राघू सोडून चालले
डोंगरांच्या रांगाही उड्डू पहातात पायथे उचलून
फांद्यांनी पारंब्या रोवल्या माझ्या डोळ्यांच्या तळापर्यंत
देठ.... देठांचा स्पर्श आहे अजून
पाने.... पानांची टोके जमिनीला दूर हो, दूर हो म्हणतात
खाली पोकळी करून दे म्हणतात, नाही सोसवत.

सगळी पाने उडून जाऊ दे.... सगळी पिंगट
दाही दिशांचे एक पेव करून, रोखाने
एकाच गळालेपणाची ओठातली शीळ होऊन
उमटवू दे सगळी अस्फुटे या देठादेठातून
एकाच झाडाच्या या पानगळणीने भरून जाऊ दे
सगळे अंतर असण्याहोण्यामधले माझ्यातुझ्यातले
पाने नसतील आणि ढीग जमतील,
तुटून पडण्याचेच ह्या पानांच्या पिंगट.

जन्मांधाचे डोळे साठवून ठेवतात काळोखाची पृथ्वीतोल वलये
तितके ढीग साठवीन, पारंब्यांना डोळ्यात खोल घेत घेत
ती वेळ माझ्या ओंजळीतून तुला पाजीन,
तोपर्यंत तरी थांब. मिटून बैस तुझे वारे, तुझी तहान.
झाड राहू दे असे माझे डोळ्यांच्या तळाशी मुसमुस करीत
जमिनीला दूर हो दूर हो म्हणणारी पाने आणि
तरंगणारे हलते राघूंचे थवे सांभाळीत.

## २. कशा रांगोळ्या काढता तुम्ही, घरंदाज व्यथांनो !

कशा रांगोळ्या काढता तुम्ही, घरंदाज व्यथांनो !
कसा सडा घालता माझ्या अंगणाचा कोपरा कोपरा खुलेल असा,
कशी सजवता तुळशीवृंदावनाची दर्शनी बाजू,
खुडता मंजिऱ्या दुपारच्या सुकलेल्या मऊ नखांनी,
रोज नव्या हातावर केलेल्या कापसाच्या वातींनी लावता
माझ्या पाताळघरातला अंधार प्राशणारी
देवघरातली आंदणाची उभी समई,
आतबाहेर येता जाता कसल्या गुणगुणता आरत्या
पुसट शब्दांच्या सुरांच्या वेणीत अर्थ गुंफून टाकून
—— तो अर्थ चाचपू पहातो, पहातो
तेव्हा भिंतीला खेटून उभा असलेल्या माझ्या
डोक्यावरची पिंपळाची फांदी फांदी ओरडणाऱ्या
कावळ्यांनी काळीकुट्ट लदलेली असते

कुणासाठी ही अबोल संथ वाटपाहणी ?
उंबरठ्यात रुतवलेल्या बांगड्यांच्या नक्षीलाच कळणारी
तुमच्या आंगठ्यांची लवलव कुणासाठी ?
किती दिवस....हे आरशालाच माहीत असलेले तुमचे
कोरीव कुंकवाच्या चांदणीखालचे पहाटचे फटफटीत कपाळ ?

मलाही कळू द्या तुमची उभार दृष्टीघोळ जवळीक....
न्हाणीपासून आतपर्यंत उमटलेल्या पावलांची
आणि परकरांच्या किनारीवर भरलेल्या बिनपायांच्या
मोरांची भुलावण
मलाही कळू द्या.

भालचंद्र नेमाडे एक्केचाळीस

कां पदर घालून असता माझ्यासमोरही सकाळ संध्याकाळ
सदा कपाळापर्यंत....ह्या आपल्याच आपल्याच घरात ?

चेहराच नसलेल्या अपुऱ्या शिल्पासारख्या भेसूर बायांनो !
माझे अंगण पांढरे झाले तुमच्या रांगोळ्यांनी.

## ३. पाठीशी भिन्त तुझ्या

पाठीशी भिन्त तुझ्या
वरती चिमण्यांचा खोपा
बाई, हलका आहे खांदा तोवर
घे भिंतीला पोतेरे
डोळे रिते पुन्हा गर्द नको, पुन्हा नको आसू.

सुख रांगून गेले, अजून घरभर
उगी पाळणा भरून हिंदळती लय आहे
आहे चिमणी चिमणी मागे, वेचील
दुपारदुपार उंबरठाभर निबोलकेपण खांबांचे
ते त्यांचे झाले, उभ्या भिंतींचे झाले.

डोळ्यांचा भार नको पदराला, बाई
तुझ्या पदराचे पोत टिको.

## ४. सहजासहजी अंगावरचे डाग मनावर टिपून घेतले

सहजासहजी अंगावरचे डाग मनावर टिपून घेतले
परकेपणाच्या ठेचा लागल्या तेव्हा खुणा पुसून गोरामोरा घरात शिरलो

वर्षच्या वर्ष स्फुरणारे इच्छांचे वेध
कोंडले डोक्यातच वेटाळी करून
आरशे जुन्या घरातल्या भिंतींनी भेट दिले पूर्वीपासूनचे
त्यांचा पारा उडून गेला तरी ठेवून दिल्या काचा म्हणून
म्हणून दुसऱ्या कुणाच्या आरशात तोंड घेतलं पाहून दिसेल तेव्हा

पेशी ठेवून घेतल्या   आईकडच्या बापाकडच्या
टाकायच्या तिथे टाकल्या सगळे नीतिनियम पाळून

जमेल तितकी बंधनं तोडली राहतील तेवढी मानली
खंत वाटणाऱ्या गोष्टींचा दररोज ताळेबंद केला
शरीर ह्या भांडवलाचा व्यापार केला नोकरीत बुद्धी दरमहा गहाण ठेवून

अपयशाला थोर मानलं   यश पाहून थुंकलो
तरी टमरेलभर फायद्यानं गांड धुवून घेतली यशस्वी

चपट्या इच्छांच्या बुडातून भविष्य पाहिलं विनाकार
रात्री जागून सकाळी पाहिल्या   दिवस झोपून संध्याकाळी पाहिल्या
कशात काही फरक नव्हता नुस्ती नावंच नावं शिकलो
तरी बोललो अर्थ गुंडाळून

भालचंद्र नेमाडे   त्रेचाळीस

कोणी कबूल करेल असे पुरावे कधी नव्हते
म्हणून कबूल करणारांशी कळप केले आयते

## ५. हे लांब लांब रस्ते कधी जुने होत नाहीत की बदलत नाहीत

हे लांब लांब रस्ते कधी जुने होत नाहीत की बदलत नाहीत
आणि अंधाराच्या ढिगाऱ्यावरून धावत जातात दिवस कायम
जिकडे पहावं तिकडे तेच दिसेल असं नक्षत्र नाही, नाही
पृथ्वीलाही ठिकाणा भिरभिरून अंतराळात
तरी गुरुत्वाकर्षण नाहीसं करता येत नाही तिरडीवरसुद्धा

खुणा ठेवून संपत नाहीत चंद्रकोरी घराघरावर कललेल्या, की
सावल्या सोडून जात नाहीत झाडांना जन्मभर
लकाकून उमटलेली टिकत नाहीत सूर्यबिंबं
संध्याकाळपर्यंतसुद्धा गालावरची
घरात शिरून दारं बंद केली तरी डोळे मिटले तरी
आतली निगेटिव् संपत नाही असतेच असते सदान्कदा.
अंगाचा रंग बदलत नाही की हाताची अडगळ सुटत नाही
झोपेतसुद्धा

की त्यांच्याशिवायही आर्धी सकाळी असतात आमच्या
दाट आतासारख्याच ढगाळ झोपेच्या
की दुसऱ्या कुणाच्याही हाताला त्यांची शरीरं
इतकीच हलकी वाटतात घामाचा वास गोड वाटतो
की दुसऱ्या कुणापासूनही त्यांना तितकीच लाडकी पोरं होतात
की वासनेला दारं नाहीत, दरवाजे नाहीत, आहेत भुयारं तळघरं

की चाफ्याला अंगावरच फुलं फुटतात तसं त्यांच्याजवळ काहीच नाही
आमच्याजवळ तरी कुठे आहे. आहे जुनं धुवून स्वच्छ राखलेलं
कमीजास्त केसांचं कातडं
नेहमी तडा जाऊन पुन्हा भिजणारी माती आपली नाही
की चेहरे कधी कधी लक्षात रहातच नाहीत अस्पष्ट रहातात जन्मभर
की त्यांना जवळ घेतांना कितीतरी गोष्टी जवळ घ्याव्या लागतात
लपेटून सापासारख्या किंवा शिरून भविष्य काळातल्या अरण्यात
सुरक्षित भिंतींचं वचन द्यावं लागतं त्यांच्या कुडीला
घराचा मध्यबिंदु मान्य करून वर्तुळ आखून जन्माचं
आहे तोपर्यंत.

त्याच त्याच पुन्हा वैरी झालेल्या रस्त्यांची सोबत
ढिगासारख्या रोज दारात वाट पहाणाऱ्या अंधाराची. प्रिय रस्ते !
प्रिय अंधार !
आणि अंधाराला गिरक्या घालून दाराआड बसणाऱ्या रातकिड्यांची
आणि नियमित वळणांची आणि पायांची आणि हॉटेल बिलं पानांची
दुकानं पिचकाऱ्या. प्रिय तंबाखू !
आणि आकाशाला चिमटत रहाणारी टायरची जाहिरात
प्रिय जाहिराती !
निमूटपणे असतात बसतात चालू लागतात दिवस अजून
एखादा दिवस नागासारखा फणा उभारील आणि उभा राहील समोर
म्हणून या चंद्रकोरी नीट लक्षात ठेव
पुन्हा कधीतरी आठवतील तुला.
मान फिरवली आणि जाण्यायेण्याचे रस्ते टाळले
गावं सोडली
तरी मोकळे होणार नाहीत
तरीसुद्धा रस्ते. विचित्र असतात रस्ते विचित्र असतात
घडणाऱ्या गोष्टी. खोट्या असतात पापण्या
माहित नसतं काहीच माहित नसतं की

सांगता येत नाही काही सगळंच नंतरसुद्धा
आणि खणूनही टाकता येत नाही हे सगळं
जिथे पाय टाकला तिथे भिंत उभी राहिली
चांगलं म्हटलं ते वाईट निघालं आणि वाईट काही नव्हतंच
ज्याला जे म्हटलं ते चुकीचंच होतं
नको ते मिळत गेलं आणि हवं ते चुकत गेलं
काय म्हटलं माहित नाही काय राहिलं नाही
माहित नाही कुणासाठी कशासाठी पुढेमागे अवतीभोवती
काही नाही. नकाशासारखी मागची गावं. घरे. रस्ते.
मागचं हे इतकं सगळं आणि आकाशासारखं फटफटीत
पुढचं आयुष्य. काही हरवलं नाही काही सापडणार नाही
सावरून ठेवलं फक्त सहा फुटांचं शरीर.

थंडीत कुडकुडत तंबोऱ्यावर गारठलेली बोटं फिरवत
कळवळून गाणाऱ्या भिकाऱ्याच्या चेहऱ्यावर आणि
त्याचा एक हात खांद्यावर घेऊन निर्विकार उभ्या पोरीच्या
सुकलेल्या गालफडांवर सगळ्या कलांचा बोळा करून ओवाळला
सगळे धर्म सगळी मूल्यं तंबाखूच्या पिचकारीत थुंकली

थकून गेले विचार पुढचं मागचं काही आवडीचं पहाता पहाता
सगळं तात्पुरतं, वेगळं आणि चांदण्यासारखं उन्हासारखं
पुन्हा जवळ येऊन नाहिसं होणारं
हे आपलं नशीब आहे. एकेकाच्या आत
असं रसायन असतं, बाहेरची हवा लागली
की त्याचा भडका होतो. नाइलाज. नाइलाज.
कधीच कळलं नाही कशाकरता कशाकरता हे सगळं
सगळ्या गोष्टी अवेळी घडणाऱ्या
म्हणून सगळेजण खेकसत आलो पूर्वीपासून कशावर तरी गेले बिचारे.
दुसरं काहीच नाही कुठे ह्या कोलाहलाशिवाय.

सेहेचाळीस भालचंद्र नमाडे

जे काही केलं त्याचा तमाशा झाला
आणि तमाशा केला तेव्हा लोक आहो ओहो म्हणाले.
ऐसा क्यू ऐसा क्यू सैगलनं आधीच विचारून ठेवलं
कधीच कळलं नाही.
संध्याकाळी गावात फटका मारला कित्येक महिन्यांनी
हजार माणसं समोरून येऊन मागे गेली पण
एकही ओळखीचा नाही, ओळखीचे लोक दुसऱ्या गावीच राहिले
आता मीच कुणाच्या ओळखीचा नाही
गावं गजबजून उठतात सगळी एकदम
आणि ह्या रस्त्यावरही धरणीकंप जाणवतो
आरसे उलटसुलटे डोक्यात फिरतात
ह्या तडतडणाऱ्या रस्त्यावर
हेही गाव असंच गजबजेल पुढे दुसऱ्या गावी
एकाच जन्मात पुनर्जन्म भोगण्याचं अद्‌भुत सुख.
सगळ्या गोष्टींचा बरेवाईटपणा सुटतो लहानमोठेपणा सुटतो
तरी पण आता हे कुरवाळून घे पुन्हा पुन्हा
थोड्याशा गोड गोष्टी तुझ्याशिवायही ह्या रहातील इथे
पण तुझ्याकरता आत्ता आहेत ह्या. प्रिय गोष्टी.
विसरू नकोस स्मरण आहे तुझ्यात तोपर्यंत तरी
त्यानंतरचं तुला कोणी विचारत नाही, तोपर्यंतचंच.
आपण गेल्यानंतरसुद्धा आपल्या प्रिय गोष्टी इथेच रहातात
हेही काय कमी आहे ?

त्यानंतर एकाएकी
कुणीतरी कुणासाठीतरी बांधलेला मुकबरा
दिमाखात हसला
जणु आपल्यासाठी कुणी तरी आधीच बांधून ठेवला होता.
नाहीतर आपण कुठे काय स्मारकं बांधणार कुणाची ?
आणि कशाकशाची बांधणार आणि कुठे बांधणार ?

भालचंद्र नेमाडे सत्तेचाळीस

मांसाच्या दिशाशून्य आवरणात गुंडाळलेल्या तुझ्या बाळाला
शिकवून ठेव पोटातलं कोट्यावधी पिढ्यांचं नातं
तो जन्मताना तुला कमी वेणा होवो
सगळे अवयव नीट असो आतले बाहेरचे
तंबाखू खाण्यासाठी मजबूत दात असो जगावर थुंकण्यासाठी
सिगरेटीसाठी मजबूत फुफ्फुसं आणि दारूसाठी पक्की लिव्हर
बुद्धी असो अपयशाचे फटके सोसण्याइतकी
समज असो वडीलधारे सहन करण्याइतकी
पौरुष्य असो बायको नांदवण्याइतकं

नाहीतर निरर्थक आहेत कित्येक जन्म सगळीकडे ह्यांवाचून
निरर्थक नसो बाळाची नाळ
बाहेर काळ मोठा कठीण आहे.
दुःखाचा अंकुश असो सदा मनावर
हालाहल पचवल्याबद्दल माथ्यावर चंद्र असो
चांगली माणसं मोजण्यासाठी हाताला हजार बोटं असोत
लक्षात रहात नाहीत बिचारी. त्यांना दीर्घायुष्य लाभो
ते चुलीपुढं बसून ताटात वाढलेलं मुकाट्यानं खातात
त्यांचे सदरे फाटके असतात आणि मुडपून टीप घातलेली असते
धोतराला कुठेतरी – खिन्न असतात नेहमी नेहमी झोपेतसुद्धा
ते कधी स्वतःचं अस्तित्व जाणवून देत नाहीत खंगलेले असतात
ते मनातच पिटाळून लावतात रानडुकरांएवढे विचारांचे कळप
शेवटचे राजे असतात बुरुजावरून खिन्नपणे क्षितीज न्याहाळत,
पागेतल्या म्हाताऱ्या घोडदळाची फुरफुर ऐकत
किंवा ते कधी समोरून जाताना दिसंत नाहीत पण नंतर पाठमोरे
दिसतात.
झोपलेले असताना किती बिचारे दिसतात
पोटांना सडकेच्या काठावर ठेवून खडीडांबर टाकत असतात
किंवा कुणी काहीही म्हटलं तरी ते हो हो म्हणतात.

पुन्हा तसेच रस्ते झाडांच्या सावल्यांच्या हलत्या फुग्यांमधले
ऐषआरामी
इथपर्यंत सोपं असतं, ह्यानंतर काहीच घडत नाही
जरी सगळा दिवस ह्या एका आसाभोवती फिरत राहतो करकरत
आणि ह्या आसाला काही गती नाही, हे तुलासुद्धा माहीत नाही.
हिंदी सिनेमातल्या गाण्यांनीही आधीच सांगून टाकलं आहे ते सगळं.

किती तरी गोष्टी सांगण्यासारख्या कधीच सांगितल्या नाहीत
पुन्हा कधी सांगणे नाही. पुन्हा त्यामुळे
सगळे दिवस वाया गेले आधीचे, नंतरचे
नाहीतर ही कविता पुरी केली असती इथेच.
हे ढग पाहून ठेव गर्द फिके निळे जांभळे लहान मोठे
असेच असतात दुःखांचे समुदाय गर्दी करणारे
डोकं भरून आपल्या कपाळाआत.
आधी बरसतात रात्री बेरात्री दिवसाढवळ्या अंधारून
आणि बाहेरचे लोक आपल्या चेहऱ्यांकडे फक्त पहात असतात.
हे मणामणांचं ओझं वहात असतो आपण डोक्यात आपल्या
मानेवर. तरी मान मोडत नाही असा आपला
जन्म. झोपलो तरी पुन्हा तरंगत असतात कपाळामागे गरजत
असतात डोकं भरून. हेही काय डोकं !
आणि पहाटे विटकुरासारखे अंथरुणावर पडून डोळे उघडतो
आपण पायावर उभे राहून ह्यांच्यासकट घेतो डोकं मानेवर.

तुझा माथा निरभ्र आहे नव्हेम्बर डिसेम्बर सारखा
पण तरी हे ढग पाहून ठेव.
किती उत्साही सकाळ झाडांवर उन्हं हवेवर पक्षी
रेडिओवर आदमचा कलाम म्हणणारी मलिका पुखराज
तोंडात पान मनात निर्विचार दिवसाकाठी मोकळा डांबरी रस्ता
वडाखालचा

पांढरेकाळे ढग एकमेकांत मिसळून गेले
जुनं आकाश नव्या पावसानं भिजून धुतलं गेलं
नवं गवत उगवलं पालवीवरची धूळ धुतली गेली
रस्ते काळेस्वच्छ झाले आणि प्रकाश
शिरला दिवसभर झगमगता
आकाशात लांब लांब पांढरे पट्टे अदृश्य सूर्याचे

बांधून झालेल्या भिंतीतून काय पहात असतो शोधून कुणास ठाऊक
असं काही तरी असतंच ह्या जन्मी जे मिळत नाही.
आतून बाहेरून सुरुंग पेरलेले असतात घराच्या भिंतींना
बाहू पिचतात कुठेही मजबुती नसते अंथरुणाबाहेर
आम्हाला अपघात होवो तडकाफडकी मरण येवो
हात नसो पाय नसो शिर नसो नुस्तं धड स्वस्थ धुगधुगतं
पुस्तक लिहिलं तर चांगला प्रकाशक लाभो
रात्री रात्री नसतात दिवस दिवस नसतात
असतात सगळे आवाज बिनखुणांचे
अंगावरचे कपडे कपडे नसतात.

# मनोहर ओक

जन्म : १९३३; कवी आणि कादंबरीकार; सुरुवातीच्या कवितांचा ‘ आयत्या कविता ’ हा संग्रह १९७० मध्ये प्रकाशित; ‘ अंतर्वेधी ’ ही कादंबरी १९७९ मध्ये प्रकाशित; ‘ चरसी ’ ही अप्रकाशित कादंबरी अंशरूपाने नियतकालिकातून प्रकाशित; सर्व लेखन प्रामुख्याने लघुपत्रिकांमधून; पूर्णवेळ लेखन.

## १. जे दिलं जातं ते घे–घेता आलं तर. मागू नको

जे दिलं जातं ते घे–घेता आलं तर. मागू नको
मागण्यात माणसं अवघडतात
आणि इथे खोटेपणाला वाव आहे
करता आलं तर कर–साधलं तर. मुद्दामहून नको
लादण्यात परस्पर दुःख येतं
आणि इथे फसगतीला शिरकाव आहे
सुख हे अनायास सरगळतीत आहे, असतं
throw thyself in the oblivion, care not
आग्रह आणि निग्रहात दरवाजे बंद होतात
हे ध्यानात धर–सुटे भाग कुठं बाहेर पाहू नको
आशीर्वादाचे फणे भिकेची उघडी तोंड
भलं करण्याचे भलते फंद नाहक छंद समज
चांगलं करण्याचे उपद्व्याप फशी पडतात.
एवढंच नाही अंगलटीस येतात हे जाणून वाग.
आहेस तसा कुठंही जा इतरांच्या पळवाटा बंद होतात
उसन्याची मागणी बरी नाही
ह्यांना आंतरिक हेतू आडवसा होतात. आडोसे घेतात
एकान्ताचाही आडोसा नको तोही एक शृंगार आहे
पश्चात्तापाची भरपाई लांच्छनास्पद
गुन्हा चूक कबूली दुजोरा देऊ नको.

## २. माझी स्वप्नं चौकात पडलेली सांडपाण्याबरोबर पाहून वाहून

माझी स्वप्नं चौकात पडलेली सांडपाण्यावरोबर पाहून वाहून
मला दुनियेचा भरवसा वाटायला लागलाय्

बाद-कॅटातील पत्त्यासारखा मी. डोळा भरून माझ्या 'अंट्या'
गोळा झाल्यायत्. पण वीस बोटांनी मी काय करू ?
रात्रभर तेवतायत् मेणबत्त्या भळ्भळ्तायत् बदाम लटक्तायत्
खिस्त माझ्याशी स्पर्धा करतायत्
मी दिलगीर आहे.
रस्ते किचवड्तायत् पावलं झेपावृतायत् डोळ्यांवर धावृतायत्
दूरतायत् खांबांचे दिवे
टच्कन् चंद्र डोळ्यात पायाखाली येणार.
घर्घर्तायत् यंत्रं मजूर वहातायत् घमेली घाण डोई निपट्तायत्.
देवाघरचं तारायंत्र कानांत कट्ट कड् कट्टताय्.
तेच बहुरूपी ग्लास द्रव बदलून येतायत् मोहल्ल्यांचा गर्म मसाला घालून
मिसळ्तायत् सात रसायनं सळ्सळ्तायत् नसा-पेरांत.
टवृटवून हरएक भोंक रोंवू मागताय् पिऊ पहाताय् भोकांड
आगामी सूर्यबल्लक.
वारयोषितेसारखा कोसळ्तोय् पाऊस
कोण आपल्या मुलाचा बाप ? शोधण्याकरता.
फुकट्तायत् रात्री भटक्तायत् रस्ते सगळे डेड-एण्डवाले समुद्र
मासे मारतायत्
अकस्मात् भरती येतेय् रस्त्यांना सगळ्या बिल्डिंगी दूर पळ्तायत्
पायाखाली पसर्तेय् वाळू सगळे पाय आकाशसमांतर होतायत्
मालवतेय् रात्र सगळी साठत पापणीत अडळ्तायत् गात्र नेत्र
गुबार्तायत् दिशा सगळ्या तोंडी तोबरे येतायत्
सगळी किर् किर् किर् किर् सगळा किर्र्र किर्किराट
करवतत्तायत् काजवे–भाजवे अंगावर देवी उमट्तायत्.

## ३. हे सगळ्यांहून प्रियतम माझे अंधार

हे सगळ्यांहून प्रियतम माझे अंधार
मोकळिकीत वावरतो मी त्यांचे आयाळ कुरवाळीत
सुन्न सोप्यावर लोळतो मी त्यांच्या.
दुखवत नाहीत ते मला लडिवाळित

हे सगळ्यांहून प्रियतम माझे अंधार
खुशाल विशाल होत जातात ते मला फावतात वाव
मी त्यांच्या रूपाने पुढे येतो
नीलनितळ सावळेतळवे त्यांचे मला खेळवीत

मी बागडतो डोळे मिरवतो त्यांच्या वेळूत

हे प्रियतम अंधार माझे गांधार
माल्हवीत माल्हवीत गगन वल्हवीत येतो मी
मऊसुत हात त्यांचे नीरवगोंजार
पालवीत त्यांच्या भरतो कशिदा होतो मी

हे प्रियतम अंधार माझे सुशीतल
अंजनात सुरेखतात माझे बुबुळ विजेवर
हे प्रियतम अंधार माझे गंधार
थंड शिडकावात माझे उमलतात इंदिवर
रेणू रेणू ओतप्रोत त्यांचं मलमलगोत
सरीवर सरी बासुरी माझे पालटतात नोक

चोपन्न मनोहर ओक

हे मग्न माझे अंधार माझी तंद्रा मॅग्नोलिया
लागता डोळे गांधार उभी हरवलेली ऑफेलिया
हे प्रियतम अंधार माझे गगनगूढ गांधार
हे गजान्तअंधार माझे संभ्रम मध्ययुगीन धुवाँधार
फरदार स्पर्श त्यांचे मऊ लवदार
नर्मसुत वहाते प्रवाह माझे निजधामगोंजार
हे प्रियतम अंधार माझे कलतात पापण्या
कटिखांदी त्यांच्या माझ्या झुलतात लावण्या

झुळझुळतात झरे माझे ओसरतात पाझर
मतलईवर वहातात वारे अलगुजदार ओझर
लोळतात भुईवर माझे झेले शिळमोड
छापतात छापखाने त्यांचे अंगलिखित भुईमोड

हे प्रियतम अंधार माझे उच्चार
हे गाढतम विस्तार माझे बदलते आकार.

## ४. झाड हे झाड नसतं

झाड
हे झाड नसतं
एक जंगल
अवघं साम्राज्य
हिरवी अभेद्य गढी
पानबंदी चहुवार
परतवत सूर्य
नमवत वारा

शिकवत सौजन्य
अकुसर प्राण्यांना
चतुर व्यूहमय पानसौकर्य
शिंपवत पाई
अबलख खडा
शिकवत धडा
संस्कारहीन प्राण्यांना
तुडुंब भरलेल्या
स्थिर धडाधड् summe-saults
टाकून पानं यथेच्छ करणारी वाऱ्यांना
सगळे निमुळते शिरकाव
पक्षी मुडपत गती, उघडमिटत पंख
घरटी ठाव गवसणारे
सकाळसंध्याकाळ
पाखरांचे किलबिलते कंठवृंद
रहस्यमय रंगांचे फुललेले ताटवे
आकाश पार्श्वमंचावर
ते उभं असतं तेच मुळी माथे दिमाखत
पानसळीत गहिरे होत
डहुळत जाणारे अंतर्गत अंधार
जेव्हा कुजबुजतात गाळीव किरणांशी
" एक बंगली स्वप्न पहाते
ही पैल्लदार अंगठी
आपल्या बोटात घेण्याची "
झाड बेफिकीरपणे लुटवतं
सावली, असावध म्हशीवर
गाई-बकऱ्यांवर
येणारे मोहोर दरवळते
वयात येणारी फळं डोलदार

गाणारे कोकिळ का कर्कटणारे कावळे
वाढणारी अंगावर वेल, फुलहीन वा ऋतुमती
या अवांतर घटनात संभवत नाही ते

ते असतं तेच मुळी निवांत म्हणून
जे असतं तेच मुळी एक आरोप घेऊन

## ५. थंड निळाओस एकान्त

थंड निळाओस एकान्त
आसमंतात
ना छाया ना कुठे पंख
थंड निळाओस एकान्त
सगळ्या चंद्रनजरा कोमेजलेल्या
अंतरिक्षात
ना वास्त ना कुठे पुस्त
थंड निळाओस फुलत गारवा
रिक्त सभोत.

## ना. धों. महानोर

जन्म : १९४२; प्रथितयश कवी, कथाकार, कादंबरीकार आणि लोकसाहित्याचे अभ्यासक; चित्रपटगीतकार; ' रानातल्या कविता ' आणि ' वही ' हे कवितासंग्रह; ' गांधारी ' ही कादम्बरी; ' गपसप ' या लोककथांच्या संकलनाचे संपादक; १९७९ पासून महाराष्ट्र विधान परिषदेवर सदस्य म्हणून नियुक्ती; महाराष्ट्र राज्य चित्रपट-नाटय महामंडळाचे सदस्य; शेती हा व्यवसाय. ' गावातल्या गोष्टी ' हा कथासंग्रह, ' पावसाळयातल्या कविता ' हा तिसरा कवितासंग्रह आणि ' पळसखेडची गाणी ' हा लोकगीतांचा संग्रह प्रकाशनाच्या मार्गावर.

## १. रातझडीचा पाउस

रातझडीचा पाउस.
पाउस
भिजले रान.
झाडे झाली मुकी,
फुलातुन
गळे हिमान.
पिकात केशरगंध
सबंध
हिसळते काय.
दाट ढगांच्या छाया
झिम्मा
खेळुन जाय.
घाट. निसरडी वाट
नदीचा
झुलता काठ.
मिठीत बिलगुन चिंब
निथळती
सोनपहाट.
ओलेचिंब सबंध नसांतुन पेटुन रान
रातझडीचा पाउस, पाउस—भिजले गान.

## २. पक्ष्यांचे लक्ष थवे

पक्ष्यांचे लक्ष थवे
गगनाला पंख नवे

वाऱ्यावर
गंधभार
भरलेले ओचे,
झाडांतुन
लदबदले
बहर कांचनाचे,
घन वाजत-गाजत ये, थेंब अमृताचे.

## ३. घन ओथंबुन येती

घन ओथंबुन येती
बनात राघू फिरती
पंखांवरती
सर ओघळती
झाडांतुन झडझडती.

घन ओथंबुन झरती
नदीस सागरभरती
डोंगरलाटा
वेढित वाटा
वेढित मजला नेती

घन ओथंबुन आले
पिकात केसर ओले
आडोशाला
जरा बाजुला

साजण छेलछबेला
घन होऊन बिलगला.

## ४. पाण्यात पारा

पाण्यात पारा
घोटाळे वारा
लाटांत थर्थर झीळ
काचबिंदी निर्मळ.

निर्मळ ओठ
डोळे सावट
मुल्खाचे पिसाट बळ
पार सोसेना कळ.

पाण्यात पारा
मोरपिसारा
उन्हाला जास्वंदी आस
गच्च गुंतले पाश.

## ५. गोऱ्या देहावरती

गोऱ्या ऽ देहावरती ऽ कांती नागीणीचीऽ कातऽ
वेडे झालोऽ आम्ही द्यावी एकादीऽच राऽत

तुझ्या रूपाचं बाशिंग डोळ्याऽत
तुझ्यावाचून सुन्नाट दिनरात

दारी मोर नाचती
आभाळ भऽरती
अस्सं एकादं पाखरू वेल्हाळ
ज्याला सामोरं येतंऽया आभाळ

अशी बोल बोऽलती
जग पंखांत घेती
अस्सं एकादं पाखरू वेल्हाळ
ज्याच्या भांगात बिंदीचा गुल्लाल

याला काय लेऊ लेणं
मोतीपवळ्याचं रान
राती चांदण्यारानात शिणगाऽर
सारी दौलत जरीच्या पदराऽत.

# गुरुनाथ धुरी

जन्म : १९४२; एम. ए. ( मराठी ); कवी आणि चित्रकार; काही वर्षे सचिवालयात नोकरी; नंतर दिल्लीच्या भाषासंचालनालयात काही वर्षे; नंतर मुंबईला महाविद्यालयीन अध्यापन; ‘ ग्लोरिया ’ हा पहिला कवितासंग्रह; ‘ समुद्रकविता ’ हा दुसरा संग्रह १९७७ मध्ये प्रकाशित;

‘ समुद्रकविता ’ या संकलनात त्यांनी आपल्या कवितेबाबतची भूमिका स्पष्ट केलेली आहे. खालील उतारा त्यातीलच आहे.

“ सूर्याखालचे सगळे काही, माणसाची स्वतःशी–समाजाशी–नियतीशी असलेली नातीगोती मला स्वीकारार्ह वाटतात. म्हणूनच जगत असताना येणारी प्रत्येक अनुभूती मला काव्यलेखनासाठी विचारार्ह वाटते....जेव्हा मी कविता मनात फुलवू लागलो तेव्हा मला प्रकर्षाने असे जाणवले की जणू मी कोणी त्रयस्थ आहे आणि आता दूरस्थ कुणाचे तरी शब्द मी ऐकतो आहे. त्या शब्दांतून एक प्रतिमा घडत जात आहे आणि मी स्वतःच्याच अनुभूतीचा साक्षात्कार तटस्थपणे घेत आहे. जेव्हा मी स्वतःसाठी लिहितो असे म्हणतो तेव्हा मी लोकांसहवर्तमान असतो. हे स्वतःत असून स्वतःवेगळे असणे कवितानिर्मितीच्या दृष्टीने मोलाचे असते मला वाटते. ”

## १. घुबडतोंडं मरण आलंय सजून राजवस्त्रांत

घुबडतोंडं मरण आलंय सजून राजवस्त्रांत
उभं आहे अंगणांत
भिजलेल्या वृक्षाप्रमाणे

दशदिशांतून ऐकू येणारी ही टपटप कुठल्या सुगंधाची ?

मध्यरात्री हांक येत्येय
पांढरीशुभ्र, दयामयी,
तेवत्या मेणबत्तीसारखी स्निग्ध
आणि सारं नगर नाकडोळ्यांनी
पाहू लागलंय एकाच काळ्या केंद्राकडे चहूबाजूंनी

घड्याळ टिकटिकतंय
क्षणभरातच ते थांबेल टिकटिकायचं
आणि काळ्या केंद्रांतून एक शुभ्रसतेज पक्षी
कवितेसारखा उडेल अंधारात...

## २. आज कित्येक कल्पांनंतर उघडतंय भूपृष्ठ

आज कित्येक कल्पांनंतर उघडतंय भूपृष्ठ
कोसळतायत माझ्यांतील सनातन बंद महाल
फुटतायत कांचा रंगीबेरंगी आणि भूमिच्या अक्राळविक्राळ जबड्यांत

नाहींशी होतायत माझ्या वंदपणाचीं प्रतीकचित्रं

नीज फुटावी अचानक आणि फणा उभारून यावा
स्वतःच्या अस्तित्वाचा सर्प
तसा भ्यालोंय मी आणि तरी एखादी अव्यक्त प्रेरणा
सावरून धरतेय मला. हीं कोमेजलेलीं माणसं पसरलेलीं सभोवार
भांडणारीं, भोगणारीं, निराशणारीं आणि पुन्हा पुन्हा
गाळांत रुतत चाललेलीं
मी पहातोंय सभोवार एक नवें नातें जडत चाललेलें माझें
माझ्याच एका अपरिचित रूपाशी

मी मार खात आलोंय शतकानुशतकं तरी मी कधी
दुभंगलों नाही संतापानं
मीं उगारल्या नाहींत कधी मुठी स्वतःशीच केलेल्या द्रोहावर
मी सहन करीत आलों शतकानुशतकं आणि फक्त
भिऊन गेलों
मी फक्त गोळा करीत राहिलों माझीं विस्कळीत होत जाणारीं हाडं
आणि करीत राहिलों प्रयत्न मनाला पटविण्याचा
माझ्या व्यक्तित्वाची एकसंधता

तो होता फक्त एक तुरुंग
ज्याला मानलं मी माझा ऐनेमहाल
ज्याच्या रंगीत कांचेमधून मी पहात राहिलों एक बैरागी
परिक्रमा करणारा.
ही परिक्रमा—हें जीवनाकडे पाठ वळवून जाणं—
आणि त्याच वेळीं एका रोमँटिक कल्पनेंत बुडवून टाकणं स्वतःला
की मी आहें सनातन अलिप्ततेचं प्रतीक
—सनातन परंपरेचं प्रतीक—

गुरुनाथ धुरी पासष्ट

तुरुंगांतल्या कैद्याचं जीवन अनुभवलं मीं निरंतर

आणि आज उद्रेक होत चाललाय, उघडतंय भूपृष्ठ जागोजाग
मी पहातोंय एक सुरचित व्यवस्था कोसळतांना
मी अनुभवूं लागलोंय उकळणाऱ्या लाव्हा हजारो जीवांतून
जे अनुभवतायत जिवंतपणींचं मरण नियतीनं त्यांच्यावर लादलेलं
जे करूं लागलेयत सतत प्रयत्न तुरुंगांतून बाहेर पडण्याचा
तुरुंग फोडण्याचा
मला जाणवतंय की हीं दोन्हीं रूपं माझींच—
पिळणारं आणि पिळलं जाणारं.
आणि त्याच वेळीं मला वाटतंय की मी स्पष्टीकरण देऊं लागलोंय का ?
मी जर एक असतों तर दुसरा नसतों आणि
दुसरा असतों तर पहिला नसतों.
हें माझं अवस्थान्तर देणार आहे का मला चिरस्थायी शांती ?
मला दिसूं लागलंय एक विराट चक्र उत्पत्ति–स्थिति–लय ह्यांचं
आणि दिसूं लागलोंय मीच मला पुन्हा परिक्रमा करतांना.

पण ह्या जाणिवेच्या क्षणावर नाही कोणतीही रंगीत कांच
मी नाही अलिप्ततेचं प्रतीक
मला सुटायचंय फक्त माझ्याच अंतःकरणातल्या तुरुंगांतून
ज्यांत होतात माझींच दोन प्रतीकं तयार
सतत उसळणारीं कोसळणारीं एकमेकांवर
मला फक्त व्हायचंय अत्यंत निर्मोही
पुन्हां जगांत परतण्यासाठी माझे अत्यंत शांत तरीही
दृढ डोळे घेऊन.

सहासष्ट गुरुनाथ धुरी

## ३. घंटानाद

सुषुप्तीतून ऐकू येणारा घंटानाद
साऱ्या गावाला कवेत घेतो
पिवळे जर्द गवत होतात डोळे. आकाशाचा नीलिमा
घंटानादासारखा विस्तारत जातो माझ्या नेणिवेत.
ही खिडकीची चौकट, समोरची उंच झाडाची लकेर
पलीकडे वहात जाणारी वाट
हे सारे मी पहातो घंटानादात विरून जाताना
एक चिमुकला पक्षी डहुळणारा गवत लाटांवर
कदाचित माझ्या मनगटावरही असेल
सारा विस्तार तो पेलतो या निळ्या आभाळाचा
माझ्या नेणिवेतील सर्व तरंगांचा केंद्रवर्ती
तो चिमुकला पक्षी

## ४. दान

त्याच्या अंगांगाला फुटलेल्या
फांद्या पसरून
त्याने फुले देऊ केली
तेव्हा एकेक पक्षी येऊन
एकेक फूल घेऊन गेला

जेव्हा फुलंच उरली नाहीत त्याच्यापाशी
त्याच्या फांद्या झाल्या —
याचकाच्या पसरल्या हातांसारख्या.

गुरुनाथ धुरी सदुसष्ट

तेंव्हा कातरवेळेचे अजस्र पंख फडफडवीत
एक पक्षी आकाशातून आला
सबंधच्या सबंध त्याला
उपटून काढून घेऊन गेला

## ५. समुद्र

समुद्र पहाताना एकांतरात्री एकट्यानेच
मला आठवतोस तू : समुद्रवेडा आणि तुझ्या समुद्रकविता....
तलतची गाणी, आईच्या मृत्यूचा शोक,
स्मशानभिंतीवर रेखाटलेले उडते पक्षी....
तुझी सुखं आणि दु:खं : सारीच समुद्रानं ओरबाडून नेली
पण समुद्राशी तू नेहमीच कृतज्ञ राहिलास समंजसपणे
इतर कोणत्याही गोष्टीवर लघवी केलीस बिनधास्त तरीही
समुद्रात मात्र कधीच नाही.... कधीच

खूप वर्षं झाली त्याला
किती किती समुद्र तुझ्यामाझ्यातून ओसरून गेले !

नंतरच्या तुझ्या आठवणी सचिवालयातल्या
डोळ्यांतला समुद्र आटवीत तू निमूट कारकुनी केलीस
समुद्राने घेरलेला तू : आता तुझ्याभोवती फायलींचं जंगल
आणि चेंबर्सच्या गुहागुहांतून हिंस्र श्वापदं
तिथे आपण नेहमीच समोरासमोर येत असू
पण कारकुनी जगात समुद्राला मज्जाव असतो
आणि क्षणभर थांबून मनापासून बोलावे

असे किनारेच आपल्याला सापडले नाहीत

नंतर तू नोकरी सोडलीस अचानक. किती शांतपणे !
कोणालाच कारण कळले नाही. नंतर कितीतरी दिवस वाटायचे—
गेला असशील कँटिनमधे चहा प्यायला;
येशील एवढ्यात !

समुद्र पाहिला होता — आता मला समुद्रातला वडवानल दिसला
तू निघून गेलेला कळले दूरच्या जिल्ह्यात
अकिंचन भूदासांचा आत्मविश्वास जागविण्यासाठी.
त्यांच्याचसारखा फाटका.
अरे, कुठल्या समुद्राने घातला होता
त्याच्यावरील आकाशातला सूर्य
तुझ्या ओटीत ?

त्यानंतरची तुझी भेट तुझ्यावर झालेल्या खुनी हल्ल्यानंतर
मोडलेल्या हातापायांवरील उपचारासाठी या महानगरात आल्यावर.
खूप बोलायचे होते, खूप बोलून झाले,
खूप बोलायचे राहून पण गेले....
" किती दिवस पहातोय मी या आर्थोपिडिक्समध्ये
माणसांची हाडं करवतीनं कापताना, भोकं पाडून स्क्रू पिळताना;
वाटतं की साला माणूस म्हणजे माणूस नाहीच—
नुसताच आपला टेबलखुर्ची ! " आणि पोरासारखा हसलास....
मग अचानक गंभीर होऊन म्हणालास,
" टेबलखुर्चीच, पण फुलं येणारी....लाल रसरशीत फुलं.... "

अलिकडेच तू लिहिलेले वाचले कुठेतरी :

“ माणसाला शोधायला समुद्राकडे गेलो, आता समुद्र शोधायला
माणसांत जात आहे.... ”

आज समुद्र पहाताना एकांतरात्री एकट्यानेच
मला दिसतोस तू सर्वदूर पसरलेल्या माळावर
काटेरी निवडुंगाप्रमाणे
शीर्षावर लाल जळता डोळा उघडून उभा राहिलेला.

सत्तर गुरुनाथ धुरी

## वसंत दत्तात्रेय गुर्जर

जन्म : जानेवारी १९४४. सर्व आयुष्य मुंबईत. शिक्षण इंटर आर्टस् नापास एवढं. बॉम्बे पोर्टट्रस्टमध्ये लेखनिक. आतापर्यंत राजा ढाले प्रकाशनातर्फे ' गोदी ' हा कवितासंग्रह, वाचा प्रकाशनातर्फे ' अरण्य ' आणि प्रास प्रकाशनातर्फे ' समुद्र ' असे तीन कवितासंग्रह प्रकाशित. मराठीतील लघु नियतकालिकांच्या चळवळीशी संबंधित. ' माणसाच्या उत्पत्तीचा शोध ' अशी त्यांची त्यांच्या कवितेबाबतची संक्षिप्त भूमिका आहे. ' ललित 'मधील परिचयात ते म्हणतात :

" माणसांचे दुबळेपण–व्याकुळता–एकाकीपणा. स्वतःत संघर्ष. दुभंगलेपण. वाचन-लेखन–घरकाम–प्रवास–चित्रसंगीत–टेबलटेनिस यांत गुंतून माणसाला माणूस म्हणून सर्वार्थाने जगण्याच्या शक्यता निर्माण करणाऱ्या प्रश्नांची उत्तरं ही प्रयोगात्मक आहेत. समाजाची आजची व्यवस्था माणसाला शारीरिक–आर्थिक–मानसिक झिजत झिजत मारणारी आहे. भारतीय जनता कोडं आहे. मन अथांग आहे. काही काही म्हणून थांगपत्ता लागत नाही. माणसाच्या विराट एकाकीपणाला शब्दबद्ध रूप देण्याचा प्रयत्न. .... जे लिहायसारखं असतं ते मनातच राहतं. राहावंसं वाटतं. त्याचीच झिंग येते. ते कागदावर उतरावंसं वाटतच नाही अलिकडे. "

# १. रिकामा रंगमंच

रिकामा रंगमंच
मी खुर्चीत डोळे मिटून
चिडीचूप

डोळे उघडून पाहिले
तर
सर्व रस्ते
खुर्च्यांत दिसले

आणि खबर तर अशी :
घर माणसांनी भरलेलं आहे

रंगमंचावर तर चिमण्यांचा
चिवचिवाट

नंतर एकदम शांतता

म्हणून आजूबाजूला पाहिलं
तर
समुद्र
गलबलता

रस्ते
चिमण्यांचा चिवचिवाट
गलबलता समुद्र

घर माणसांनी भरलेलं आहे

रिकामा रंगमंच
नंतर एकदम शांतता

## २. लायनी जन्माचे भोग

लायनी जन्माचे भोग जीवन म्हणजे पाणी आणि घोंघावणाऱ्या
माशा विषयवीणा विषयवासना विषय विचविचित काही
पचपचित बटबटीत पाणी आणिक रंगीत सूर्योदय
सूर्यास्त निशाण्या वरखाली आयुष्य केबिनमधल्या
नागड्या उघड्या स्त्रिया माणूस सांगाडा आठवणी
खोट्या खोट्या वाटणाऱ्या भोग प्रत्येकी शून्य
वाट्यास येणारं जगणं १ ला वर्ग २ रा वर्ग
फांशी काळंपाणी सक्त साधी मजुरी जगाचं
बंदिस्त जळत जाळत आयुष्य उभावत
दोन पावलं चार पावलं पडल्याचा आविर्भाव
सावरल्याचं सोंग २ चे ४ हात सावकाश
बालीशपणे हालचाली पहात सर्वत्र अनोळखी
आसमंत कुबट मजा हे वेगळंच पण थोड्या
जवळीक सागरिक लांब समोर
डोळ्यात येणारं पाणी खारं समुद्र
खारा शांत बाहेर कल्लोळ तरीही शांत
तरंग पाण्यावरचे रंग पुढे पुढे विद्ध
शांत रिकामं मन बाजूला दिसतंय
शरीर आदळतंय टबात भरल्या जाणाऱ्या
मॅंगनीज ओरप्रमाणे

## ३. ही एक गोष्ट लाटांची

ही एक गोष्ट
लाटांची

पावलं वळली
वाळू सरली
उन्हं उतरली
सूर्य बुडाला
काळोख झाला

समुद्र
भरती ओहोटीतला

लाटा संपल्यातर

ही पावलं तशी आपसूक
विसावली
आधींच्या दूर मन – लाटा
हे माझे जिवंत डोळे
वागतात
वाळूंचे चित्रमयी गाणे
समजून

हे माझे हात
स्पर्शतात

मावणारी
फुलं उमजून

हे एक आपल्यात
अवयव
बनून
हे असं का
लाटा संपल्या तर
ह्याची एक गोष्ट बनून
समुद्रालाच
अर्पण
करू
शब्दातल्या।

## ४. समुद्राला आंदण हे शहर

समुद्राला आंदण हे शहर
माझं शरीर मी फेकतोय लाटांवर
आदळतात लाटा किनाऱ्यावर
तुटीफुटी शरीर पायतणाखाली चेपतंय
विश्व पोटात घेणाऱ्या दिंड्या किनाऱ्यावर

दिंडो दरवाजा : आत मापतो विश्व जोखतो पाणी
मी टाकतो अंग आणि स्वीकारतो
मला

हवेत हवेत मी चालतोय वरवर
सर्व तुटून पडतंय खूप मागे पडतंय
चिक्कार वर्षं

स्टँड रस्त्यालगत घरं समुद्राची दौलत गिचड चिखल
समुद्रकन्या सागरी साहसी अंतर्गत संघर्ष

सर्वगुल होतोय किनारा
अवयव नाकारतात एकमेक

अजब
हवेत उडत जातंय मरण
मी बाहेर येतो दरवाजा वरवर
मी उचलला जातोय चंद्र वरवर
वरवर निरवानिरवीत ठाकुरद्वार
तर मी घरात वरवर
हलकं हलकं मी मजेत वाहून
हवेतल्या सजेत तरंगत

## ५. आम्ही माणूस म्हणून जन्माला आलो

आम्ही माणूस म्हणून जन्माला आलो । चांगलं झालं । आम्ही बोलू शकतो वाचू शकतो अन् ऐकूही शकतो । आणखी एक । आम्ही माणसांत राहू शकतो । नाहीतर पशुपक्षी । फक्त पहातात ऐकतात ऐकून घेतात न समजूनसुद्धा । आम्ही माणूस म्हणून जन्माला आलो । चांगलं झालं

आम्ही प्रेम केलं । चांगल्या मुलीवर । तीही गोष्ट चांगली झाली । ती गोष्ट काही माणसांना सांगावंशी वाटली सांगितलीही । नाहीतरी लपवून ठेवण्यात काहीच अर्थ नाही । एक दिवस समजणारच । आम्ही प्रेमात फसलो । तीही गोष्ट काही माणसांना सांगितली । कुणाचाच दोष नव्हता । होतं ते सगळं भल्यासाठीच । आता प्रेमबिम करायचं नाही । तसं कधी वाटलं तरीसुद्धा

आम्ही माणूस म्हणून जन्माला आलो । चांगलं झालं । आम्ही ओरडू शकतो गाऊ शकतो हसू शकतो रडूंही शकतो । काहीकाही वेळा मुद्दाम अशा गोष्टी कराव्या लागतात । शेजारच्या खोलीतला माणूस एक दिवस देवाघरी जातो तेव्हा रडावं लागतं सगळे रडतात म्हणून । नाही रडलं तर म्हणतात ह्याला भावना नाहीत । मी गेलो तर कुणी रडू नये खरंखरं न् कृत्रिमही । कारण सर्वंच माणसं देवाघरी जाणारायत् । मग रडायचं का नि कशासाठी । जन्माला आला मरेपर्यंत जगला मेला एवढंच । जन्माला आला । काहीतरी झालं पाह्यजे त्याच्या हातनं तेही एवढ्यासाठीच

आम्ही हसू शकतो । केळाच्या सालीवर जेव्हा नायलॉनी स्त्री पडते तेव्हा । खरंच खरंच बरं वाटतं तेव्हा पाहताना अन् आम्ही । हसतोही हसलंच पाह्यजे चालता येत नसलेल्या उंच टाचांच्या सँडल्स घालणाऱ्या स्त्रियांना । नाही । एका दृष्टीनं आम्हीही चुकतो । लिपस्टिकनं एखाद्या स्त्रीची शान वाढत असेल ओठ काळे न होता तर लावायला हरकत नाही । क्रेप नायलॉनचा आखूड बाह्यांचा ब्लाउझ अन् बिजली नायलॉन साडी नेसून । चांगली दिसत असेल तर नेसायला हरकत नाही । तेवढी समंजस सौंदर्यदृष्टी असलीच पाह्यजे

आम्ही माणूस म्हणून जन्माला आलो । चांगलं झालं । डोळ्यांना मोहवणारे क्षण आम्ही पकडू शकतो । किती किती चांगलं वाटतं मनात

वसंत दत्तात्रेय गुर्जर सत्याहत्तर

गुदगुल्याही होतात। एखादी अनाहूत मुलगी रस्त्यात भेटते। अन् म्हणते। आपण त्या दिवशीचे ‘ तुम्ही ’च का ?। काव्यवाचन केलेले ? आवडलं मला। कशा हो कविता लिहिता ? हे तुम्हाला जमतं कसं ?। एकपाठोपाठ एक प्रश्न। उत्तर एकच। आता जपून वागलं पाहिजे। प्रेमबिम काही नाही। वाटलं तरीसुद्धा। ती चांगली आहे। मीही चांगला आहे। माणसं चांगली आहेत। आम्ही माणूस म्हणून जन्माला आलो। तेही चांगलंच आहे। कधी रंगात आलो की आम्ही गाऊ शकतो। आमच्याबरोबर इतरांच्या कविता। तेव्हा आवाज आपोआप आपला चांगला वाटतो गळा नसतानासुद्धा। काय गंमत आहे नाही। आम्ही ओरडू शकतो। झालाच पाहिजे झालंच पाहिजे। अमक्या-तमक्याची दादागिरी नहीं चलेगी नहीं चलेगी। जो हमसे टकराएगा मिट्टीमें मिल जाएगा। हमारी माँगें हमको दो नहीं तो कुर्सी छोड दो। अमकातमका मुर्दाबाद अमकातमका झिंदाबाद। आम्ही ओरडू शकतो

आम्ही माणूस म्हणून जन्माला आलो। चांगलं झालं। ओरडू शकतो गाऊ शकतो हसू शकतो रडूही शकतो। अन् आणखीनही काही करतो निसर्गानं दिलेल्या शक्तीनुसार

सवय सवय म्हणून। सकाळी दात घासतो। किडू नयेत म्हणून। सकाळी टमरेल घेऊन रांगेत उभं राहतो शारीरिक शुद्धीसाठी। सकाळी आंघोळ करतो। रोग होऊ नयेत म्हणून। सकाळी वर्तमानपत्र वाचतो। जगाचं ज्ञान होण्यासाठी। मग साडेनवाला आम्ही जेवतो। जगण्यासाठी। मग ऑफिसात जातो। काम करतो। एकशे एकसष्ट रुपयांसाठी। संध्याकाळी घरी येतो। आईवडिलांनी लग्न लावून दिलेल्या मुलीबरोबर फिरायला जातो। चौपाटीवर फिरायला जातो। नारियलका पानी पितो। घरी येतो जेवतो। मी माझ्या खाटेवर झोपतो। ती तिच्या खाटेवर झोपते। सवयीनुसार मी तिच्या खाटेवर जातो। कधी कधी तीही माझ्या खाटेवर

असते । आई बाहेरच्या खोलीत असते । वडील गॅलरीत असतात । मग मी दार उघडतो । दुधाच्या दोन बाटल्या हातात घेतो । आदल्या रात्रीचा शर्ट घालतो । तीन जिने उतरतो । दूध सेंटरवर येतो । चोपन्न पैसे देतो । दोन बाटल्या घेतो । दुधाच्या । तीन जिने चढून पहिल्या खोलीत येतो तेव्हा बायको स्टोव्ह पेटवते । मग मी दात घासतो । आदल्या दिवसाप्रमाणं सर्व करतो

आम्ही माणूस म्हणून जन्माला आलो । चांगलं झालं । आम्ही माणूस म्हणून मरणार । तेही चांगलंच आहे । सहा हातांच्या तीन तोंडाच्या ईश्वरानं शांती द्यावी । हेही चांगलंच आहे । खूप चांगलं आहे । ईश्वर मला शांती न् सद्गती देवो ।।

# सतीश काळसेकर

जन्म : १९४३; कवी आणि अनेक लघुपत्रिकांचे संपादक; ऑल इंडिया बँक एम्प्लाइज् युनियनचे एक राज्यस्तरीय नेते; साम्यवादी राजकारणाशी संबद्ध; पहिला संग्रह 'इंद्रियोपनिषद' १९७० मध्ये प्रकाशित; लेनिनवरील कवितांच्या संग्रहाचं संपादन; बँक ऑफ बडोदाच्या केंद्रीय शाखेत नोकरी. 'जाहीर शिरकाणानंतर' हा दुसरा कवितासंग्रह प्रकाशनाच्या मार्गावर. 'मागोवा' आणि 'लोकवाङ्मया'च्या संपादक-मंडळातही काही दिवस. वाचा प्रकाशनाशी संबद्ध.

## १. महाबलीपुरम्

महाबलीपुरम्
रखरखते ऊन
चंद्र, सूर्य, दिशा
ओसंडून समुद्र
झेपावत तुझ्या दिशेने
अपूर्व संभोग

सामोरे किरण
माझ्या विलासी इंद्रिया
कठीण पाषाणवत् तुझे स्तन
उभार उजळ तुझे
अक्षय्य नितंब

ये जवळ ये, प्रकाशीत
खंबीर पाषाणी कर्तृत्वात
सरळ किरणवत्
अपूर्व संभोगसमृद्ध.

## २. ईश्वरासाठी शोकगीत

एक :
ईश्वरा मला आधार हवाय
माझ्या निर्णायक डोळ्यांत

ताडमाड उंच एखादा पिरॅमिड
एखादी ममी एखादे प्राचीन
अर्वाचीन थडगे
मी पापासाठी मी पुण्यासाठी
नीती अनीती पत्नी मी सर्वांसाठी
बधिर होऊ दे

मला हिवाळ्यातून जाऊ दे
उन्हाळ्यातून जाऊ दे
पावसाळ्यातून निचरा होऊ दे
कचरा होऊ दे घाणीचा एखादा
प्रचंड साठा मला जाऊ दे
नरकाच्या वाटेने ईश्वरा तू
नाकार माझे भवितव्य ईश्वरा
मी पार्थिवाचा नकार होऊ दे
मला हवीय नरकातली अभेदशीतता
मला हवेयत पापपुण्यापलीकडचे
आधार ईश्वरा माझ्यासाठी
वेश्यागृहांचे दरवाजे खडाखड
बंद कर हिरवे लाल निळे कंदील
पटापट विझव ईश्वरा मला खेच
रस्त्यावर रस्त्यातल्या गुत्त्यावर
महारोग्यांच्या बिछान्यांत
काळोखात रस्त्यावर मला
संभोग हवेत अखेरच्या रात्री आधी
मला नरक पाहू दे ईश्वरा
मला संपव तुझ्यातले दोर भराभर
कातरून टाक सैरभैर होऊ देत
माझ्या देहाचे तुकडे ईश्वरा

ब्याऐंशी सतीश काळसेकर

ह्या युगातल्या टोटल अंधारात
माझ्यावर पाशवी अत्याचार
बलात्कार जुगाराच्या अड्ड्यावर
मला बसू देत जोड्यांचा मार
माझी कातडी होऊ देत दडदडीत

दोन :
ईश्वरा कुठला संकेत मी कविता निर्माण करतोय
कुठला संकेत मी संभोगात एकाग्र होतोय संकेत
मी शब्दांच्या शोकारण्यात अरण्यरुदन करतोय
कुठला संकेत मी रणरणतोय वणव्यात
मूलतः प्रत्येक संध्याकाळ एक शोकान्त आक्रान्त
कुठल्याही गगनचुंबी इमारतीची अखेरची खोली
एकान्त मला हवाय मृत्यूसाठी माझ्यासाठी
संध्याकाळी येतात दुःखाचा कडेलोट
' निळ्या सारणीतून वहाते दुःखाचे पाणी '
मी कातरतोय कारकुनीच्या अक्षम्य अज्ञातवासात
कारावासात आकड्यांच्या कडबोळ्यात नष्ट होतोय
ईश्वरा कुठल्या आगामी संकेतात

कोण घालील माझ्या शवावर अखेरचे शुभ्रवस्त्र
म्युनिसिपालिटीचा नोकर कोणाला खरे दुःख
प्रिया दूर विजनवासी एकान्त
ईश्वरा मला निर्माण का केलेसं
मॅरिलिन मन्रो हरवतेय निद्रेच्या गोळ्यांतून
' बुद्धम् सरणम् गच्छामि '
' धम्मं सरणम् गच्छामि '

सतीश काळसेकर न्याऐंशी

निद्राधीन मृत्यूधीन गुरुदत्त सरकतोय
ईश्वरा डोळ्यांना स्वप्ने का दिलीस

पापपुण्य नीती अनीती दारू चरस अफू भांग
मी कशात हरवू सर्वस्व ईश्वरा कशात—

## ३. संभोगाच्या रात्री

### १. कल्पनेतून :

अचानक येऊ लागतात
जंगलातून हिरवी राने
घरात सूर्याला क्षणभर
बाजूला करून अंधारात
समुद्र उत्साहित इंद्रियांचे

आक्रोश पानापानातून
रानारानातून मारव्याच्या
लहरी उगवतात इंद्रिये
शिथिल सावकाश सावकाश
हस्तमैथुन

### २. आधीची :

माध्यान्हीचा तळपता सूर्य
उगवते संभोगाची पहिली

रात्र हे निशाचर चमू
तू सूर्याला सांभाळ मी
तिच्या इंद्रियांना संभोगपूर्व
आदिकवितेत संपवतोय

३. नंतरची :

इंद्रिये कवटाळू पहाल्या संभोगाच्या रात्री
बंद होत जाणाऱ्या खिडक्यांचे दरवाजे
घेतात शवे आत काळोख पसरतात

छतातून बिछान्यात आठवणींच्या
तुंबलेल्या गटारातून वाहतात पाट
वीर्याचे तुडुंब नको हा काळोख
आवरा करा खचाखच
इंद्रियांची खच्ची करणे रिकामे
बिछाने वीर्यांचे कडेलोट
होतायत होऊ द्यात.

४. नंतर कित्येक :

बथ्थड इंद्रिये गिरवा अक्षरे
ओढा रेघोट्या नेहमीचा काळोख
पांघरुणातून लपवा सराईत
इंद्रियांना इंद्रियांची आवरणे
घाला टोप्या बदला बदलू नका

इंद्रियांच्या तमाशावर चवल्या

सतीश काळसेकर पंच्याऐशी

पावल्या उडवा माद्या चढतात
नरावर तेव्हा इंद्रिये बद्द वाजतात
कूस वळते झोप संभोग झोप

## ४. तसं तिच्या घराच्या माथ्यावर

तसं तिच्या घराच्या माथ्यावर
आधी कधीच छप्पर नव्हतं

प्रतीकात्मक आकाश तर तेही
तिच्यासाठी नेहमीच फाटलेलं असायचं

आणि आत्ता असा हा पाऊस कोसळतोय
त्यावेळी लिपस्टिक शिवायच
तिचे ओठ
गर्द लाल गुल्मोहर फुलावा
तसे ताजेतवाने असायचे
आता साऱ्या अंगभरचंच
रक्त वाळत चालल्यावर

आता ह्या नव्या ऋतूबरोबर
नवा मोसम सुरू होतो शाळांचा
आधीच्याच यत्तेत जाता न आल्याने
हाही मोसम तिच्या मुलांसाठी
शाळेशिवायच

तशी तर किती तरी मुलं असतातच
शाळेशिवाय
पण माझ्या संदर्भात तिच्या मुलांचे
हे असे असणे जरा लागतेच

खरं आहे
की तिच्या जगण्याचे प्रश्न
माझ्या अशा झुरत राहण्याने
सुटण्यासारखे नाहीत.

## ५. त्या जाहीर शिरकाणानंतर

त्या जाहीर शिरकाणानंतर
रक्तातल्या लाटा मंद मंद
होत निवान्त

कोंभच कापल्यावर छाटणी केलेली
त्याची बोटं
रुजू होतात
नित्यशार यंत्रावर

साजण,
या मोसमी वाऱ्याबरोबर
अवेळ तांबडा बहर पेलतायत्
ही बदामाची झाडं
शिल्पासारखी

आता प्रेतवत्
कसं परतावं
या अजस्र बांधकामातून
किती सावल्यांचे थर
उलथवत आपण सरकावं आपल्या
पुनरुत्थानाच्या दिशेनं.

जन्म : १९४१; मराठी आणि भाषाशास्त्रात एम्. ए.; काही वर्षं सचिवालयात नौकरी; नंतर पाच वर्षं शहाद्याला ' श्रमिक संघटने 'त काम; महाराष्ट्रातल्या ' मुक्त साम्यवादी गटा 'शी संबद्ध; हल्ली पूर्णवेळ लेखन आणि डाव्या चळवळीत कार्य; ' हिल्लोळ ' आणि ' धादान्त आणि सुप्रमेय्यमधल्या मधल्यामधल्या कविता ' हे दोन काव्यसंग्रह; पाब्लो नेरूदाच्या कवितांची भाषांतरं ' साग्र प्रकाशना 'तर्फे प्रकाशित.

स्वतःच्या काव्यविषयक भूमिकेबावत १९७५ मधे त्यांनी अनिल बांदिकरला लिहून दिलेल्या विस्तृत पत्राचा हिंदी अनुवाद ' आवेग : २१ ' मधे प्रकाशित झालेला आहे. खालील उतारा त्यातूनच घेतलेला आहे :

' ....बदलत्या वास्तवात गतिशीलता बघण्याचा प्रयत्न याच काळातला.
पण वास्तवात अनेक गोष्टी असतात. आपलं वय असतं.
संवेदनशीलता असते. बाहेरचं जग असतं आणि सगळयांहून थोर असे आपले दोस्त असतात. त्या सगळयांसोबतचा आपण काही समजून घेत असतो .... या सगळयांतून आत्मविश्वास मिळवण्यासाठी आणि बाहेरच्या जगाचं आकलन करून घ्यावं म्हणून मी एका वेगळयाच भाषेच्या शोधात होतो .... आम्ही सगळयांनी मिळून साहित्यातल्या जुन्या गोष्टी, रोमँटिक अंधश्रद्धा, जगण्यापासून पाठ फिरवण्याचा भित्रेपणा कायमचा फेकून देण्याचा प्रयत्न केला .... एकाकी लढणं अशम्य होतं. चुकीचंही. लक्षात आलं की लढायचं असेल तर राजकारणाशिवाय अशम्य आहे. मग कवितेवर प्रेम करणारे लोक हळूहळू वास्तवातील जगण्यावर प्रेम करू लागले. आपलं सामूहिक जीवन समजून–उमजून घेण्याच्या आणि ते बदलण्याच्या प्रयत्नात लागले .... जीवनावरचं प्रेम वाढत गेलं. आधी नुस्तंच कविता लिहिणं होतं, आता कवितेतून लोकांकडं आणि लोकांकडून कवितेकडं असा एक अखंड प्रवास सुरू झाला .... ''

## १. कमळांचा सव्वीस अर्थ सांगणारे कुडबुडे

कमळांचा सव्वीस अर्थ सांगणारे कुडबुडे
आणि आर्किटायपल प्रतिमांच्या काळोखात गारठलेले
माझे मित्र
प्रदीर्घ रात्रीच्या सहवासातील पक्षी
जेव्हा नकळत करतात अवकाशयानाप्रमाणे अलक्ष्य फ्लाय
तेव्हा मला जाणवते कालस्पंदनातील एक आवश्यक
युद्धविरामाची तृप्ती.
संदर्भहीन स्मृतींमध्ये
किती फॅक्टऱ्यांचे आत्मे दुमजली बसेस आणि
स्वच्छ निरीच्छ आकाशाची विटंबना करणारी
नवजात स्कायस्क्रेपर्स कशी करतात निसर्गशुद्ध बलात्कार
तेव्हा माझ्यावर. कमळांचा सव्वीस सांगता येतो
बदलणारा अर्थ सव्वीस ग्रीष्मानंतर. मृत्यू
आणि रेतस्खलनाचा परस्परसंबंध. भीतीचा
पुनर्जन्म पिढीजाद वास्तवातून. जणू आदळतो
प्रणयाचा महापूर ओसरून गेल्यावर सर्वच प्रतिमांचा अर्थ.

## २. ते । तू । आपण । सर्व

ते । तू । आपण । सर्व
पक्षी । मोहरातले पक्षी—अस्तचल त्यातून
झाडांची छायार्तता । विषण्ण रात्र ।
निर्विकार दुःखातून फुलांची मालवती गाणी ।
ह्या शहराचे प्रचंड ' गेट वे ' म्युझियम्स ।
पक्षी, पक्ष्यांची भरारी गेटवेच्या वेशीतून समुद्रपल्याड ।

वीर । जवान । सूर्यसन्मुखता वाळवंटात ज्यांच्यासोबत
ते । रेल्वे रूळ शेजारचे लख्ख हिरवे सिग्नल्स
अपघातातील भेसूर भुते – रेल्वेमंत्री – दिल्ली दूर है ।

शहराशी नाते सांगणाऱ्या दहा दिशा । कोटी – अब्ज –
निखर्व – अब्जपार अवकाश । स्लमचा होतो त्रास
समुद्रसरावबाल्यांना । करून अनारंग – विनारंग –
सर्वरंग छक्केपंजे चोराचिलटांनादेखील । हप्तेबाज पोलिस ।
सर्वगमनी रांडा । दादा – वेश्यापुरीत बजबजाट – बकबकवाले ।

निरीश्वरवादी – सर्वेश्वर – श्रीमंतीतले तत्त्वज्ञानी ।
उथळ कोथळा बिहारातल्या भूकबळींचा । पाउंड आणि
सुवाच्य रिल्के । कवितेचे अजरामर शव माझ्या अभारतीय ममीत ।
संध्याकाळी मावळते साम्राज्य – मी गायली सूर्यफूलसूक्ते
तुझी प्रतिबिंबे – मावळण्यापूर्वी – मोजून ठेवले शब्दांचे
अर्थ अनिवार्य शांततेतून – निष्प्राण टेलिग्राफिक खांबांसोबत
राहिले बसून तळाशी – हुंकाराशी जडावलो नाही – तुझ्यात –
माझ्यात – सर्वभर मसाला वागविणारी कविता + ममी । तरी वाढलो
शहराचे अस्तित्व । विधानांचे अर्थ । चेहरा
ओळखीसाठी । हातपाय अनावश्यक, महापुरुषाला । सामर्थ्याला
नको खुणेचा बांध ओलांडून जाता येते । ओलांडून जातात –
पावसाळतात – उन्हाळतात – हिवाळतात – आणखी इतर सर्वतात–पक्षी
रात्र – दुःखफुले – गेटवे – म्युझियम्स – जवान – सिग्नल – भुते–दिशा–
आकाश – स्लम – छक्केपंजे – पोलिस – रांडा – निरीश्वरवादी–श्रीमंत
कोथळा – पाऊंड – रिल्के – शवसाम्राज्य – मावळण
तू – तुझी प्रतिबिंबे – शब्दांचे अर्थ – शांतता – टेलिग्राफिक – बसलो
हुंकारलो – तुझ्यात माझ्यात – तरी वाढलो ।
अस्तित्व – अर्थ – चेहरा – बांध – महापुरुष – उन्हाळा – पावसाळा
हिवाळा आणि इतर सर्व तत्काळा –

तुलसी परब एक्याण्णव

च्या सर्वंकष सत्तेपुढचे ते । तू । आपण । सर्व ।। आणि सर्वस्व ।।

## ३. पडत धडपडत हेकेखोर वेड्यासारखा

पडत धडपडत हेकेखोर वेड्यासारखा
मी ओरबाडून काढतो कैदी कपडे
आणि चढवतो समोरच्या पुतळ्याला ते :
माझ्या सगळ्या सांवत्सरिक चिंध्या
याला ढकलून दिला पाहिजे
तिथे माझी स्थापना केली पाहिजे
पण याचे ब्राँझ चमकते देवमाशासारखे
आणि याचे शरीर लखलखते क्रूर मोरासारखे
हा दैवी वेडझवा हा जगन्मान्य आपोलो
याचं इंद्रिय म्हणजे होता चांदण्यांचा पुंजका
आणि त्याला जडवलेला वेडाचा आंधळा चंद्र,
आणि त्याची सामुद्रिक गती सगळी अवरोधलेली
कुठल्या पुष्पक, कुठल्या हेलिकॉप्टरने याला टाकल
या दुष्ट दुनियेत दीर्घ किंकाळ्यांच्या
सुप्त शोकाने बरबटलेल्या रात्रींच्या
एकान्ताने वेढलेल्या आपमतलबाच्या
कसा एवढा प्रदीर्घ अवकाश हा झेपावतो आता
बाहू घनघोर, अवाढव्य उभारून
कसा हा उपद्व्याप करतो सगळ्या
जेलाला मोठा संदेश देत असल्यासारखा
अरे मूर्ख तोतया, तुझी ही भूमिका झालीय मर्त्य,
तुझ्याही इंद्रियांवर माश्या बसतात घोंगावत
नि तुझे मोडकळीला आलेले सगळे स्वरूप

लोकांनी हात लावून लावून चाचपून पाहिलेले.
फेड हे अघोरी दुखणे, ये माझ्यासारखा
या सळ्यांच्या आत
खा कोंड्याची रोटी, मातट पाणी आणि
घे ईश्वरी स्वराज्याचे प्रत्येक सकाळी नाव.
अरे दैवी आपोलो, आपला म्हणताही येत नाही तुला
म्हणून मी झाकतो सगळ्या चिंध्यांनी तुला
आणि माझ्या शापाचा डोळा वटारून ठेवतो तृप्त तुझ्यावर

## ४. ही अखंड उलाढाल. ही सामुद्रधुनीच्या

ही अखंड उलाढाल. ही सामुद्रधुनीच्या
आकाराची मंद हालचाल : कित्येक
वर्षांच्या काळानंतरचं परतीच उत्थान.
मी पहातो माझ्यासमोर जुनी नाती मोडकळलेली,
संघटनांना आतून छेदून काढणारा स्वार्थांध चाकू,
त्याची मोहक म्यान गंजून गेलेली
आणि हस्तेपरहस्ते तिला वागवणारा म्हणतोय स्पष्ट

त्याच्या विस्तारलेल्या वासना, त्याच्या शोषण नाड्या
विस्तारलेल्या बुभुक्षित जिथपर्यंत पोचल्यात
तिथपर्यंत नाचत तुडवून जनआकांक्षा टाकणारा
तो म्हणतोय, हा कोसळता, कोसळायला आलेला
कचकड्याचा परप्रकाशी सूर्य, आतून पोखरलेला
हा विपर्यासाचा स्पष्ट पुरावा, हे आंधळं बेट
हे लुटीला आमंत्रण देणारं उदार राज्य

तो म्हणतोय, मी हिस्सा मागतो आणि
हा हिस्सा मला मिळालाच पाहिजे,
मी नागवं व्हायला सांगतोय म्हणजे व्हीनसने नागवं
व्हायलाच पाहिजे. तो म्हणतोय मी हात लावला की
कवितेच्या अर्थावरचं झिरझिरीत वस्त्र फिटायलाच हवं
आणि गुलाब नाहीत अजून उगवायला लागली देठापासून काळी
आणि पिकासोचं गुर्निका नाही झालं म्हातारं
आणि व्हिएतनामचे अश्रू नि रक्त अजून नुक्तेच आहे उमलले.

## ५. मेलेल्या बाईची छाती, पोट आणि मांड्या

मेलेल्या बाईची छाती, पोट आणि मांड्या
तिच्या इंद्रियांच्या चिखलात
रुतून बसली तिची हाडं.

तिच्या छातीचे बळ
तिच्या पोटावरचे वळ
तिच्या मांड्यांतली कळ
सगळं गूढ झालं तिला आपलं परकं.

ती उठून बसायला लागली
तेव्हा तिची ढुंगणं ती जिवन्त असताना
जशी होती नेहमी सुंदरपणे विभागली
तशीच हुबेहूब तिला आताही दिसली.

तिचं लॉजिक नव्हतं मेलं

पण तिच्या चेहऱ्याच्या आकारावर
शेवाळासारखं काहीतरी चढून
ते तिच्या बोकांडीही होतं बसलं.

पण तरी ती उठून बसली
तेव्हा तिला कळलं की
राखेवर एक दिवा लावावा
तसं आपलं सगळं असणं दिसतंय्

नी तिच्या डोळ्यांच्या जागी दोन गारगोट्या
नी तिचा सौभाग्यमणी चक्क फिकट पडून गेलेला,
तिचा नवराही आधीचाच तिला आठवलं
कधीतरी होता मृतवत् तद्वत् ठार झालेला.

# वसंत आबाजी डहाके

जन्म : १९४२. कवी, कथाकार, कादंबरीकार, आणि चित्रकार. मराठीचे प्राध्यापक, विदर्भ महाविद्यालय, अमरावती येथे. 'योगभ्रष्ट' या गाजलेल्या कवितासंग्रहानंतर 'अधोलोक' ही कादंबरी प्रकाशित. दोन लघुकादंबऱ्याही प्रकाशनाच्या मार्गावर. शिवाय हल्ली एका हौशी नाट्यसंचाद्वारे नव्या–जुन्या वादग्रस्त नाट्यकृतींचं दिग्दर्शन, निर्मिती वगैरे. महाराष्ट्र शासनाच्या अनेक साहित्यविषयक समित्यांचे सदस्य.

## १. फ्रान्झ काफ्का, डिसेंबर १९६७

एक रस्ता आहे काळा माझ्याआंत गुदमरलेला,
ज्यावर उगवलेलं मुरलीच्या स्वरांसारखं
तुरळक भ्रूण गवत;
आणि जेथे गळतं माझ्या घामातील नैराश्य
माझी पावलं भ्रमतात अखंड.
ही माझी निद्राभ्रमणं ओल्या काळोखात.
प्रारब्ध जखडलं आहे पायांना नालेसारखं,
अस्थिर भ्रमतात पावलं.
मी एक आत्मिक लुटारू भोगतोय हद्दपारी
ह्या निर्नाम रस्त्यावर;
भोगतोय बंदिस्त कोषीतील माझे हजारो जन्म :
बेडकांची अंडी, मास्यांची अंडी, झुरळांची अंडी.
मी उतरवलेत स्वतःच माझे खुशमस्करे अंगरखे
जडवलेली ज्यांना आत्मकेंद्रित भिंगं, देवतेचा कौल.
गळलेत महापापांचे ढलपे, चमचमते खवले पुण्याचे,
आणि उघडी पडलीत आत्म्याची काळीभोर भोकं.
ओळीत उभे कापरं भरलेले भूतभविष्यवर्तमान तिन्ही त्रिकाळ;
मी चेतवलेत डोळ्यांतील दुष्काळ वारा घालून
माझ्या सर्व ज्ञातअज्ञात पहारेकऱ्यांच्या;
उद्भवलेत हिडीस चेहरे वाकुल्या टाचलेले
ह्या विलक्षण रस्त्यावरील सर्व अदृश्य वस्तूंचे;
भांबावलेत, दचकलेत माझ्या श्वासांतील खच्ची केलेले बैल;
अंधुक झालेत स्वप्नस्थ नरकांतील प्रार्थनामंदिरांचे
कळस पिवळे म्लान;
गुंगीच्या जाड पडद्याआड दैवी वीर्यस्खलनाच्या
छिन्नविच्छिन्न रात्रीची प्रेमगीतं; जळकी अभौतिक लाकडं
अक्षयनश्वरतेची.

एक अफाट बेढब बुटका हात शोकगीत लिहितो
शापित कवटीवर या रस्त्याच्या,
जशी जाड पाल सरपटते हिरव्या भिंतीवर
जिभेने ओढीत एक-एक नश्वर वर्ण.

## २. कीटक

ईश्वर हा एक
प्रचंड कीटक आहे
माझ्या मनाची प्रसन्नता खाऊन टाकणारा.
मी जरा आनंदानं हसलो की
माझ्या कपाळावर उडी मारतो हा;
त्याच्या चमकदार काळ्या पोटाखाली
अगदी झाकून जातात माझे डोळे.
मी दोन्ही हातांनी ओरबाडून
काढून फेकण्याचा प्रयत्न करतो
पण त्याच्या तीक्ष्ण नख्या
मेंदूपर्यंत पोचलेल्या असतात माझ्या.
मी जणू ईश्वरी कीटकाचं धान्यच आहे :
त्यानं यावं,
आपण खा म्हणावं !

## ३. उत्तरार्ध : विसाव्या शतकाचा, माझा

मृत फुलांनी बहरलेल्या आहेत रक्तक्षयी वृक्षांच्या डौलदार फांद्या ;
मृत्यूचा एक-एक थेंब सरकत सरकत येऊन

टपकत आहे खाली चेतनाहीन पानांवरून.
संहारक देवतेच्या लालभडक डोळ्यांप्रमाणे हे आकाश
आणि तडकलेल्या जमिनीप्रमाणे फाटून गेला आहे
माझ्या डोळ्यांपुढचा सारा अवकाश.

माझ्या अंतरात होरपळताहेत स्वर,
कासावीस झालेले आहेत माझे प्राण.
लोटून दिलेले आहे मी माझे थकलेले शरीर
सर्वत्र भेगा पडलेल्या जमिनीवर.
त्या जमिनीशी कान भिडवून मी ऐकत आहे
ओसाड ओसाड संध्याकाळ.
भयाण संगीत शतकांच्या सांगाड्यांमधून गरगरत जाणारे.
रक्तवाहिन्या फुटतात इतिहासाच्या
आणि समग्र संस्कृतीची कलेवरे कोसळून पडतात हिंस्त्र काटेरी कुंपणावर.

वाऱ्यावर भिरभिरणारी सामान्यांची नश्वर आयुष्ये
मी नगण्य, मी सर्वस्वी शक्तिहीन धरू पाहतो
दोन्ही हात आकाशापर्यंत पसरून.

## ४. खिडकी

तो पाहातोय :
खिडकीतून बाहेरच्या उन्हातलं झाड
झळांसारखं,
पान नसलेलं, ज्वाळांसारखं जमिनीतून
वर आलेलं.

त्याच्या वर उंचावलेल्या फांद्या
आभाळात घुसलेल्या.
निळ्या अवकाशात
झाडाच्या निष्पर्ण फांद्यांवर
एक पांढरा ढग रुईसारखा,
फांद्यावर ढगाची
रुईसारखी पांढरी फुलं.

झाड पाहातंय :
खिडकीत एक चेहरा
धूसर,
निष्पर्ण फांद्यांवरील शुभ्र
ढगासारखा.
खिडकी,
दोन्ही दिशांना
उघडीच आहे.

## ५. नाटक

एक विरंगुळा म्हणून हे नाटक केलं जातंय
आणि काम करणारी नटमंडळी म्हणजे हीच
अपंग बिचारी, आंधळीलंगडीलुळीबहिरीमुकी... तेवढाच आनंद
यातल्या गारद्यांची कामं करणारी आहेत मुकी व बहिरी
आणि श्रीमंत नारायणरावाचं काम करणारा नट
आहे एका पायानं अधू आणि शिवाय तोतरा, तसं त्याच्या
बोलायचं काम फारसं नाहीच म्हणा

ते पहा, रंगमंचावर गूढ उजेडात निर्विकार चेहऱ्याचे गारदी
येत आहेत दबतदबत
आणि त्यांच्या पुढ्याच्या समशेरी चमकत आहेत चमकीच्या कागदामुळं
आणि हा नारायणराव, एका पायानं अधू, शिवाय तोतरा
गारद्यांनी घेरलं त्याला वर्तुळाकार कडं करून
मध्ये नारायणराव
एक पाय ओढत पळू पाहातोय तो
आणि त्याची जीभ वळत नाही आहे आकांतानं हाका मारण्यासाठी
गारद्यांचे चेहरे बदलत आहेत, अरे,
अमानुष क्रूर होत चालले आहेत, वाटतं की,
पुढ्याच्या तलवारी फेकून हातानंच गळा आवळतील ते
त्या तोतऱ्या नारायणाचा
नारायण पळू पाहतोय जीव खाऊन, अरे पळ
तो ओरडतोय, हाक उमटतच नाही, नुसताच तोतरा आकांत
आता विंगेतून ज्यानं डोकं बाहेर काढलं, तो राघोबा
थोटा आहे.... हातच नाहीत.

2882
23882
काव्य 20/2/82

## चंद्रकान्त पाटील

जन्म : सप्टेंबर १९४४; औरंगाबादेहून १९६५ मध्ये वनस्पतिशास्त्रात एम्. एस्सी. आणि तेव्हापासून वनस्पतिशास्त्राचे प्राध्यापक. १९६५ मध्ये ' पुन्हा कविता ' या प्रातिनिधिक संग्रहाचे १ संपादक. ' वाचा प्रकाशना 'शी संबद्ध. १९७२ पासून हिंदी व मराठीत लेखन. अनेक मासिकांच्या विशेषांकांचे संपादन. समकालीन मराठी व हिंदी कवितांच्या परस्पर भाषांतराचं महत्त्वाचं कार्य. ' निस्संदर्भ ' हा पहिला कवितासंग्रह वाचा प्रकाशनातर्फे १९७३ मधे. दुसरा संग्रह ' इत्थंभूत ' प्रकाशनाच्या वाटेवर. त्यांची काव्यविषयक भूमिका १९६८ च्या ' प्रतिष्ठान 'च्या काव्यविशेषांकात आलेली आहे. लघु-नियतकालिकांच्या चळवळीत सहभाग.

## १. सहासष्ट अखेरच्या मुंबैवर पहिली कविता

तीन माणसे माहीमच्या रस्त्यावरून
झिंगतझुलत गेली त्यातला एक मला त्याच्याच
स्वप्नात मेलेल्या माणसासारखा वाटला म्हंजे
त्याचे स्वप्न मला पडले ते त्याचे होते किंवा
असे म्हणा की त्या तेवढ्याश्या स्वप्नापुरता मी तो झालो

त्यातला दुसरा माणूस शब्दांना झोंबत होता
रस्त्यावर कालभर कित्येक लाख दिवसांपासून
झोंबतो तो तसाच तर आपण कशाला फेका
त्याच्याकडे प्रश्नांचे गळफास म्हणून लक्ष
न देताच आपण पुढे निघून गेलो कारण
त्याच्याहून ज्यास्त त्याचे प्रदर्शनवादी शब्द आणिक
जगातलेही एकूणच शब्द आपल्याला म्युझिअममधल्या
भुस्सा भरलेल्या तास पक्ष्यांसारखे वाटतात

तीन माणसे रस्त्यावरून झिंगतझुलत गेली त्यातला
एक मीच होतो असे मला
दुसऱ्या दोघांनी सांगीतले म्हंजे मग
आपण तरी नाही कशाला म्हणा आणिक नाहीत कशावरून

## २. आयसोलेशन वॉर्डातून

रात्री सुकून जातात अचानक चंद्र पिवळे पडतात पिवळतात फुलं
पिवळ्या पहाटे पाठवतो व्हायरल हिपॅटायटिसचा पर्मेश्वर

बागडू लोकांचे थवे सहा नंबरच्या आयसोलेशन वॉर्डात
इस्पितळातल्या अंगणात थडथडतो प्रकाश झाडं कोमात
पानं गाळतात किंवा आसू चिमण्या छताशी भिडतात किंवा
छातीशी एकमेकींच्या पिवळेपणा पकडतो डोळे गच्च
पांढऱ्या बेडवर पडून शांत ऐकता येतं अंतर्संगीत
लिव्हरपेशींच्या मोडतोडीचं व्हायरसचा जॅझ किंवा ऱ्होंबासोम्बा
थरथरते हात सिरम बिलिरुबीनची समजूतदार साथ
डोळ्यांना वेळा चिकटत नाहीत कित्येक संध्याकाळी तरंगतात
इस्पितळावर कित्येक डोळ्यांवर उदासीन पिवळेपणा
पसरवीत अमर्याद
नियती गिरगिरत भिडते एक बाई भिडस्त मर्यादा झुगारून
अव्यक्तात बांधते एक घर वेगळं हिपोक्रेटसच्या नावाचा पूल जोडून
रक्ताची नाती पसरत जातात नकोत त्या शरीरात थांबत नाहीत
पायजेत ती शरीरं हज्जारो मैल दूर राहतात रक्त आटून जातं मधेच
मायावी मनं देतात ओलावे आणि कधीच अपेक्षित नसतो
सापडेल म्हणून धुंडाळत राहिलेला सहारा मनासाठी
कुठं थांबावं सगळ्यांनी सारखंच घेरलेलं गच्चिम
वाटांना जवळ करावं नव्या तर मागचे मुठी आवळतात मानेवर
पर्मेश्वरी लीला हरेक दारासमोर उगवतात म्हातारे
त्यांच्या मेंदूवर कलम करतो पर्मेश्वर अविचारी विक्षिप्तपणा
म्हातारे मिळवतात पोरांच्या मुद्दलावर सुनांचं व्याज
चालतात बुद्धिबळातल्याहून अवघड चाली हरवतात सगळ्यांना
कसले क्षण, कसले अंदाज कसले पाठपुरावे की आयुष्य निपचित
बंद केलं जातं इस्पितळातल्या खोलीत मागंपुढं काहीच नसतं
मागचे तरंग उठतात मेंदूत काही हलतं लकाकतं मिटून जातं
काही उततं छातीत व्याकुळतं मन झाळोळून जातं किंवा जातं जळून
पुढची वादळं दिशाहीन पुन्हा सुन्न रिकामेपणा
भडकणारा सगळीकडून
नाळ पुरून टाकतात ते पाजवतात अस्तित्व उत्सवसोहळ्यांनी
लादतात आयुष्य सगळी वळणं अनोळखी असतात सगळ्या वाटा

केवढं भयंकर मरता येत नाही तिथंच किंवा पुन्हा
परतण्यासाठी बंद झालेली असतात गर्भाशयाची दारं
तुकड्यातुकड्यांतून आकारत सरकतं मोझेक आयुष्य
सगळे रंग सरमिसळतात किंवा सुटे होतात विटतात किंवा
फिटून जातात
कळत नाही काहीच गर्दीतून एकटेपणातून तुटताही येत नाही
सगळंच स्वीकारणं त्याच त्याच तालात गुणगुणत रहाणं कंटाळवाणं
सिगारच्या टोकावर जळते मोरॅलिटी फाटतं सगळीकडून नैतिक आभाळ
एखाद्या पोरीची अलिप्त विचारपूस फरफटत ओढते अनैतिक जाळ्यात
वीतभर पाऊल टाकायला सापडत नाही सात्त्विक भुई कुठं
बदनाम मोहरांनी डागलेलं असतंच संवेदी कातडं.

करता येत नाही काहीच गती संचारत नाही संगती टिकत नाही
सगळे दीपस्तंभ सरकतात प्रतिष्ठेच्या ओहोटीत किनारे पोरके वाटतात
सगळे मोजतात इज्जतइभ्रत चालतात फुटपट्ट्यांवर घालवतात आयुष्य
करतात नजरबंद मेलेलं पाखरू हाडांचे पिंजरे हिंदोळत राहतात

एखादीच सावली खेळवते आयुष्य सुटत नाहीन् होत नाही जिवंत
स्वतःच्या वेदना प्याव्या लागतात बंद कोषात वाढतं नार्गिसी फूल
रात्रींना आडोसा नसतो आणिक दिवसांचा भरवसा नसतं काहीच जवळ
आधी एक घर असतं आईसारखं दूर राह्यलेलं तेही मरून जातं

## ३. जगण्यातल्या असंख्य पातळ्यांमधली एक पातळी

जगण्यातल्या असंख्य पातळ्यांमधली एक पातळी
होते निराकार कालान्तरानं, होते निस्संग निबोल निरूप

पहिलेवहिले रंग उडून जातात आणि शरीर होतं विद्राव्य वास्तवात.

तरीही माझं सृजन करतं अरूपाला आरूपित, अतीन्द्रियांना इंद्रियस्थ
आणतं उलगडून अक्षरांतून अचेतनाची संचेतना
माझ्या ओळी अव्यक्ताचे असंख्य चक्राकार जिने उतरून
खाली येतात जमिनीवर आणि आदिम एकटेपणाची
सम सांभाळत घुसतात रस्त्यावरल्या गर्दीत.

आणि माझ्या रस्त्यांवर अधूनमधून तरंगत येणाऱ्या,
माझ्या कवितेतल्या रिकाम्या अवकाशाचा वेध घेणाऱ्या,
भरगच्च संसाराच्या तलम भरजरी पोतावरून
प्रक्षेपित होणाऱ्या अशरीर डोळ्यांना लपवता येत नाही
एकाकी क्षणातला अधिकच गहिरावलेला सुन्न रितेपणा

मी जगत गेलो प्रत्येक क्षण तीव्रतर आवेगानं
कुठल्याही आत्मसंरक्षणाशिवाय, कुठल्याही कवचकुंडलांशिवाय
सुदूर बेटावरून जाणिवेचं जंगल ओलांडून येणारं
चुकार पाखरू माझं नव्हतं, एकटेपणाखाली अर्धमेलं होणारं
अनौरस संप्रेषण माझं नव्हतं, उगम हरवलेल्या
पाण्याजवळ थबकणारे उद्दाम घोडे माझे नव्हते

माझी होती फक्त समंजस भुई आणि तिच्या गर्भातल्या
लाव्हारसात नामशेष झालेलं एक उद्ध्वस्त महानगर.

## ४. दैनंदिनीच्या सूक्ष्मदर्शक भिंगातून आरपार बघताना

दैनंदिनीच्या सूक्ष्मदर्शक भिंगातून आरपार बघताना
ओळीओळींत आणि आकड्यांत गोठलेला असह्य भूतकाळ :
बाप झिजून झिजून विझून गेला तरी काहीच झालं नाही

आयुष्यात त्याला मिळालं नाही कसलंच समाधान
मेंदूतल्या रसायनात सुकून गेलेली आशानिराशा
वाढत नव्हतं कुठलंच पान आणि कळी काळोखात

गोष्टींसाठी अडून बसलेल्या निरागस पोराला
हजारो मैल एकट्यानंच प्रवास करीत अंडी घालून
परत येणाऱ्या रॉबिन पक्ष्याची गोष्ट सांगितल्यावर
डोळ्यांत पाणी आणून त्यानं सांगितलं की बाबा
उद्या गावाला जाऊ नका आणि लख्कन् तरळलं
काही तरी–फाटकी वहाण घालून शेतावर जाणाऱ्या
बापाच्या डोळ्यांत पाह्यलं आठवून तर बाप
चाललेला विचार करीत की कित्येक ऋतू
उलटून गेले तरी पाखरं परतत नाहीत घरट्याकडं

मुलं नातवा सुना माहेरी गेलेल्या पोरीबाळींना
आयुष्याचं जडशीळ ओझं उचलता–उचलता
आठवणी ताणता येतील तितक्या ताणता येतात
पण तोडता येत नाहीत की सोडता येत नाहीत
आणि बाप बघतो शिवेवरल्या लिंबाऱ्यातून
नदीचं कोरडं ठणठणीत पात्र आणि काठावरची चिंच

वाऱ्यावर उडालेलं आयुष्य विस्कळित नात्याचा गुंतावळा
सांगायला म्हणून बहरलेल्या पण पै–पैशानं करपलेल्या
आतल्याआत झिरपून आटून गेलेल्या मानवी भावना.

## ५. मी सजवला माझा महाप्राण

मी सजवला माझा महाप्राण अभावाच्या
आभूषणांनी, अभावाची आकर्षक वस्त्रं चढवली
त्याच्यावर, दिली असंख्य निश्वासनं
आणि नसतेपणाच्या एका ऋतूत
केला गृहप्रवेश शून्याचा उम्बरठा ओलांडून
जगलो उत्कट नेणिवेचं आयुष्य
आकंठ जेवलो न्यून्यान्न, इंद्रियं सजवली
पोकळ अनलंकारांनी, झोपलो नकारशय्येवर
ऐकलं सुनसान निस्वन संगीत
चितारले नकारांचे नानाविध आकार
खेळलो छप्पापाणी नाहीनाहीच्या दाहीदिशा
धुंडाळत, गरगरत गेलो अपासून नपर्यंत
माझ्या तमन्ना नन्नानन्ना, नास्ती नास्ती माझी मस्ती
आणि मस्तीनं नासून गेल्यावर
नस्त्या वेदना उमळून आल्या माझ्या नास्तित्वावर
मी हरवलो माझ्यातून
हरलो आणि शरण गेलो माझ्या नास्तीश्वराला
केली प्रार्थना की हे नास्तीश्वरा,
माझ्या अन्तरातल्या पोकळीत
खुपसव तुझं निरंकुश
आणि मला उणं करून टाक
शून्याच्या नेणू-रेणूतनं !

# नामदेव ढसाळ

जन्म : १९४९; कवी, ' विद्रोह ' नियतकालिकाचे संपादक, ' दलित पँथर ' संघटनेचे एक संस्थापक आणि दलित कवितेतील सर्वाधिक महत्त्वाचे कवी. साम्यवादी विचारसरणीशी बांधिलकी. ' गोलपिठा ' या पहिल्याच संग्रहाने समकालीन मराठी कवितेत महत्त्वाचे स्थान; ' मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलवले ' हा दुसरा संग्रह. ' प्रियदर्शिनी ' या प्रदीर्घ कवितेचे तिसरे पुस्तक १९७५ मधे प्रकाशित. त्यांची कवितेबाबतची भूमिका ' मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलवले ' या संग्रहात समाविष्ट आहे. त्यातूनच खालील उतारा घेतला आहे.

" प्रत्येक कलावंताला स्वतःचे एक वर्गचरित्र असते. मीही ह्याला अपवाद असू शकत नाही. ज्याला व्यवस्थेने, तीन हजार वर्षे ज्ञानास, उत्पन्नास, संपत्तीस, मानप्रतिष्ठेस वंचित केले अशा सर्वहारा दलित वर्गाचा मी एक कवी. विसाव्या शतकातल्या निम्न वदलामुळे मीही कवितेपर्यन्त येऊन पोचलो....मी माझ्या कवितेला व्यक्तिनिष्ठ ठेवू पाहात नाही....पाण्याने भरलेली बादली उचलताना जमिनीचा संबंध येतो तसा कविता लिहितानासुद्धा जमिनीचा संबंध येतो. त्यामुळे माझ्या कवितेची जमीन ही सर्वहारा वर्गाची आहे. मला माझा आणि माझ्या कवितेचा वर्ग सांगताना अभिमान वाटतो.... मी एखादी कविता लिहितो म्हणजे राजकीय कृतीच करीत असतो. हे सर्व आत्यंतिक गरजेतून घडते. ओढून ताणून करावे लागत नाही....माझी कविता खेड्यापाड्यातील वैराण दारिद्र्याचा, अज्ञानाचा, दुःखाचा वेध घेते, तिरस्कार करते, त्यांच्या मुळावर घाव घालते. हे होत असताना माझ्या कवितेला पिळदार कलात्मक घाट येतो. माझी कविता वर्गशत्रूंशी हाडवैराचा खेळ करते....माझी कविता वाचून सर्वहारा वर्ग त्वेषाने जागून उठेल ही इच्छा मी का बाळगू नये ? .... "

## १. मलाही दारिद्र्याचं स्वतंत्र शेत आहे

दैववशात आकाशपरिवर्तन घडो न घडो
मलाही दारिद्र्याचं स्वतंत्र शेत आहे
ज्याची वहिवाट करता करता दिवस उगवतात
दिवस मोडतात...
अगोदरचे असतील बिचारे भू-दास
नंतरच्या सरंजाम्यांशी हातमिळवणीचे मी टाळले
भौमितिक संसर्गाने वाढली माझी अरण्यगात्रे
भिजले माझ्यातील सांबसाव
मी उंद्रांचं प्रच्छन्न धड वर पिरॅमिड
मांस–मच्छर
भात–बैदा
देशी दारू सफेद चाफ्याची फुलं
चुंबनं आलिंगनं आसनं दागिनं
पलंग गळणारं घर लोरी रिदम
पिळवला गेलेलो मी : माझ्या तनहाईत
पालवतं जनानी सौन्दर्य
अ–ब साठी लिओनार्डो–द विंचीने रंगवलेली
मोनालिसा
कोसळणारा पाऊस विझणारी सिगारेट निर्जल अंगाची डान्सिग गर्ल
कॉन्ट्रास्टिंग कलर हार्मनी
मलाही दारिद्र्याचं स्वतंत्र शेत आहे...

## २. पाणी

पाण्याला नैराश्य आणल्यानंतर

हातघाईवर येतो जीवनमरणाचा प्रश्न
आणि मग नाही उरत लोकधून
'आम्चा एडका उड्या मारितो मागं सरूनि धडका घेतो
हय लाऽहरी चिन' म्हणण्याची
नजरेसमोरलं झाड खाऊ लागत
आपलीच फळं जिभल्या चाटीत अनायासे
इच्छा असेल तर रोग येतो शरीराकडे
घडतो टोक निमित्तमात्र
पादाने हालतो पिंपळ
चवताळतो साळसूदपणे पोटातल्या चैतन्याचा किडामकोडा
मग कसा दुर्लक्षिला जाईल
पाण्याच्या भिंगरीबरोबरच होणारा जन्म एकेका कुरूपाचा
मळमळी पाटातून
होते मोट एरंडाची
बांधली जाते मोळी चालत्याबोलत्या पाण्याची
लागतं कुडाला डोकं नि आड्याला पाय
घोंगावतात चिलट धावं दणाणून
उतून निघतात शेराच्या डिऱ्या क्षितिजावर
तुटू लागतो उंबरातला सुलक्षणी जीव
शेंगा चाळताचाळता झडतात बोटं तहानेची
आणि नुस्त्याच वसाड शरीराची करुणा मागतो माणूस
वास्तं वाडगं जमिनीच्या तोंडाचं
कित्ती सुंदर गोंडा घोळतात तुमच्या धर्मातीत राजवटी
वर्ल्या आंगाला तुमी पाणी भरायचं
खाल्ल्या आंगाला आमी
वाहव्वा वाहव्वा कसा सोवळ्यानं शिकवला जातोय पाण्यालाही चातुर्वर्ण्य
१८८१ च्या कायदेकानुनीत भिजत पडलेलं तुमचं हुजरी घोंगडं
वांझोट्या स्निग्धतेने आम्हाला खेळवणारी तुमच्या भुत्याची सोंड
पाण्यात हागलेलं लोपत नस्तं बरं का
आणि बेमिसाल हत्या घडवलेलं

आंधळ्याचा हात फोद्यावर पडताच उंडारणारी
चवचाल गिधाडं पुष्कळ असतील तुम्हाला लागू
पण उरणारे जे सस्तन आहेत ते तुमच्या गोधडीला
ह्याच्यावर मारतात
नि निर्मळ रात्री अबाधित ठेवतात
त्यांना कुठल्याही भांड्यात ठेवलं तरी कळकत नाहीत
त्यांना कितीही झिजवलं तरीही कल्हईची जरुरी पडत नाही
ते तुम्ही पसरवलेल्या दयावादी कालव्यांना भुलत नाहीत
रब्बीच्या खरीपाच्या चवथरीला भेत नाहीत
लावतात तुमच्या सडेलपणाला तुंबड्या
उठवतात तुफानी चगदा तुमच्या शरमेसाठी
आपली अल्पसंख्याक आयाळी विसरू पहातात समेवर येऊन
तिथे तुम्ही किती बहिष्कारून टाकणार आहात गावेच्या गावे
नासक्या नाकाने
पाण्याचं अंत:करण अस्तं मूलगामी उदार
त्याचं पिस फिरलं तर क्षणात खपल्या पडतात हजारो दु:खांच्या
किती करणार तटबंदी पाण्याला
कशी घालणार वेसण पाण्याच्या खळाळत्या रूपाला
पाण्याची कधीच संपत नस्तात स्टेशनं
पाण्याला बडवावं लागत नाही ठणठणपाळ
गाढवं रडवण्याइतकी वग येत नाही पाण्याला
पाण्याचे दरवाजे अस्तात अल्लख ब्रह्मयाला मिथ्या ठरवून
पाणी पाप–पुण्याच्या पुढं धावतं
जे जे पाण्याच्या वाटेस जातात ते ते तिसऱ्या पायातून पाताळात पोहचतात
भल्याभल्यांनी करू नये छक्केपंजे पाण्याशी
पेरुमल कमिशनातल्या ११२७ कत्तलींची अस्मिता अस्ते पाण्याला
किलावेनमानीतल्या होळीची धग अस्ते पाण्याला
तुम्ही पाण्याच्या नादी लागू नका
त्याची जातकुळी शोधू नका
पाणी अस्तं सिद्धार्थासारखं

पाणी अस्तं अशोकवृक्षासारखं
पाणी अस्तं तेजाबही

" पाणी पाणी
पाणी बोल तेरा रंग कैसा
बेटा तेरी आंखों जैसा
पाणी पाणी
पाणी बोल तेरा रंग कैसा
बेटी तेरी प्यास जैसा "

तुम्ही तुमच्यां बहुसंख्याक बलाच्या झुली काट्याबंधाट्यावर वाळत टाका
नि पाण्याला रस्ता करून द्या
वाढ गे बाये पाणी वाढ गे
वायशी धार सोड माये
सोकन पडलीय घशाला
आवं दादा आवं पाटील
आवं धनी आवं धेवा
आग आग आ ऽऽ
हात् तुह्या बांबू हासाडला
हे चिंपाटच्याट्या
मह बुडाख तुह्या तोंडावं हानी
हाट हाट ये बेटीचोदा
ये घालमुठ्या हे माठ्या
ये उटनखाटाच्या आवलादी
हट हट ये पाण्याच्या अडसरा
तू यहाँसे निकल जा मेरा खून मत जला
मैं तुझे फाड डाळूंगा दुनियाको जला डाळूंगा
हट हट
नदी राखते जन्मसिद्ध हक्क माण्सावरला

आम्ही जिथं जिथं पाय टाकू तिथं तिथं फुटतील उपाळ निवाळचंग पाण्याचं
आणि मग आमच्यासकट कुणीच रहाणार नाही तहानेला
आणि भाजणार नाही हीर पाण्याचा
पाण्याला जातीय रंग देणारा तुमचा
एकुलता एक ईश्वर त्याला लागेल आफलातून बुळगा
नि मग तुम्ही धोतराचे सोगे ओले ठेवण्यासाठी
मागाल भीक पाण्याची.
आम्ही तुम्हाला पाण्याने भरलेले रांजण देवू
हे छळकऱ्यांनो
पाण्यासारखं सुंदर कर्तव्य दुसरं कुठलंच नस्तं जगात
पाणीटंचाई आली तर
तुम्ही शर्टासारखी शहरं बदलता
मग सांगा पाण्यावाचून तडफडून मरणारांनी
काय बदलावं.

## ३. एक हंगामी कविता

साडेचार हजार प्रकारांची अस्तात निवडुंगे
निवडुंगात असतात निरनिराळे वर्ण, वंश, रंग, ढंग
काही निवडुंगे असतात मोरपंखी मुलायम
हृदय चिरून त्यात त्यांना ठेवून द्यावं अशी वाटणारी
मात्र काहींना असतात जगड्व्याळ काटे
त्यांचा स्पर्श झाला नाही तरी ती बोचतात मनाला
जखम करून जातात प्राणाला
मग सतत स्रवत रहाते रक्तधार
पृथ्वी माखून जाते रक्ताने त्रिवार
जेलर आणि निवडुंग
निवडुंग आणि जेलर

एका तुलनात्मक साम्याने मी गेलो आहे भारावून
कैद्यांवरोबर क्रिमिनल माइंडेड झालेले कित्येक जेलर
मी पाहिलेयत अनेकदा
कुठल्याही हंगामात त्यांच्या हृदयात अंकूर रुजू शकत नाही इतके वांझ
तुम्ही म्हणाल की बघा हा कवीका कवी आमच्या
सिनियर जेलरला निवडुंगाची उपमा देतोय
तर बाबांनो एवढा सरळसोट हिशोब तुम्हाला करता येणार नाही
घटना आणि प्रकृति यांचं अंतर्याण जाणून घेणारा
मी एक कैदी आणि कवी, सरळसरळ निवडुंगाशेजारी
तुमच्या अधिकाऱ्याला कसा बसवीन ?
निवडुंगाच्या घनदाट अरण्यात मुलासारखं निष्पाप
आणि कोवळं हृदय ठेवणारा हा तुमचा तुरुंग अधिकारी !
हा मला जेलर वाटतच नाही मुळी
समुद्राच्या गाजेला भिडू शकणारं ह्याचं अंतःकरण
समुद्र बनून साचले आहे सर्वत्र
ज्यात मनाच्या होड्या करून कैदी करून येतायत जगपर्यटन
तुरुंगातल्या वैराण वाळवंटात

## ४. कुत्रा आणि प्रजासत्ताकाचे गाणे

कुत्रा साखळीने बांधलेला कुत्रा तो विव्हळतो भुंकतो अधूनमधून
हा त्याचा घटनात्मक हक्क आहे : तो जगतो शिळ्या तुकड्यांवर
अन्याय सहन करून कोडगं झालेलं त्याचं मन
विद्रोही मुहूर्तावर जर त्यानं दिला हिसका साखळीला
असह्य होऊन तोडू घातलं बंधन तर त्याला घातली जाते गोळी
भररस्त्यात वाजवले जातात नगारे ‘ सर्वंकष स्वातंत्र्याचे ’
दोस्तांनो सुंता न झालेल्या पोराला मी विचारतो लोकशाहीचा अर्थ
तिला कशाबरोबर खातात ते ?

नामदेव ढसाळ एकशे पंधरा

ठिगळांचं जुन्यार लपेटणाऱ्या माउलीला
मी विचारतो स्तनातल्या दुधाचं सत्त्व
बैलासारख्या राबणाऱ्या पुरुषाला विचारतो
सुफळ संपूर्णता आणि नागवलेपण माझं मनचं
इर्देगिर्द होत उखाण्यांनी
'लाल पालखी तिला हिरवा दांडा
आत बसल्या बोडक्या रांडा
ओळखा ओळखा पाहू काय ते ?'
ज्याचं काळीज झालं असेल पत्थराचं त्वचा गेंड्याची
ज्याला टांगले असेल भोत भरून म्युझियममध्ये
आता त्याचीच खोपडी राहू शकते थंड थंड विस्तीर्ण प्रशान्त
किती किती भयानक आहे हे युग तस्करी युग
आपण पिकापाण्याच्या गप्पा देखील मारू शकत नाही
भुकेचे अंधारग्रस्त साम्राज्य ओसाड पडलीयेत आतडी
आतड्यातून फिरतो आहे अक्राळविक्राळ अजगर
आपण धाय मोकलून रडू शकत नाही
स्वातंत्र्य समता बंधुत्व
खाजगी मालमत्तेचा वटवृक्ष कायद्यापुढे सर्वसारखे
खाओ पिओ खुश रहो जहन्नममे जाओ
अहा किती अजब हे युग अंधार युग
आपण जमतो चहापुरते हॉटेलात भिडवतो कपाला कप बशीला बशी
दोन घडीच्या प्रवासासाठी शोधतो आगगाडीच्या वेळा
भरतो बहुरंगी बहुढंगी आपल्या अस्तित्वाचा कुंभमेळा
अतिरिक्त ताणानंतर आपण होतो गोळा सार्वजनिक बागांमध्ये
वाजवतो श्वासाची टिपीदार बासरी
दारिद्र्याची दोन मुलं एक गोरं एक काळं
सार्वभौम बागेत खेळला जातो सी सॉ
बिंबवलं जातं शुष्क थडगं मनपटलावर
गळी उतरली जातात लोकशाहीच्या उद्घोषाची गाणी
हायब्रीड हायब्रीड कुठल्या भडव्यांनी आणलं आपल्यापर्यंत

मांसात रुजेना रक्तात मिसळेना फुलेना फळेना
दमल्या भागलेल्यांना सावली होईना
रेडीमेड शर्टासारखं अंगाला फिट्ट वसेना अंगावरले तीक्ष्ण घाव ढळेना
आपण होत आहोत निर्वासित आपण होत आहोत पोरके
घरेदारे वाऱ्यावर सोडून आपण परततो आहोत स्मशानाकडे
उकरतो आहोत खाचेतून बेचाळीस पिढ्यांची झाडे
विकतो आहोत चार आणे किलोने भरतो आहोत जिवंत हाडांची खळ
सोन्याचा धूर ओकणाऱ्या देशात सजली आहे हाडांची बाजारपेठ
आपण झालो आहोत लकीर के फकीर
सोन्याचा चिमणा सोन्याची चिमणी
सोन्याचा चारा सोन्याचा पिंजरा होते आहे आपली विक्री
किती शुभ्र आहेत हे मुसाफिर
किती शुभ्र आहेत हे शिकारी
त्यांच्या हातात आहेत पारध केलेले शुभ्र ससे
शुभ्र वस्त्र अंथरलेल्या टेबलावर त्यांनी मांडलेयत हारीने
ते कंबरेचे खंजीर उपसतात खसाखसा
सश्यांच्या गुप्तांगात खुपसतात
उठताहेत रक्ताच्या चिळकांड्या
अंतर्यामाची होतायत रक्तस्नात कबुतरे
शांतिदूत धावताहेत अंतरिक्षाच्या मार्गाने
उमटते आहे कोलाहलात गाणे प्रजासत्ताकाचे गाणे
दे दान सुटे गिऱ्हान दे दान सुटे गिऱ्हान !

## ५. 'प्रियदर्शिनी'तला उतारा

माणूस हे नुस्तं अन्न पचवणारं आतडं नाहीहे
माणूस आपल्या सामर्थ्यानं
निसर्गावर नि स्वतःतल्या पशुतेवर करतोहे मात

आम्ही लावली होती झाडंझुडपं
तीच त्यांनी टाकली तोडून
वाटलं होतं आम्हांला
एक ना एक दिवशी आम्ही बसू त्या झाडांच्या
गर्दमायाळू सावलीत
झाडांची पानंपानं जातील फैलावत
त्यांआडून, पूर्वदिशेकडून फाकेल लालजर्द दिशा
आणि आमच्या हृदयाच्या अंधारगुहा होऊन जातील
प्रकाशमय
ताणली जाईल आमची छाती हिंमतीनं
ध्वजासारखी मिरवली जाईल मान
नि उभे राहू आम्ही आमच्या पायावर
आकाशाला ठेंगणं बनवत
आणि कोरू आमच्या हातावर
आमचं भविष्य जे उज्ज्वलतेच्या कुंकवानं
माळलं जाईल सतीचं वाण घेऊन

# प्रकाश जाधव

जन्म : ३ नव्हेम्बर १९५१; मुम्बै; अत्यल्प शिक्षण; नंतर विविध प्रकारच्या अनेक नौकऱ्या; सर्व क्षेत्रांत सर्व प्रकारची कामं; १८ व्या वर्षी घरातून पळून पुण्यात नौकरीचा शोध; वणवण भटकंती, अफाट दारिद्र्य, आईचा आजार, भावाचा मृत्यू, पुन्हा परत मुम्बई; मुम्बैच्या अधोविश्वात पुन्हा वाट्टेल ती कामं पोटासाठी; तिथंच विलक्षण मानसिक संघर्ष, ताण; हळूहळू या संघर्षानंच सृजनाचा सहारा शोधला; कविता लिहायला सुरुवात; १९७९ मधे ' दस्तखत ' नावाचा पहिला कवितासंग्रह; दुसरा प्रकाशनाच्या वाटेवर; ' असाही एक हिंदुस्थान ' नावाचं अत्यंत स्फोटक नाटक लिहून पडलेलं, शिवाय काही कथा पण; साम्यवादी विचारांशी बांधिलकी; चोखा काम्बळे– प्रताप भोसले– सतीश काळसेकर– मनोहर ओक– तुलसी परब आणि नामदेव ढसाळ व धूमिलच्या कविता एवढंच वाङ्मयीन जग, बाकी निव्वळ डोक्यात– उरातली प्रचंड वादळं, यातना आणि आग–आग. हल्लीच हिंदीतूनही कवितालेखन.

त्यांची स्वत:विषयीची व स्वतःच्या कवितेविषयीची मतं एका खाजगी पत्रातून घेतलेली आहेत :

“.... एकाकीपणा हा माझ्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. भयंकर नसले तरी हाताच्या बोटावर मोजण्याएवढे अनुभव दलितपण वागवताना मला आले. कदाचित मुंबईसारख्या औद्योगिक शहरात माझी वाढ झाली हे एक कारण असू शकेल. वयाच्या १० व्या वर्षापासून कष्ट करायला सुरुवात केल्यामुळे असेल, मला प्रश्न पडायचा, आपण दलित आहोत की आणखी कोण ? किंवा दलित म्हणजे नेमके कोण ? कारण माझ्या भोवतालच्या मुसलमान आणि सवर्णांची जीवनपद्धती मला अभिप्रेत असलेल्या दलितांपेक्षा भिन्न नव्हती .... जागतिक साहित्याचे सन्दर्भ देऊन समोरच्याला आश्चर्यचकित करणे या गोष्टींपेक्षा प्रामाणिकपणे स्वतःची कविता जपणे मला महत्त्वाचे वाटते. मराठीतल्या कवींपेक्षा हिंदीतल्या केदारनाथ सिंह, धूमिल, सर्वेश्वरदयाल सक्सेना, आणि अलिकडच्या नीलाभपासून राजेश जोशीपर्यंतच्या कवींकडून मी बरंचसं शिकलो आहे .... स्वतःचं एक वेगळेपण मी कवितेत कायम जपलंय्. पुढे साम्यवादी दृष्टिकोण स्वीकारल्यानंतरही दलित जाणीव + साम्यवादी जीवनदृष्टी + कलात्मक भान असा तिहेरी तोल सांभाळून मी कवितेत उभा आहे ....”

## १. कवी

असलियत नाकारून
हातकडीत अडकवला जातो निहत्था कवी
धा–पंधरा संशयित ओळींवर बंदी आणून
सच्च्या शब्दांचे अर्थ जेव्हा चूप केले जातात आणि
नाण्याच्या दुसऱ्या बाजूतून घुसविलेले खाकी;
शोकग्रस्त अंधार
लांब करतात
तेव्हा मी ठेवून देतो गर्भार आणखी एक दहशती रात्र
कवितेच्या गर्भाशयात
खुली.

## २. आणि आता दोन मुलं झाल्यावर

जेव्हा तुझ्यामाझ्यामध्ये होता केवळ
वन् वे कॅंडल रोड
आणि आता दोन मुलं झाल्यावर
तू विचारते आहेस समुद्राविषयी माहीमच्या
सरकलेल्या वाळूबद्दल पावलांखालूनच्या की
सांगू उलथापालथीबद्दल
लाटांच्या.

तू भोळी गाय मंगळसूत्राच्या दावणीला बांधलेली
अथवा आहेस मखमली बिछाना
प्रत्येक रात्री निर्विकारपणे फैलावणारा शयनगृहात
तुला स्वतःचं वेगळं अस्तित्व नाही
तुला स्वतःचं वेगळं मत नाही

चूल आणि
मूल
या पलिकडच्या दुनियेतील स्थित्यंतराचा तुला थांगपत्ता नाही
तू ज्या चौकोनात कोनाडा होऊन राह्यली आहेस
त्याला स्वातंत्र्य नाही म्हणत
हे पहा स्वातंत्र्य, मी दिलंय् कवितेला दोन हात करायचं
लवडेलागणीशी अरेरावीच्या आणि
सहानुभूतीच्या.

किनाऱ्याने अंग काढून घेतल्याला दहा वर्षं झालीत
दहा वर्षांत
मी मौसमांना सामोरे गेलो नाही
मतदान केले नाही
राष्ट्रगीत चालू असताना उभा राह्यलो नाही.
वारा किती तटस्थपणे पहातोय निष्पर्ण माडांची घबराट
आणि क्रूसावरली लक्तरं
अंधार थांबल्यासारखा वाटतोय
( खूप प्याल्यामुळे असेल ! )
पण दारूच्या गुत्त्यावर दूध प्यालेल्या
तुझ्यासकटच्या वक्तशीर घड्याळांनी
ठीक बारा वाजवलेत
आणि प्रिये
अशा या वेळी जागा अस्लेला शहाणा
पाक रेडियोवरील झिया–उल्–हकची वटवट अथवा
ऐकत असेल मेहदी हसन.

इतक्या दुरून काय मोजतेस उडल्या पाखरांची
जसा तुला दिसणाराय् तळ
आतड्यांच्या वेटोळ्यातील भुकेल्या काळोखाचा

जवळ ये
आणि पहा,
साकीच्या डोळ्यांपलिकडची वांझ जमीन
आणि खसकता सूर्य
जवळ ये
आणि पहा
दिवसा अहिंसेच्या बगिच्यांना खतपाणी घालणारी सत्ता
रात्री अमेरिकन बनावटीच्या पिस्तुलासह गल्लीकुचीत हिंडताना
अथवा सफेद टोप्यांखालच्या काळ्या कारवायांचा शोध घेणारा नक्षल
रक्ताच्या थारोळ्यात पडलेला
जवळ ये
आणि पहा,

खुनाच्या लहानसहान प्रयत्नांनंतर मी जिवंत आहे.
तुझ्यात तेव्हाही नव्हतं साहस कॅडल रोड ओलांडून यायचं
आणि आता दोन मुलं झाल्यावर
तू विचारते आहेस समुद्राविषयी माहीमच्या

विसरून जा
माझ्या घराचा दरवाजा
म्हणालो होतो केव्हाही उघडा असेल तुझ्यासाठी
अलिकडे किती तरी वर्षं मी दरवाजा बंद करून आत बसतो
आणि बाहेर उधारीवाले
जगातील कितव्या तरी आश्चर्यासारखं
तुला हे अद्भुत वाटेल
पण ज्यांची भूक गाठते हिमालयाएवढी उंची
त्यांना गू
आणि गुळातला फरक कळत नाही
त्यांना पाणी

आणि सांडपाण्यातला फरक कळत नाही.

तू वापरतेस त्या गझीसिल्कमधील परकराला
की परकरातल्या चड्डीला
कपड्याच्या कोणत्या विकसित अवस्थेला संस्कार म्हणतात
जे धोब्याने आडदांडपणे आपटून लटकावलेत
उन्हात.

तुला जितक्या सहज करता आलेलं कलम
माझ्यातलं आशिकाना जंगल
तितक्या सहज मी उभाय तुझ्या सभ्यतेविरुद्ध
जी चालताना चप्पलचा आवाज होऊ देत नाही
जी मुलांना स्तनपान करू देत नाही
जी संसदच्या हां समोर
हूँ करीत नाही.

माझ्या डोळ्यांत महापूर आहे
माझ्या डोळ्यांत धरणीकंप आहे
माझ्या डोळ्यांत असंतोष आहे
माझ्या डोळ्यांत खुन्नस आहे
तू ज्या सुर्व्याला तोंड लावू नयेस असं बीफ आहे मी.

मी नाकारतो
सात च्यूतिये मेल्यानंतर जन्मणाऱ्या भैय्यासारखं मुर्दाड जगणं
मी भिडवतो डोळा
आणि पहातो, नकाशातील सर्वदूर काळोखात
सर्वभर भूक. हाहाकार. दंगली. कर्फ्यू. प्रेतं
सर्वभर रक्त
एक अशान्त आसमंत

एक शिक्षा स्वतातल्या स्वतात घुसमटून मरून जाण्याची
आणि आता दोन मुलं झाल्यावर
तू विचारते आहेस समुद्राविषयी माहीमच्या.

## ३. कविता : सफेद दाढीतल्या लेंडूरसाठी

तू पोशिंदा लाख शब्दांचा
तुझे उजाड रजवाडे. जनानखाने
मयखाने उजाड
तू मोहताज आज दारूच्या थेंबाला, एका दमाला कॅप्स्टनच्या
नाठाळ घोडी वठणीवर आणणाऱ्या लगामी दोरखंडा
तू पाह्यलेलेस दाते
आणि दानत
भीक, भिकारी
आणि सखीचे लाल
राजवस्त्रे उतरवून रस्ते
आणि चपलांमधील पन्नास हंगाम जपलेलेस बिगरइस्त्रीच्या खिश्यात
रंग
आणि रंगांचा भोक्ता तू
काळ्या गोषातील एकाग्र नशेचा भूतकालीन गुलाम
आज बुडालेलास सफेद काजूत
पाळण्यातील पायाचं निदान करणाऱ्या कलंदर दाढीवाल्या
तू जिथे तलवार विकून
घेतलेस गिटार
ते चोरबाजार उद्या कदर करतीलच असं नाही
दिल-ए-दफ्नदारपणाची तुझ्या.

## ४. काल

नादुरुस्त बरगड्यांखाली
झीनत अमान नाही, जखम आहे
तसे घाव जन्मल्यापासून वहातोत
खायच्या
नि दाखवायच्या वेगवेगळ्या दातांना
प्रेम
नि फॅरेक्स
माझ्यानंतरच्या कोणत्याही पोराला मिळालं नाहीय
बोललं की तोंड दिस्तं
कचरापेट्यांवर माना टाकलेली भूक
नि नाही दिसत झोपडपट्ट्यांतील गिचमिड खुराडे
लाठ्यांना
नि बंदुकांना खाज सुटावी
असा कोणता घातपाती तळ आहे निदर्शकांच्या छातीत
मेलेल्यांना मारणाऱ्या छिनाल थैमानातून
एक सैतानी ओळ
भरवेगानं ओढू पहातेय शहर-ए-श्मशान एका युद्धखोर कवितेत
नि माणसं
कोनाड्यात उभी असलेली काळ.

## ५. साकी

उर्मट ग्लासांच्या तांबुस तळाशी जळत असतात
वेदनांची सालस प्रेतं
कोणत्याही गुलामाला कळत कसं नाही की

लोकशाहीआड मृत्यूच झालाय स्वस्त
नि राष्ट्रप्रेमवगैरे
महाकवी इकबालच्या कवितेत सापडतं तेवढंच
कडेलोटीच्या टोकाशी घेऊन जाणारे प्रत्येक आक्रमाशी रस्ते
तिथून परततात
त्यांच्यासाठी भरपूर शिव्या आहेत म्मावरून
नि खालच्या अथांग काळोखात लटकून
जे तोडतात जीवनमृत्यूमधलं अंतर
त्यांच्यासाठी तू हसतेस डबलघोड्याआडून
साकी,
एका रात्रीत झोपडीला
नि टेंपररी नोकरीला जे पारखे होतात
ते चालत येतात तुझ्यापर्यंत
नि स्वीकारतात तू सोपा करून ठेवलेला पर्याय
भोवतालच्या अशक्यतेत.

# र. कृ. जोशी

माझं नाव रघुनाथ कृष्ण जोशी. *मी र. कृ./आर. के.* जन्म सांगली येथे १९३६ साली. *माझा डोळा डॉक्टर अचा.* शालेय शिक्षण सातारा, कोल्हापूर, सांगली इ. ठिकाणी *नाक कान घसा डॉक्टर बचा* कला शिक्षण १९५२ ते १९५६ मुंबई येथील जे जे. इन्स्टिट्यूट ऑफ अप्लाइड आर्ट येथे *दात डॉक्टर क* १९६० पर्यंत बेनसन्स लिमिटेडमध्ये कमर्शिअल आर्टिस्ट म्हणून *हृदय डॉक्टर ड* तदनंतर आजपर्यन्त उल्का ॲडव्हरटायझिंगमध्ये आर्ट डायरेक्टर म्हणून *रक्त दाबाचे* सुलेखनविद्या ( Calligraphy ) या विषयाच्या अभ्यासमाध्यमातून १९६५ साली पहिल्या अक्षरकविता *हातकळांचे* नंतर मुद्राक्षर ( Typographic ) दृश्य (Visual) ध्वनि ( Sound ) आकार ( Formal ) आणि पत्रक ( Poster ) कविता सत्यकथेतून वेळोवेळी प्रसिद्ध. *पायगल्ल्यांचे* मराठीत मूर्तकाव्याचे ( Concrete poetry ) हे पहिले प्रयत्न *मेंदू ऑफिसचा* पोथ्या, कलाइतिहासविषयक चर्चा, रोमन व देवनागरी सुलेखनातील प्रयोग, मुद्राक्षरतंत्रविषयक संशोधन हे विषय आवडीचे. *अर्धा पगार बायकोचा.* लेखन वाचन बेताचे म्हणजे कमीच *अर्धा दिल्लीचा* कलाशिक्षण संस्थातून कलाविषयक सप्रयोग व्याख्याने *फोन शेजाऱ्यांचा* परिसंवादात ' पेपर ' वाचण्याच्या निमित्ताने दोनदा घडलेला परदेशी प्रवास/अनुभव जमेस *टीव्ही फ्रीज मेकॅनिकचा* १९७० साली विविधभाषा लिप्यांमधील अक्षर–आकार–ध्वनींवर आधारित १६ अक्षर घटना ( Happening ) मुंबई येथे जागोजागी *गाडी नातलगांची* जाहिरातक्षेत्रात अनेक मान व बक्षिसे विशेषतः बोधचिन्हे ( Symbol designs ) व भारतीय भाषांतील जाहिराती ( नेरोलॅक वगैरे ) याविषयी विशेष आस्था अभ्यास प्रयोग व योगदान *कविता अक्षरांची* अक्षर सौंदर्याचे सिद्धान्त व त्यांचा व्यावहारिक आवाका याविषयक चळवळ प्रसाराचे अनेक स्तरीय प्रयत्न पण थिटे अपुरे ही खंत सदैव *माझं असं एकच धन* कवि चित्रकार उपयोजन संकल्पनकार ( Graphic designer ) सुलेखनकलाकार ( Calligrapher ) मुद्राक्षर कलाकार ( Typographer ) अक्षरघटनाकार विविध भाषालिपी/कलाइतिहास अभ्यासक व अक्षरसंशोधक या नात्याने थोडे बहुत काम गेली बारा तेरा वर्षे चालूच *मी जगणारा प्रत्येक क्षण* काव्यसंग्रह व्याख्याने अक्षरविषयक टिपणे अजून अप्रकाशित. ( १६–१०–७८ )

माझ्या कवितेविषयी
ही पहिली ओळ–सुलेखनविद्येतील ( Calligraphy ) अक्षरसौंदर्याची
ही दुसरी –मुद्राक्षरविद्येतील ( Typography ) मुद्राक्षरतत्त्वाची

र. कृ. जोशी एकशे एकोणतीस

ही तिसरी —संगीतविद्येतील नादतत्त्वाची
ही चौथी —चित्रकलेतील आकारत्वाची
ही पाचवी —स्थापत्यशास्त्रातील रचनातत्त्वाची
ही सहावी —शिल्पकलेतील माध्यमतत्त्वाची
ही सातवी —लेखनव्यवहारातील रिक्त–युक्त स्थानतत्त्वांची
माझ्या कवितेविषयी ही आठवी ओळ अक्षरांची.

 र. कृ. जोशी

"કાલચી જી તી મૂકળી (કિંવા વાઈ) મેલી"

"તિને આત્મહત્યા કેલી હોતી"

"હં"

"તી મૂકળી....."

"તુમચ્યા ઘરા પંરહોતોય"

"તી મૂકળી... ત્યા મૂકીતં... તી મૂ...."

"જરા સમજાવ બઘા હં"

"તી મૂકળી.."

"...તિલા તુમ્હી ઓળખત હોતાં?"

"મી નાહી. માઝં કામ"

"એકેકાચા મુલાવર પ્રેમ સાંભઉંનકા"

"આસતં નાહીં"

"હો"

"હા મત્સર"

"મીહી એક્સાવર સાંગત તુમ્હાલા માઝં પ્રિયાવર.."

"તિચં માઝ્યાવર"

"દૂધ, નીર, ચાંડાળ.."

"પ્રિય, પ્રિયતર, પ્રિયતમ"

"મીહિ ટાંકૂન જીવ દેઈન તિચ્યાસાઠવા"

"મી તુમ્હ કુણી મરણારચ્યાલા મદત કરીન"

"થૅંક્યૂ"

"નો મેન્શન"


"તુમ્હ પાંઢરા રંગ કુઠં સાંપડત નાહીં

"કાળા રે"

"તી એકમાત્ર તુમ્હા ઠેવલં કુંજર ગાલંય?"

"હૃદયાવરચા મળા થોડં ઠાયાચં આહે"

"માઝ્યાબરોબર રંડ"



एकशे बत्तीस   र. कृ. जोशी

## २. मुद्राक्षरकविता : तुझं माझं काही नाही

**तुझं          माझं**
**काही          नाही**
**माझं          थोडं**
**तुझं          थोडं**
**मिळून          झालंय**
**एक          कोडं**
**एवढंच**
**बाकी          त्यांत**
**कांही          नाही**
**तुझं          माझं**
**कांही          नाही**

*एकच रस्ता होता म्हणून*
*तोच घेणं भाग होतं*
*दुसरं कुणी नव्हतं म्हणून*
*बोलणंचालणं भाग होतं*
*बघणंबोलणं झालं म्हणून*
*थोडं हसणं भाग होतं*
*हसणं झालं, रुसणं झालं*
*दुखणंखुपणं भाग होतं*
*खुपणंदुखणं वाढलं म्हणून*
*जवळ असणं भाग होतं*
*जगणं असलं आपलं एक*
*तुझं माझं असणं आहे.*
*दुसरं तिसरं कांही नाही*

र. कृ. जोशी   एकशे तेहतीस

तुझं माझं
कांही नाही

फार वेळ जात असतो
दिवसरात्री होत असतात
तुझाच मी, माझीच तू
यात शब्द चारच असतात
तितकंच अंतर असतं म्हणून
पावलं सात चालणं होतं
चालून पाय थकले म्हणजे
कुठंतरी बसणं होतं
उगाच फसव्या व्यथेपायी
शपथा देऊनघेऊन होतात
पांचांवरती पांच बोटं
मिळून फक्त दहा होतात
घडतंय घडणारं, दृश्य हें
तुझा माझा आकार आहे
दुसरं तिसरं कांही नाही

तुझं माझं
कांही नाही

फुटतील वाटा दोन जिथून
तिथून
एक
माझी
होईल

 र. कृ. जोशी

तुझी
माझी
होईल

वा
माझी
तुझी
होईल
वा
माझी
माझी
राहील

तुझी
तुझी
राहील

तुझं माझं कांही नाही.

३. मुद्राक्षरकविता : व्यवहार

अ
अ धि क उ णे
क

दे णे घे णे

## ४. दृश्य कविता : “ ” + ‘ ’

“----”

‘____’

“--,:/;---?---!.”

‘-,--,--,--’

“-:--,++---,!?---..../--,%--+:”

‘+:???’

“!---;(%+,=.)---!?,”

‘__’

“-------?=, ∴+&-[---,--]÷÷÷=,,:,-------?(+)--
;---?-!---,--;---.XXX--.??.,.+(?-!=.)---,---
?--,,--%--{--,+,=.}--.+--?”

‘?’

“-------------,---------,--;----”

‘____’

“-!---+--%?”

‘__’

“-!---+--%?=, ∴+---[÷-×÷=+,+;=.]---”

‘--+·---?---’


“(----{-----[------?---]·---}------.)”

‘?,?;?:?.+?’

“ ”

‘ ’

## ५. ध्वनिकविता : क आणि 



क

| पृष्ठ क्रमांक | ओळ | चुकीची दुरुस्ती |
|---|---|---|
| ५ | १० | या ओळीपासून सुरू होणारा व शेवटी संपणारा कंस गाळावा. |
| ५ | १३ | ' मी ' ऐवजी ' ती ' वाचावे. |
| ६ | २० | सांगितलं |
| ८ | १ | गेलो |
| ६–९ | — | या कवितेतील सगळीकडच्या ' अन् ' ऐवजी ' अन ' वाचावे. |
| १४ | १४ | चित्र-विचित्र-बंध |
| १६ | खालून तिसरी ओळ | ' गद्दळ ' ऐवजी ' गदूळ ' वाचावे. |
| १९ | खालून तिसरी ओळ | अराजक |
| ४४ | २ | ' म्हणून निव्वळ कबूल करणाऱ्यांशी ' असे वाचावे. |
| ४५ | ७ | भविष्यकाळातल्या |
| ४५ | २२ | ' मान फिरवली ' पासून नवा परिच्छेद. |
| ४६ | ३ | ' जिथे पाय ' पासून नवा परिच्छेद. |
| ४६ | ७ | ' काय राहिलं माहित नाही ' असं वाचावं. |
| ४६ | ९ | घरं |
| ४७ | १ | ' जे काही ' पासून नवा परिच्छेद. |
| ४७ | २ | ' ओ हो ओ हो ' असे वाचावे. |
| ४७ | ५ | ' संध्याकाळी ' पासून नवा परिच्छेद. |
| ४७ | खालून तिसरी ओळ | जणू |
| ४८ | १ | ' मांसाच्या ' पासून नवा परिच्छेद. |
| ४८ | १३ | ' दुःखाचा ' पासून नवा परिच्छेद. |
| ४८ | २४ | दिसत |
| ४८ | २५ | ' दिसतात ' वरच्या ओळीच्या शेवटी वाचावे. |
| ४८ | खालून दुसरी ओळ | ' पोरांना ' असे वाचावे. |
| ४९ | १ | फुग्यांमधले |
| ४९ | ३ | ' इथपर्यंत ' पासून नवा परिच्छेद |
| ४९ | ११ | ' हे ढग ' पासून नवा परिच्छेद |

| पृष्ठ क्रमांक | ओळ | चुकीची दुरुस्ती |
|---|---|---|
| ४९ | १४ | ' आधी ' ऐवजी ' कधी ' वाचावे. |
| ४९ | २२ | नव्हेम्बर-डिसेम्बरसारखा |
| ४९ | खालून तिसरी ओळ | ' किती उत्साही ' पासून नवा परिच्छेद |
| ५० | — | ओळ क्र. ९, ११, १४, १५ व १६ पासून नवे परिच्छेद |
| ५२ | १८ | ह्यांनी |
| ५३ | १३ | टवृटवून |
| ५५ | १ | मॅग्नोलिया |
| ५६ | ९ | ' summer-saults ' असे वाचावे. |
| ८४ | १३ | ' गारव्याच्या ' असे वाचावे. |
| ८९ | १६ व १७ | अशक्य |
| ९३ | १२ | परतीचं |
| १०३ | १७ | सांगितलं |
| १०७ | — | ओळ क्र. १०, १३, १९ पासून नवे परिच्छेद |
| १०८ | १ | नवा परिच्छेद |
| १११ | ५ | लागतं |
| ११४ | १३ | मरणारांनी |
| ११५ | ८ | अंतर्याम |

REFBK-0023442
REFBK-0023442